सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

डायरेक्ट मिलच्या दरात खरेदी करा.
N.R. DHOOT GROUP Since 1975
श्री धूत सिल्क सारीज्
९१२, चाटी गल्ली, सोलापूर. | कावळे मेडिकलच्या बोळात, चाटी गल्ली, बाळीवेस, सोलापूर.
लोकमत व धूत सिल्क सारीज् प्रस्तुत
दसरा दिवाळी खरेदी महोत्सव २०२३
खरेदी करा कुपन मिळवा
जिंका लाखोंची बक्षिसे
योजनेचा कालावधी १२ ऑक्टो. ते ११ नोव्हे. २०२६

धाराशिव | सोमवार, १९ ऑक्टोबर २०२६ । वर्ष ४ थे अंक २१९ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



ग्राहक आमच्यासाठी एक धोरण आहे. कन्झ्युमरिझमसारखा कोणताही 'इझम' किंवा वाद नाही. ही ग्राहक-नीतीसुद्धा आमचे साधन आहे, साध्य नव्हे. आमचे साध्य आहे सुजलाम् सुफलाम् भारत! अभ्युदय व निःश्रेयसाच्या मार्गावर विश्वगुरुपदावर विराजमान होणारा महान भारत!

**स्व. बिंदुमाधव जोशी**
संस्थापक अध्यक्ष,
अखिल भारतीय ग्राहक पंचायत

# फ्रान्समध्ये आंदोलकांचा उत्पात

## ■ मॉल, लक्झरी स्टोअर्सची जाळपोळ, लूटपाट ■ युरोपातील आठ देशांमध्ये हिंसक निदर्शने



**पॅरिस, १८ ऑक्टोबर**
वाढलेली महागाई, बेरोजगारी निवाऱ्याचा प्रश्न आणि राजकीय नेतृत्वाविरुद्ध फ्रान्सपासून सुरू झालेल्या आंदोकाची धग इटली, बेल्जियम, पोर्तुगाल, अल्बेनियासह आठ देशांपर्यंत पसरली आहे. फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये आंदोलकांनी उत्पात घालत मॉल, लक्झरी स्टोर्समध्ये लूटपाट करत जाळपोळ करण्यात आली. बेभान झालेल्या आंदोलकांनी पॅरिसमधील १४३ वर्षे जुनी टाऊन हॉलची इमारत जाळली. कामगार संघटना आणि डाव्यांनी आंदोलनाला पाठिंबा दिल्याने परिस्थिती विकोपाला गेली आहे.

फ्रान्समध्ये वाढत्या किमती आणि सार्वजनिक सेवांमधील घसरणीच्या निषेधार्थ लाखो लोक रस्त्यावर उतरले. विद्यार्थी आणि कामगार संघटनांच्या आंदोलनांचे आता देशव्यापी हिंसक दंगली आणि लुटमारीत रूपांतर झाले आहे. पॅरिस, बोर्डो, ल्योन आणि मार्सेलसह फ्रान्सच्या प्रमुख शहरांमध्ये आंदोलकांचा उत्पात सुरू आहे. बोर्डोमध्ये, दंगलखोरांनी ॲपलच्या प्रमुख दुकानाच्या आणि लुई व्हिटॉन व हर्मेस या आलिशान फॅशन ब्रँड्सच्या दुकानांच्या खिडक्या फोडून लूटमार केली. मार्सेलमध्ये आंदोलकांनी एका महानगरपालिकेच्या इमारतीत जबरदस्तीने प्रवेश केला. तिथे, त्यांनी फ्रान्सचे राष्ट्रीय प्रतीक असलेल्या मारियानच्या पुतळ्याची तोडफोड केली, टेलिव्हिजन संच नष्ट केले आणि भिंतींवर अराजकतावादी चिन्हे रंगवली. काही चेहरा लपवलेल्या दंगेखोरांनी दुकानात घुसून मोडतोड केली. आंदोलकांचा पोलिसांसोबत संघर्ष झाला, यात शेकडो जखमी आहे. फ्रांन्सच्या गृह मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, देशभरातील विविध शहरांमध्ये हिंसाचार आणि जाळपोळीच्या घटना सुरू आहे.

◂ (वृत्तसंस्था)

> फ्रान्समध्ये हिंसाचाराला कोणतेही स्थान नाही. ज्यांनी दुकानांची तोडफोड केली, हल्ले केले आणि लूटमार केली, त्यांना न्यायासमोर आणले जाईल आणि कठोर शिक्षा दिली जाईल.
>
> **- इमॅन्युएल मॅक्रॉन,** राष्ट्राध्यक्ष

### कशामुळे भडकले आंदोलन ?

- महागडे शिक्षण आणि बेरोजगारी
- शिक्षकांचे पगार वाढविण्याची मागणी
- निवृत्तीवेतन सुरक्षित करणे आणि सार्वजनिक सेवांमधील कपात तत्काळ मागे घेणे
- हिंसाचारप्रकरणी आतापर्यंत ८०० लोकांना अटक
- गोंधळासाठी डाव्या विचारसरणीचे अतिरेकी गट आणि समाजकंटक जबाबदार धरले ■

### युरोपियन देशात आंदोलनाची धग

फ्रान्समधील आंदोलनाचे पडसाद युरोपियन देशात उमटू लागले आहे. बेल्जियम, ब्रसेल्समध्येही शनिवारी शेकडो तरुण रस्त्यावर उतरले. इटलीच्या मिलान शहरात महागाईविरोधात काढण्यात आलेल्या मोर्चाला हिंसक वळण लागले. मध्यवर्ती कॅथेड्रल चौक खाली करण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराचा वापर करावा लागला. अल्बेनियामध्ये पंतप्रधान एडी रामा यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी सलग पाचव्या दिवशी निदर्शने सुरू ठेवली. पोर्तुगालमध्ये वाढता महागाईचा दर, बेरोजगारी आणि पगार वाढीसाठी आंदोलने सुरू आहे. ■

### महापौर बाली बागायोको आंदोलनाचा चेहरा

फ्रान्समधील विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ५३ वर्षीय महापौर तरुणांचा आवाज म्हणून पुढे आले आहेत. त्यांचे समर्थक त्यांना 'स्पायडरमॅन' म्हणत आहेत, तर उजव्या विचारसरणीचे नेते त्यांच्यावर हिंसाचार भडकवल्याचा आरोप करत आहेत. बागायोको यांनी म्हटले की, गरीब वस्त्यांमधील मुलांना निकृष्ट दर्जाचे शिक्षण देणे हा देखील व्यवस्थेतील हिंसेचाच एक प्रकार आहे. ■



विदर्भ-मराठवाडा सीमेवर मुळावा, ता. उमरखेड (यवतमाळ ) येथे रेणुका मातेचे मंदिर आहे. परशुरामांनी मुळावा येथे कावड ठेवल्यामुळे देवीचा मूळ वास या ठिकाणी असल्याचे मानले जाते. नवरात्रीत येथे भाविकांची मोठी गर्दी असते.

## महत्त्वाचे

### भारतातही हिंसाचार घडवण्याचा कट



**नवी दिल्ली :** फ्रान्स आणि बांगलादेशमध्ये यापूर्वी घडलेल्या हिंसक घटनांसारखेच एक कट येथे रचला गेला. हा कट भारतविरोधी टोळ्या आणि काही राजकारण्यांनी मिळून रचला असून, त्याद्वारे तरुणांना भडकवून रस्त्यांवर हिंसाचार पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी रविवारी केला. मात्र, भारत म्हणजे बांगलादेश किंवा फ्रान्स नाही, याचा विसर हा धोकादायक कट रचणाऱ्यांना पडला, असा टोलाही त्यांनी लगावला.

### सिंगापूरचा पासपोर्ट जगात अव्वल

**लंडन :** आंतरराष्ट्रीय पातळीवर पासपोर्टचे सामर्थ्य दर्शवणाऱ्या 'हेन्ली पासपोर्ट इंडेक्स'च्या ताज्या क्रमवारीत भारताने एका स्थानाची झेप घेतली आहे. मानांकनात सुधारणा झाली असली तरी भारतीय पासपोर्ट धारकांसाठी विना-व्हिसा प्रवास करता येणाऱ्या देशांच्या संख्येत घट नोंदवण्यात आली आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर २०२५ मध्ये भारत या क्रमवारीत ८५ व्या स्थानी होता. ऑक्टोबर २०२६ च्या ताज्या अहवालात भारताने ८४ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. अल्जेरिया, मॉरिटानिया हे देशही भारतासह संयुक्तपणे याच स्थानावर आहेत. सिंगापूरचा पासपोर्ट जगात अव्वल तर जपान दुसऱ्या स्थानावर आहे. भारतीय पासपोर्टधारक ५५ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात.

### विशिष्ट 'नॅरेटिव्ह'चा अतिप्रमाणात प्रसार नको

**नवी दिल्ली -** शिफारस प्रणालीच्या माध्यमातून वापरकर्त्यांसमोर केवळ एक किंवा काही विशिष्ट प्रकारचा 'नॅरेटिव्ह'चा अतिप्रमाणात प्रसार होऊ नये, असा निर्देश केंद्र सरकारने इन्स्टाग्राम आणि फेसबुकची मालक कंपनी 'मेटा'ला दिले आहेत. सार्वजनिक सुव्यवस्था बिघडू शकतील किंवा हिंसाचार अथवा इतर बेकायदेशीर कृत्यांना चिथावणी देऊ शकतील, अशा आशयावर देखरेख अधिक कडक करावी, असेही सरकारने म्हटले आहे. सध्या सुरू असलेल्या सार्वजनिक घटना दर्शवणाऱ्या छायाचित्रांच्या, चित्रफितींच्या, ग्राफिक्सच्या किंवा इतर आशयांच्या संदर्भात योग्य उपाययोजना करा, असे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने १० ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या सल्लागार सूचनेमध्ये मेटाला सांगितले आहे.

# गोळीबारातून थोडक्यात वाचला टायगर श्रॉफ

## बिश्नोई टोळीने स्वीकारली जबाबदारी



**मुंबई, १८ ऑक्टोबर**
बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर रविवारी सायंकाळी मुंबईतील जुहू परिसरात काही बंदूकधाऱ्यांनी गोळीबार केला. मात्र, तो सुदैवाने वाचला, असे पोलिसांनी सांगितले. हल्लेखोरांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी १५ पथके तयार केली आहेत. गोळीबार होताच पोलिसांच्या पथकांनी आणि न्यायवैद्यक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. लॉरेन्स बिश्नोई टोळीने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

रविवारी टायगर श्रॉफ फुटबॉल मॅच खेळून घरी जात होता. याचवेळी दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींकडून त्याच्या वाहनावर गोळीबार करण्यात आला. यात त्याचा वाहनचालक फिरदौस आणि एक ऑटोरिक्षा चालक जखमी झाले, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. हल्ल्याची एक चित्रफीत समोर आली असून,त्यात अनोळखी व्यक्ती अभिनेत्याच्या वाहनावर गोळीबार करताना दिसत आहेत. टायगरचे वडील जॅकी श्रॉफ यांनी त्याच्यावर गोळीबार झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. ही घटना पश्चिम उपनगरातील जुहू पोलिस ठाण्याच्या हद्दीत, पुष्पा पार्कजवळ घडली.

या घटनाक्रमाचा मागोवा घेतला जात असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही ताब्यात घेतले असून, तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात आहेत.

◂ (वृत्तसंस्था)

### सलमानसोबत काम करणाऱ्यांचा पुढे नंबर

गुंड लॉरेन्स बिश्नोईच्या टोळीने समाज माध्यमावर एक पोस्ट करीत या हल्ल्याची जबाबदारी घेतली. मात्र, त्याची पडताळणी केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. बिश्नोई टोळीतील अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी हल्ल्याची जबाबदारी घेत समाज माध्यमावर पोस्ट केली. आम्ही याला फोन करून समजावले होते. पण, तो समजला नाही. आता आम्ही त्याला चांगलीच समज दिली आहे. मुंबई फिल्म इंडस्ट्रीमधील जो कोणी आमचे ऐकणार नाही, त्याचा नंबर पुढे असेल. सलमान खानसोबत काम करणाऱ्याचा पुढे नंबर लागेल, असा इशारा बिश्नोई टोळीने दिला आहे. ■

### वेगाने तपास करा : मुख्यमंत्री फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना फोन करून टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेची माहिती घेतली. पोलिस आयुक्तांना त्यांनी तत्काळ वेगाने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. ■

## महिलांचा आदर हीच खरी भक्ती



**नवी दिल्ली :** महिलांचा आदर करणे हीच देवी दुर्गेप्रती खरी भक्ती आहे. नवरात्र हा सण भारताच्या स्त्रीशक्तीचा आदर करण्याच्या परंपरेचे प्रतिबिंब आहे. दुर्गापूजा देशाच्या समृद्ध आध्यात्मिक वारशाचे प्रतीक आहे. देवी दुर्गेचा महिषासुरावरील विजय हे वाईटावर चांगल्याच्या विजयाचे आणि दैवी शक्तींच्या विजयाचे एक प्रेरणादायी उदाहरण असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे.

दुर्गापूजेनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा देणाऱ्या संदेशात राष्ट्रपती म्हणाल्या की, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिलांचा आदर केला जाईल, तेव्हाच देवी दुर्गेप्रती खरी भक्ती पूर्ण होईल दुर्गापूजा ही भारताची स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याची परंपरा दर्शवते. देवी दुर्गाला सामर्थ्य आणि वाईट शक्तींवरील विजयाचे प्रतीक मानले जाते. या सणाचा संदेश केवळ पूजेपुरता मर्यादित नाही. तो समाजाला महिलांचे महत्त्व आणि आदराची आठवण करून देतो. ■

# कर्करोगावरील १३७ औषधे होणार स्वस्त

## किमती ७० टक्क्यांपर्यंत घटण्याची शक्यता

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**
औषध दर नियामक एनपीपीएने शनिवारी १३७ नॉन-शेड्यूल्ड कर्करोगविरोधी औषधांवरील नफ्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित केले आहे. यामुळे या जीवनरक्षक औषधांच्या किरकोळ किमतीत ७० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. यात काही पेटंट औषधांचाही समावेश आहे. हा निर्णय नऊ नोव्हेंबरपासून लागू होईल. ग्राहक एनपीपीएच्या वेबसाइट आणि 'फार्मा सही दाम' मोबाइल ॲपद्वारे नवीन दर पाहू शकतील.

राष्ट्रीय औषध दर प्राधिकरणाने (एनपीपीए) सांगितले की, आरोग्य सेवा महासंचालकांच्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशींच्या आधारे हे पाऊल उचलण्यात आले आहे. समितीने १३७ औषधांवरील नफ्याचे प्रमाण तर्कसंगत करण्याची शिफारस केली होती. २०१९ मध्ये, एनपीपीएने एक प्रायोगिक टीएमआर योजना सुरू केली होती. ज्याअंतर्गत ४२ कर्करोगविरोधी औषधांवरील नफ्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आले होते.

◂ (वृत्तसंस्था)

### सुधारित किंमत सूची प्रसिद्ध करणे अनिवार्य



रुग्णांना औषधांच्या योग्य किमतींची माहिती मिळावी, यासाठी औषध उत्पादकांना त्यांच्या वेबसाइटवर सुधारित किंमत सूची प्रसिद्ध करणे बंधनकारक असेल. सुधारित आणि कमी केलेले नवीन दर नऊ नोव्हेंबरपासून देशभरात लागू होणार आहे. रुग्णालये, वैद्यकीय संस्था आणि किरकोळ औषध विक्रेत्यांना नवीन दरांनुसारच औषधांची विक्री करणे बंधनकारक असेल. ■

# पश्चात्तापदग्ध पुरुषांचा 'सादुमातानो पावाडो'



### अष्टमीला स्त्रीरूपात खेळतात गरबा

**अहमदाबाद, १८ ऑक्टोबर**
सध्या देशभरात नवरात्रोत्सवाचा उत्साह आहे. विशेषतः सोमवारी अष्टमी असल्याने उशिरापर्यंत गरबा खेळला जाणार आहे. पण, गुजरातमध्ये अष्टमीला महिलांच्या वेशभूषेतील पुरुष गंभीर सुरांमध्ये 'सादुमातानो पावाडो' गात, मंद ठेक्यावर गरब्याचा फेर धरण्याची परंपरा आहे. अहमदाबादच्या शाहपूर भागात अष्टमीच्या रात्री पुरुष पारंपरिक चनिया-चोळी घालून डोक्यावर ओढणी घेतात, दागिने घालून काजळ लावतात. महिलांच्या वेषात नटलेले हे पुरुष सादुमाता चौकातील मंदिरासमोर गरबा खेळतात. हा गरबा आनंदासाठी नसून देवीची क्षमा मागण्याचा एक प्रकार आहे. गरब्यात हे पुरुष 'सादुमातानो पावाडो' गातात. पावाडो हा वीरकाव्याचा एक प्रकार आहे. मराठीतील पोवाडा या शब्दाचा हा अपभ्रंश असू शकतो. या पावाडोत परिसरातील पुरुष पश्चात्ताप व्यक्त करत, देवीची क्षमा मागतात. अतिशय दुःखी स्वरात पावाडो गात, हे पुरुष महिलांप्रति झालेल्या अपराधांसाठी सादुबा मातेची क्षमा मागतात.

या परंपरेमागे इतिहास असून, एका लोककथेनुसार, १८१६ च्या सुमारास बारोट समाजात सादुबा नावाची देखणी महिला होती. सिद्धपूर निवासी असलेल्या सादुबांचा विवाह अहमदाबादमधील हरिसिंह बारोट यांच्याशी झाला. काही ठिकाणी त्यांचे नाव हथीसिंह भाट असल्याचेही सांगतात. शहरातील लोकांची विशेषतः श्रीमंतांची बित्तंबातमी सरकारला पुरविणारे हेर नेमलेले होते. स्थानिक भाषेत त्यांना 'चडिया' म्हणत. कुप्रसिद्ध चडियांनी सादुबाच्या सौंदर्याविषयी सरदाराकडे माहिती पुरवून ती व्यभिचारी असल्याची बतावणी केली. सरदाराच्या अंतःपुरात जाण्यापेक्षा सादुबांनी बलिदान स्वीकारले. बारोट समाजात सन्मान रक्षण करण्यासाठी 'त्रागा' परंपरा होती. त्यानुसार, हरिसिंह यांनी आपल्या मुलीची आणि पत्नी सादुबाची हत्या केली. 'त्रागा'ची बातमी समजताच समाजाच्या संतापाच्या उद्रेकात दोन चडियांची हत्या झाली.

◂ (वृत्तसंस्था)

### जगावेगळी परंपरा

बारोट समाजाबांधवांनी, आपण एका निरपराध स्त्रीला वाचवू शकलो नाही, याचा पश्चात्ताप आणि सादुबाच्या बलिदानाची आठवण म्हणून शहापूरमध्ये १८१७ मध्ये मंदिर बांधले. लोकांनी सादुबाला सती मानून तिच्या सन्मानार्थ 'सादुबाचे पावाडो' रचले. माफी मागण्याचा प्रयत्न किंवा प्रायश्चित्त घेण्यासाठी आश्विन महिन्यातील शुक्ल पक्षाच्या आठव्या दिवशी म्हणजेच अष्टमीला, पुरुषांनी स्त्रीरूपात गरबा खेळायची परंपरा सुरू झाली. या परंपरेबद्दल अनेक आख्यायिका असल्या तरी, त्यांना ऐतिहासिक पुरावा नाही. आज हा विशेष गरबा खेळायला येणाऱ्यांमध्ये बारोट पुरुषांपेक्षा इतर समाजातील पुरुषांची संख्या जास्त आहे. जगभरात भूतकाळातील चुकांची आठवण म्हणून स्मारके उभारली गेली असतील. पण, आपल्या पूर्वजांनी केलेली चूक जाहीरपणे मान्य करण्यासाठी पश्चात्ताप करण्याची अशी परंपरा कदाचित कुठेही नसेल. ■

# सप्तमीला तुळजाभवानीचे 'भवानी तलवार' रुप

**तभा वृत्तसेवा,**
**तुळजापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात रविवारी सप्तमीच्या पावन पर्वावर देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याच्या प्रेरणादायी इतिहासाशी जोडल्या गेलेल्या भवानी तलवारीच्या परंपरेमुळे या महापूजेला विशेष महत्त्व आहे. देवीच्या या तेजस्वी रूपाच्या दर्शनाने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.



छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्याच्या रक्षणासाठी श्री तुळजाभवानी देवीने भवानी तलवार दिली होती, अशी लोकमान्यता आहे. त्यामुळे भवानी तलवार ही शौर्य, सामर्थ्य आणि स्वराज्यनिष्ठेचे प्रतीक मानली जाते. याच ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरेचे स्मरण करून देणारी भवानी तलवार अलंकार महापूजा नवरात्रोत्सवातील प्रमुख आकर्षण ठरली. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या विविध अलंकारिक रूपांचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्रासह विविध भागांतून भाविक तुळजापूरमध्ये दाखल होत आहेत. सप्तमीच्या महापूजेमुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

मोर वाहनातून देवीचा छबिना : शनिवारी रात्री श्री तुळजाभवानी देवीची छबिना मिरवणूक मोर वाहनातून काढण्यात आली. पारंपरिक धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या मिरवणुकीत देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी उपस्थिती लावली. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अपर जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव, नगराध्यक्ष तथा विश्वस्त विनोद गंगणे, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, पुजारी, सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते.



मोर वाहनातून छबिना मिरवणूक

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### चांदतारा उर्दू शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
चांदतारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूरमध्ये वाचन प्रेरणा दिवस उत्साहाने साजरा केल. यावेळी विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्र व गोष्टींचे पुस्तकांचे वाचन केले डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची माहिती विद्यार्थ्यांनी खूप छान सांगितली. सर्व विद्यार्थ्यांनी मिळून लायब्ररीला पुस्तके भेट दिली. यावेळी सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन काझी हबीबा तर आभार नेहा बागवान यांनी मानले.



### दसरा व दिवाळीनिमित्त यल्लम्मा हॅण्डलूममध्ये खरेदीसाठी विशेष सूट

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलच्या दुनियेत प्रसिद्ध झालेल्या दत्त चौक व भद्रावती पेठ येथील यलम्मा हॅन्डलूममध्ये खास दसरा व दिवाळीनिमित्त कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलच्या खरेदीवर २० टक्के सूट दिली जात असल्याचे यल्लम्मा हॅण्डलूमचे व्यवस्थापक यल्लप्पा नादरगी यांनी सांगितले. नाविन्यपूर्ण व भरपूर व्हरायटीज असलेल्या यल्लम्मा हॅण्डलूममध्ये कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे फ्रेश स्टॉक दसरा व दिवाळीनिमित्त ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. उत्सव काळात खरेदीसाठी महिलांची मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. यामध्ये विविध राज्यातील कॉटन साड्या व ड्रेस मटेरियल असून यामध्ये जसे की पोचमपल्ली, कोलकाता, व्यंकटगिरी, गदवाल, इचलकरंजी, मदुराई, हुबळी, धारवाड, इरकली, फॅन्सी कॉटन साड्या व विशेष भागलपुरी, अजर्क प्रिंट, मधुबनी इतर अनेक व्हरायटी महिलांचे आकर्षण ठरत आहे. उत्सव काळात सर्व प्रकारच्या साड्या व ड्रेस मटेरियलवर देण्यात आलेल्या २० टक्के सूट चा लाभ सर्व महिला ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन नादरगी बंधू यांनी केले आहे.



### जिजामाता शाळेत भोंडला उत्साहात

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
जिजामाता प्राथमिक शाळा व जिजामाता बालक मंदिर तुळशीदासनगर कोंडी येथे नवरात्र निमित्ताने भोंडला कार्यक्रम साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास धनश्री कंकाळ, ग्राम पंचायतीच्या माजी सदस्या सुप्रिया भोसले, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी फुलांनी सजवलेल्या गजराजाचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर यांनी केले. यावेळी उपस्थित महिला पालकांनी फेरधरत भोंडल्याची गाणी सादर केले तर मुलींनी गरबा दांडिया खेळत देवीच्या गाण्यांवर नृत्य केले. सांस्कृतिक उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ सचिवा शिल्पा ठोकळ यांनी कौतुक केले. तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते म.शि.प्र. मंडळाच्या माजी अध्यक्षा कै. निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा राजश्री ढवण, प्रशालेच्या वनगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा चव्हाण, सुरेखा नान्नजकर यांनी केले.



### मेहता प्रशालेत ज्येष्ठ वैज्ञानिक अशोक नगरकर यांचे व्याख्यान

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
कै. वि. मो. मेहता प्रशालेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ वैज्ञानिक अशोक नगरकर उपस्थित होते. व्यासपीठावर प्रकाश राठोड, वाघमोडे, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी आणि पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी काशिनाथ भतगुणकी यांचीही उपस्थिती लाभली होती. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अशोक नगरकर यांनी सकारात्मक विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित केले. जीवनात पॉझिटिव्ह विचार कसे ठेवावेत आणि ते कसे जपायचे, हे त्यांनी विविध रोजच्या आयुष्यातील उदाहरणांमधून स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढीस लागावी यासाठी त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शाळेमध्ये मल्टीस्किल लॅबची निर्मिती केली पाहिजे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात करता येतील. जर तुम्हाला भविष्यात शास्त्रज्ञ व्हायचे असेल, तर आपल्या आजूबाजूच्या समस्या सोडवायला आत्तापासूनच सुरुवात करा. प्रत्येक गोष्टीत वेगळेपण आणि नावीन्य आणून संशोधन करा.' यासोबतच पेटंट म्हणजे काय आणि ते कसे मिळवायचे, याचे सोप्या व रंजक उदाहरणांद्वारे त्यांनी स्पष्टीकरण दिले. सूत्रसंचालन मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले तर आभार आनंद केसकर यांनी मानले.

# जिल्ह्यात गुरुवारपासून खत विक्री

### निर्धारित मुदतीत खत घेता येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
सोलापूर जिल्ह्यात गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर पासून फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल्स या डिजिटल प्रणालीद्वारे खत विक्री करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना उपलब्ध खतसाठ्याची माहिती मोबाईलवर मिळविणे तसेच आपल्या शेतजमिनीच्या क्षेत्रानुसार खतांचे आगाऊ बुकिंग करणे शक्य होणार आहे. खत खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि नियोजनबद्ध करण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

#### मोबाईलवर मिळणार खतसाठ्याची माहिती

एफएफएफएस ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संबंधित खत विक्री केंद्रावर कोणत्या प्रकारचे खत उपलब्ध आहे आणि त्याचा किती साठा आहे, याची




माहिती मिळू शकणार आहे. त्यामुळे खत उपलब्धतेची माहिती घेण्यासाठी दुकानांमध्ये वारंवार जाण्याची गरज कमी होणार असून, खत खरेदीचे नियोजन करणे सोपे होईल.

#### गुगल प्ले-स्टोअरवरून ॲप डाउनलोड करण्याचे आवाहन

शेतकऱ्यांनी एफएफएफएस ॲपचा वापर करून खत खरेदीचे नियोजन करावे.

#### छापील किमतीपेक्षा जास्त दर आकारता येणार नाही

खत विक्री करताना खताच्या पिशवीवर नमूद केलेल्या कमाल किरकोळ विक्री किमतीपेक्षा (चठझ) अधिक दर आकारता येणार नाही. तसेच अनुदानित खतांसोबत टॉनिक, औषधे किंवा अन्य कृषी निविष्ठा खरेदी करण्याची सक्ती विक्रेत्यांना करता येणार नाही. अशी सक्ती आढळल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी.

#### खतांचे आगाऊ बुकिंग करता येणार

शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीच्या क्षेत्रानुसार आवश्यक खतांचे ॲपद्वारे आगाऊ बुकिंग करता येईल. बुकिंग केल्यानंतर पुढील दोन दिवसांच्या आत म्हणजेच T+२ कालावधीत संबंधित शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबातील प्रतिनिधीला विक्री केंद्रावर जाऊन खत घेता येईल. ॲपद्वारे बुकिंग केलेल्या खताच्या वितरणाबाबत संबंधित विक्रेत्याने निर्धारित नियमांनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

#### ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक

https://lay.google.com/store/as/details?id=com.agristack.fsas
ॲप वापरताना अडचण आल्यास शेतकऱ्यांनी गावातील कृषी सखी, कृषी मित्र, पोक्रा समूह सहाय्यक, आत्मा संस्थेचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व ब्लॉक तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, पंचायत समितीचे कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. डिजिटल खत विक्री प्रणालीचा लाभ घेऊन खत खरेदी प्रक्रिया सुलभ करावी आणि उपलब्ध सुविधेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन कृषी विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात येत आहे.




### चारचाकीच्या धडकेत महिला जखमी

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
पायी चालत जाणाऱ्या लक्ष्मी धम्मपाल कांबळे (वय ४३ वर्षे, रा. गोकुळ नगर, जुळे सोलापूर) यांना पाठीमागून आलेल्या एका अज्ञात कार चालकाने जोरात धडक दिली. शिवाय जखमीला मदत न करता घटनास्थळावरून पळ काढला. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात कांबळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील जखमी महिला या १६ ऑक्टोबर रोजी दुपारी बीएमआयटी कॉलेज येथून हॉटेलमधील काम करून पायी चालल्या असताना, पाठीमागून आलेल्या कारने त्यांना जोरात धडक दिली. या धडकेमुळे त्या खाली पडल्या आणि त्यांच्या कमरेला व मानेला गंभीर मुक्का मार लागला, तसेच त्यांच्या हातातील मोबाईल उडून कुठेतरी गहाळ झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार ढोबळे करत आहेत.




### डॉ. कोठे यांच्या पुढाकाराने 'प्रहार'चे प्रदर्शन

#### ॲड. उज्ज्वल निकम यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यावर आधारित आणि ज्येष्ठ सरकारी वकील तथा खा. ॲड. उज्ज्वल निकम यांच्या कायदेशीर संघर्षाची कहाणी सांगणाऱ्या 'प्रहार' चित्रपटाचे सोलापुरात मोफत प्रदर्शन करण्यात आले. सोलापूर ग्रीन मिशनचे संस्थापक डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या पुढाकाराने आयोजित या विशेष प्रदर्शनाला खासदार उज्ज्वल निकम यांची उपस्थिती होती.

२६ नोव्हेंबर २००८ ला मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता. या हल्ल्यातील आरोपी अजमल कसाबला कायद्याच्या चौकटीत शिक्षा मिळवून देण्यासाठी ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात महत्त्वाची भूमिका बजावली. याच संघर्षाची कहाणी 'प्रहार : द अनटोल्ड स्टोरी ऑफ उज्ज्वल निकम' या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. अभिनेता राजकुमार राव आणि ललित प्रभाकर यांच्या अभिनयामुळे हा चित्रपट विशेष चर्चेत आहे.

या विशेष प्रदर्शनाला ज्येष्ठ सरकारी वकील तथा खासदार उज्ज्वल निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, नगरसेवक प्रथमेश कोठे आणि उद्योजक राम जगदाळे उपस्थित होते.

### शिवभक्ती हीच खरी शक्ती : महादेव कोगनुरे

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर :**
'श्री शिवलीलामृत ग्रंथ हा केवळ ग्रंथ नसून जीवन जगण्याची कला आहे. शिवभक्ती माणसाला संकटाशी लढण्याची शक्ती देते. सकळेश्वर मंडळाने नवरात्र उत्सवाच्या माध्यमातून हा वारसा जपला आहे, हे कौतुकास्पद आहे. एमके फाउंडेशन नेहमीच अशा धार्मिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याचे प्रतिपादन एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी केले.

मंद्रूप येथील श्री सकळेश्वर नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित श्री शिवलीलामृत ग्रंथ प्रवचन कार्यक्रमास एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी उपस्थिती लावली. यावेळी ते बोलत होते. यावेळी मंद्रूप जिल्हा परिषद सदस्य सोनाली कडते, शिवसेना माजी जिल्हाप्रमुख अमर पाटील, संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष प्रशांत कडते , ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत मेंडगुदले मंडळाचे अध्यक्ष अमोगसिद्ध मुंजे, उपाध्यक्ष शिवानंद जोडमोटे, संस्थापक गौरीशंकर मेंडगुदले, सचिव सकळेश्वर पुजारी, निवृत्त मंडलाधिकारी सुरेश जोडमोटे, वांगीचे प्राचार्य गिरीश कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी मंडळाच्या वतीने सोनाली कडते, महादेव कोगनुरे, अमर पाटील व प्रशांत कडते यांचा सत्कार करण्यात आला.





### स्वच्छता पंधरवड्यात स्वच्छता मोहीम; कचरा व्यवस्थापन जनजागृतीवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान आयोजित स्वच्छता पंधरवडा २०२६ ची यशस्वी सांगता झाली. या पंधरवड्यात मोठ्या प्रमाणावर श्रमदान, सखोल स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, रेल्वे परिसराचे सुशोभीकरण आणि शास्त्रीय कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आले.

ही मोहीम रेल्वे स्थानके, रेल्वे वसाहती, डेपो, रुग्णालयांचे परिसर आणि इतर ठिकाणी राबवण्यात आली. यामध्ये सोलापूर, कलबुर्गी, वाडी, पंढरपूर, कुर्डुवाडी, लातूर, धाराशिव, जेऊर आणि इतर रेल्वे आस्थापनांचा समावेश होता. सोलापूर विभागाचे डीआरएम यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या एका कार्यक्रमात, सोलापूर विभागातील कर्मचाऱ्यांचा एडीआरएम यांच्याद्वारे सत्कार करण्यात आला. कचऱ्यातून कलाकृती निर्मिती, कचरा व्यवस्थापन प्रणालीत केलेले महत्त्वपूर्ण बदल आणि स्वच्छता उपक्रमांमधील सक्रिय सहभाग अशा विविध श्रेणींमधील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. विविध विभागांच्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या टीम्सना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, उपस्थित सर्वांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

### नवरात्रोत्सवानिमित्त खेडगी संस्थेचा गरबा-दांडिया महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**
सी. बी. खेडगी महाविद्यालय, मातोश्री नीलव्वाबाई खेडगी प्रशाला आणि खेडगी इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवाच्या उत्साहाला सांस्कृतिक आणि कलात्मकतेची जोड देण्यासाठी आयोजित गरबा व दांडिया स्पर्धा २०२६ उत्साहात संपन्न झाली. अक्कलकोटमध्ये प्रथमच आयोजित या उपक्रमात विविध गीतांच्या तालावर ठेका धरत शेकडो महिला व विद्यार्थिनींनी आपल्या नृत्यकौशल्याचे शानदार सादरीकरण केले.

या सांस्कृतिक सोहळ्याचे उद्घाटन संस्थेच्या उपाध्यक्षा भारती खेडगी यांच्या हस्ते झाले. माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्यासपीठावर गंगासागर खेडगी, निर्मला स्वामी, भारती भरमशेट्टी, रेणुका धबाले, संचालिका ज्योती धरणे, मुख्य संयोजिका पवित्रा खेडगी, गायत्री राठी, मयुरी पुरोहित, उपप्राचार्या वैदेही



वैद्य आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या गरबा-दांडिया सादरीकरणात 'बेस्ट गरबा', 'बेस्ट दांडिया', 'बेस्ट मेकअप, बेस्ट कॉस्च्युम' तसेच 'बेस्ट मदर अँड डॉटर दांडिया' अशा विविध गटांत स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. विविध गटांतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. विजेत्या स्पर्धकांचे यादी वाचन डॉ. लक्ष्मी रेड्डी व प्रा. पल्लवी कलशेट्टी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून पूनम राठी, अबोली मेहता (सोलापूर), वैशाली पटेल, सोनू वाघमोडे यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निर्भया पथक, पोलीस व होमगार्ड कर्मचारीसह शिक्षक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

यावेळी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, संचालक ॲड. अनिल मंगरुळे, चंद्रकांत स्वामी, मल्लिनाथ स्वामी, प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले आणि पर्यवेक्षक श्रीकांत जिड्डीमनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. वर्षाराणी हत्ताळी व समन्वयक डॉ. लता हिंडोळे यांनी केले. तर सहसमन्वयक प्रा. विजया कोन्हाळी यांनी आभार मानले.

### साहित्य संमेलनाचा ऐतिहासिक टप्पा ; डॉ. शरद गोरे यांच्या नेतृत्वात सुवर्णकाळ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या माध्यमातून २०० व्या साहित्य संमेलनाला गवसणी घालण्यात आली आहे. २५ ऑक्टोबर रोजी वडोदरा (गुजरात) येथे होत असलेल्या सयाजीराजे गायकवाड मराठी साहित्य संमेलना'प्रसंगी हा २०० व्या साहित्य संमेलनाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण होत आहे.



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक डॉ. शरद गोरे यांच्या अत्यंत कुशल नेतृत्वात ही अभूतपूर्व कामगिरी फत्ते झाली आहे. इतक्या मोठ्या संख्येने आणि सातत्याने विविध साहित्य संमेलने आयोजित करणारी ही जागतिक स्तरावरील एकमेव साहित्य संस्था ठरली असून, त्याची नोंद 'अमेरिकन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'ने घेऊन संस्थेचा आणि मराठी भाषेचा गौरव केला आहे. डॉ. शरद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित झालेली ही संमेलने केवळ संख्येतच नव्हे, तर विचारांच्या आणि सांस्कृतिक वैविध्याच्या दृष्टीने समृद्ध आहेत.



### लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत किल्ले तयार करणे स्पर्धा

**अकलूज, दि. १८ ऑक्टोबर-**
लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, यशवंतनगर येथे विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास विद्यार्थिनींपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने किल्ले तयार करणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये प्रशालेतील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी आपल्या कल्पकतेचा आणि कलाकौशल्याचा उपयोग करून विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या. किल्ल्यांची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार आणि परिसराची मांडणी यांमधून विद्यार्थिनींची सर्जनशीलता व ऐतिहासिक वारशाविषयीची आवड दिसून आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींचे मुख्याध्यापिका अनिता पवार यांनी कौतुक केले. स्पर्धेसाठी कलाशिक्षक विशाल लिके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले तर परीक्षणाचे कार्य ज्येष्ठ शिक्षक अनंत कोळी यांनी केले.

### पद्मशाली शिक्षण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
पद्मशाली शिक्षण संस्थेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज बोलाविण्यात आली होती. सभेची सुरुवात श्री मार्कंडेय महामुनींच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ सभासद सत्नारायण पसनूर यांच्या हस्ते करण्यात आले. सभा सकाळी १० वाजता सुरू झाली.

सभेच्या अगोदर अहवाल सालात ज्या सभासदांचे निधन झाले अशा सर्व सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकोन यांनी प्रस्तावना करून उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले.

सभेत मागील सभेचे वृत्तांत वाचून काढण्यात आले व सभासदांनी विषय क्रं. १ ला सर्वानुमते मंजुरी दिली. तसेच



सुरेश श्रीराम, आनंद चिन्नी, राजाराम गोसकी, सुदर्शन बोल्लम व सुदर्शन संदुपटला या आजीव सभासदांनी विविध विषयावर विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर चर्चा मसलत होऊन सभा पार पडली. सभेतील सर्व विषयांना मंजुरी देण्यात आली. सभेच्या शेवटी सुरेश श्रीराम, राजाराम गोसकी, आनंद चिन्नी यांनी वार्षिक सभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात व अहवालातील उत्कृष्ट माहिती दिल्याबद्दल व संस्थेचे सचिव दशरथ गोप यांना ड्रीम फाउंडेशन वतीने आयकॉन ऑफ महाराष्ट्र अवार्ड २०२६ पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व विश्वस्त यांचे अभिनंदन केले. यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेस संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष ॲड. श्रीनिवास व्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, विश्वस्त दिनेश यन्नम, नागनाथ गंगी, श्रीधर चिट्याल, व्यंकटेश आकोन, मधुकर कट्टा, विजयकुमार गुल्लापल्ली, गणेश गुज्जा, हरिप कोंडा, प्रभाकर आराकाल, नागनाथ श्रीरामदास, श्रीनिवास जोग, नरेश श्रीराम, दत्तात्रय यन्नम, रामदास इप्पाकायल, श्रीनिवास गडुम, अंबादास गज्जम, श्रीनिवास इप्पाकायल उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाकिस्तानी लष्कराने घडवले दहशतवादी

## 'पीटीएम' प्रमुख मंझूर पश्तीन यांनी फाडला बुरखा



**हेग, १८ ऑक्टोबर**

पाकिस्तानी लष्कर आणि गुप्तचर संस्थेनेच दहशतवादी घडवले. त्यांनी पश्तून बहूल भागांत दहशतवादी गट निर्माण केले आणि त्यांना अर्थपुरवठा करीत प्रशिक्षण दिले, असा खळबळजनक आरोप पाकिस्तानातील पश्तून मुव्हमेंटचे (पीटीएम) प्रमुख मंझूर पश्तीन यांनी केला. पाकिस्तानी लष्कर दहशतवादी कारवायांचा वापर स्थानिकांना बळजबरीने विस्थापित करून खनिजसंपन्न प्रदेशांवर ताबा मिळवण्यासाठी करीत असल्याचेही ते म्हणाले.

दोन दशकांपेक्षा जास्त काळापासून चाललेल्या लष्करी कारवायांमुळे खैबर पख्तुनख्वामध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्याऐवजी, हजारो पश्तून नागरिक मारले गेले, हजारो बेपत्ता झाले आहेत तसेच लाखो लोक विस्थापित झाले, असे 'हेग जस्टिस डायलॉग-२०२६'मध्ये पश्तीन यांनी आरोप केला.

लष्करावर ते आरोप करीत असताना पाकिस्तानचे प्रतिनिधी आसिफ दुर्रानी आणि त्या देशाच्या राजदूताने कार्यक्रमातून काढता पाय घेतला. खैबर पख्तुनख्वामध्ये कार्यरत असलेल्या दहशतावदी संघटनांची निर्मिती, त्यांना वित्तपुरवठा आणि प्रशिक्षण देण्याचे काम पाकिस्तानी लष्कर आणि गुप्तचर संस्थेने केले आहे, असा सर्वांत गंभीर आरोप त्यांनी केला. पख्तुनख्वामधील प्रत्येक दहशतवादी संघटना पाकिस्तानी लष्कर आणि गुप्तचर संस्थेनेच निर्माण केले, त्यांना निधी आणि प्रशिक्षण दिले, हे सत्य आहे, असे मंझूर पश्तीन यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

### 'फोडा आणि झोडा'चे धोरण



ड्युरांड परिसरात राहणाऱ्या पश्तुनांच्या विरोधात पाकिस्तानी लष्कर 'फोडा आणि झोडा'चे धोरण राबवत असल्याचा आरोप मंझूर पश्तीन यांनी केला. पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेच्या दोन्ही बाजूंना राहणाऱ्या पश्तून समुदायांमध्ये शांतता आणि एकता निर्माण होऊ नये, असा प्रयत्नही पाकिस्तानी लष्कर करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

### खनिजासाठी स्थानिक होताहेत विस्थापित

दहशतवादविरोधी कारवायांच्या नावाखाली स्थानिक समुदायांना त्यांच्या पूर्वजांच्या जमिनीवरून हाकलण्यासाठी खनिजसंपन्न पश्तून प्रदेशांमध्ये छुप्या सशस्त्र गटांच्या माध्यमातून अस्थिरता निर्माण करण्याची जाणीवपूर्वक रणनीती पाकिस्तानी लष्कर राबवत आहे, असा आरोप मंझूर पश्तीन यांनी केला. यामुळे होणारे विस्थापन लष्कराला संबंधित प्रदेशांवर आपले नियंत्रण निर्माण करण्यास तसेच तिथल्या मौल्यवान खनिजांचा आणि धातूंचा ताबा घेण्याची संधी उपलब्ध करून देते.

# उदारमतवाद्यांचे धोरण हिंसेसाठी जबाबदार : व्हान्स

## कट्टरवादी स्थलांतरितांना दया दाखवणे भोवले



**वॉशिंग्टन, १८ ऑक्टोबर**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हॅन्स यांनी फ्रान्समधील दंगली, जाळपोळ आणि लुटालुटीच्या घटनांवर बोलताना म्हटले की, पाश्चात्य उदारमतवाद्यांच्या धोरणामुळे युरोपियन देशांत हिंसा सुरू आहे. पाश्चात्य सरकारे विविधता आणि करुणेच्या नावाखाली धोरणे राबवतात आणि त्याची किंमत सामान्य जनतेला चुकवावी लागत आहे. कट्टरवादी गटाला देशात आश्रय देणे किती घातक असते, हे आंदोलकांनी घडवलेल्या हिंसेतून दिसून येत आहे.

सर्वत्र पसरलेल्या अशांततेदरम्यान लुटारूंनी आलिशान दुकाने आणि सार्वजनिक इमारतींना लक्ष्य केले, तर तेथील सरकार हिंसा थांबवण्यात अपयशी ठरले आहे. देशाची मालमत्ता जनतेची संपत्ती आहे, मात्र अराजकता पसरवणाऱ्यांनी याची जाणीव नाही. पाश्चात्य उदारमतवाद्यांनी विविधता आणि करुणेच्या नावाखाली 'तिसऱ्या जगाला' फ्रान्स आणि इतर देशांमध्ये आयात केले. त्यांनी आत्मसात करणे आणि जुळवून घेणे यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. आम्ही त्यांना आधीच यासंदर्भात इशारा दिला होता, मात्र त्यांनी दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती उद्‌भवली असे व्हान्स यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. फ्रान्स, एक सुंदर देश आहे आणि तेथील लोक, आपल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तू जाळण्याचा वेडेपणा थांबवेल अशी मला आशा आहे.

(वृत्तसंस्था)

### अमेरिकेच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष

दया आणि विविधतेच्या नावाखाली धोरणे राबवताना या देशांनी सामाजिक एकात्मता आणि सुसंगततेचे मूलभूत प्रश्न पूर्णपणे दुर्लक्ष केले. आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या एका 'सिटी हॉल'चा व्हिडीओ शेअर करताना व्हान्स म्हणाले, पाश्चात्य लिबरल्सनी विविधता आणि सहानुभूतीच्या गोंडस नावाखाली फ्रान्स व इतर देशांमध्ये 'तिसरे जग' आयात केले. त्यांना याचे गंभीर परिणाम काय होतील, याचा आधीच इशारा देण्यात आला होता, परंतु त्यांनी कोणाचेही ऐकले नाही.



नियंत्रण रेषेला लागून असलेल्या पीरपंजाल पर्वतराजीच्या परिसरात गुज्जर-बकरवाल समुदायाचे नागरिक मोठ्या प्रमाणात राहतात. शेळ्या-मेंढ्या पाळून हा समुदाय आपला उदहनिर्वाह करतो. चराई क्षेत्रात शेळ्या-मेंढ्या घेऊन जाताना मेंढपाळ

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!

# पाकिस्तानात २०० वर्षे पुरातन मंदिर सील

## व्यावसायिक संकुल उभारण्याविरोधात निदर्शने

**पेशावर, १८ ऑक्टोबर**

व्यावसायिक संकुल उभारण्यासाठी २०० वर्षे जुने हिंदू मंदिर पाडण्याच्या निर्णयाविरोधात हिंदू समुदाय आणि नागरी समाज कार्यकर्त्यांनी निदर्शने केल्यानंतर पाकिस्तानानतील अधिकाऱ्यांनी ते मंदिर सील केले.

पाकिस्तानच्या वायव्य खैबर पख्तुनख्वा प्रांतातील डेरा इस्माईल खान जिल्ह्यात असलेले 'राम लीला मंदिर' शनिवारी स्थानिक प्रशासनाने ताब्यात घेतले आणि त्यानंतर 'इव्हॅक्युई ट्रस्ट प्रॉपर्टी बोर्ड'द्वारे ते सील करण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. डेरा इस्माइल खान शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या रहीम बाजार येथील जागेवर सुरू असलेले पाडकामाचे काम स्थानिक रहिवाशांनी या आठवड्याच्या सुरुवातीला हस्तक्षेप करून थांबवल्यानंतर, हे पाऊल उचलण्यात आले.

पाकिस्तानमधील धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेबाबत आणि अधिकारांबाबत असलेल्या व्यापक चिंतांच्या पृष्ठभूमीवर हा नवा



वाद निर्माण झाला आहे. कामगार इमारत पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचे समजल्यावर इतर रहिवाशांसह मंदिराच्या ठिकाणी धावून गेलो, असे डेरा सिव्हिल सोसायटी आणि स्थानिक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सोहेल अहमद आझमी यांनी सांगितले.

### 'ईटीपीबी'च्या सांस्कृतिक वारशात समावेश

ईटीपीबीने सांस्कृतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या डेरा इस्माईल खानमधील ४०० इमारतींपैकी हे मंदिर आहे. १९४७ च्या फाळणीनंतर भारतात स्थलांतरित झालेल्या लोकांनी मागे सोडलेल्या मालमत्तांचे तसेच अल्पसंख्याक धार्मिक समुदायांच्या विश्वस्त मालमत्तांचे व्यवस्थापन ईटीपीबीद्वारे केले जाते. ही संस्था अनेक हिंदू आणि शीख धार्मिकस्थळांची देखरेख करते.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### राखी सावंतच्या अडचणीत वाढ

**मुंबई:** बॉलिवूड अभिनेत्री राखी सावंतच्या अडचणी वाढल्या आहेत. उत्तर प्रदेशातील झाशी येथील जिल्हा न्यायालयाने राखी सावंतविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. तब्बल १६ वर्षांपूर्वीच्या एका प्रकरणाशी हा खटला संबंधित असून, राखी सावंतच्या 'राखी का इंसाफ' या टीव्ही शोमध्ये सहभागी झालेल्या एका व्यक्तीच्या आत्महत्येप्रकरणी हे प्रकरण चर्चेत आले आहे. नोव्हेंबर २०१० मध्ये झाशीतील प्रेमनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारा एक व्यक्ती आपल्या पत्नीशी असलेला वैवाहिक वाद सोडवण्यासाठी राखी सावंतच्या 'राखी का इंसाफ' या कार्यक्रमात सहभागी झाला होता. या कार्यक्रमात राखी सावंत या जोडप्यातील वाद मिटवण्याचा प्रयत्न करत होत्या. त्यावेळी त्यांनी संबंधित व्यक्तीला 'नामर्द' असे संबोधल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर काही काळातच त्या व्यक्तीने आत्महत्या केली. त्यानंतर या प्रकरणाने कायदेशीर वळण घेतले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १ डिसेंबर रोजी होणार आहे.



### 'लक्ष्या आजही माझ्यात जिवंत'



**मुंबई:** मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर आणि दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांची मैत्री आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. आपल्या अभिनयातून आणि विनोदी शैलीतून या दोघांनीही अनेक वर्षे प्रेक्षकांचे मनोरंजन केले. नुकत्याच एका मुलाखतीत सचिन पिळगांवकर यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याशी संबंधित एक हृदयस्पर्शी आठवण सांगितली. 'नवरा माझा नवसाचा' या लोकप्रिय चित्रपटात लक्ष्मीकांत यांना महत्त्वाची भूमिका द्यायची होती; मात्र, त्यांच्या आजारपणामुळे ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. हा प्रसंग आठवताना सचिन पिळगांवकर भावूक झाले. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याविषयीच्या भावना व्यक्त करताना सचिन पिळगांवकर म्हणाले, लक्ष्या आजही माझ्यात जगतो, इतका तो माझा चांगला मित्र होता. लक्ष्मीकांत आज आपल्यात असते, तर त्यांनी आणखी अनेक चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले असते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. दोघांच्या मैत्रीतील जिव्हाळा आणि लक्ष्मीकांत यांच्याविषयी असलेली आत्मीयता त्यांच्या या शब्दांतून स्पष्ट होते.

### काव्या मारन-रविचंद्रन विवाह बंधणात अडकणार

**मुंबई:** आयपीएल संघ सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच)च्या सीईओ काव्या मारन आणि प्रसिद्ध संगीतकार अनिरुद्ध रविचंद्रन हे जोडपे २० नोव्हेंबरला विवाहबद्ध होणार आहे. दरम्यान, चेन्नईमध्ये २१ नोव्हेंबरला रिसेप्शन आयोजित केले जाणार असल्याचीही चर्चा आहे. अनिरुद्ध रविचंद्रन भारतीय चित्रपटसृष्टीतील एक सुप्रसिद्ध संगीतकार, गायक आणि संगीत निर्माता आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात तमिळ चित्रपटसृष्टीतून केली आणि नंतर हिंदी व तेलुगू चित्रपटांमध्ये काम केले. २०१२ साली प्रदर्शित झालेल्या '३' या चित्रपटातील 'व्हाय धिस कोलावेरी दी' या गाण्यामुळे अनिरुद्धला व्यापक ओळख मिळाली. हे गाणे भारतात आणि परदेशातही लोकप्रिय झाले.



# भारत-पाकिस्तान सीमेवर उभारणार डिजिटल कुंपण

**चंदीगड, १८ ऑक्टोबर**

पंजाबला लागून असलेल्या भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर डिजिटल कुंपणाचे काम सुरू झाले आहे. घुसखोरी, शस्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. यामुळे सीमापार घुसखोरीच्या कारवायांनाही आळा बसेल. पंजाबला लागून असलेल्या दोन्ही देशांमधील सीमेवर अनेक ठिकाणी हे कुंपण बसवण्यात आले आहे.

सूत्रांनुसार, पारंपरिक कुंपणाला अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत जोडून निगराणी अधिक मजबूत करणे हा याचा उद्देश आहे. यामध्ये सेन्सर्स, थर्मल कॅमेरे, लेझर तंत्रज्ञान आणि ड्रोनविरोधी प्रणालीचा समावेश आहे. पंजाबला लागून असलेल्या, सुमारे ५०० किलोमीटर लांबीच्या भारत-पाकिस्तान सीमेच्या अनेक भागांमध्ये हे कुंपण बसवण्यात आले आहे. ते शत्रूची प्रत्येक हालचाल शोधून काढेल.

हे कुंपण विविध सेन्सर्सनी सुसज्ज आहे. हे सेन्सर्स जमिनीवरील हालचाल, कुंपणाशी छेडछाड किंवा



संशयास्पद हालचाली दर्शवतात. थर्मल इमेजिंग आणि नाईट-व्हिजन कॅमेरे अंधारातही निरीक्षण करतात. हे कॅमेरे हिवाळ्यातील दाट धुके आणि खराब हवामानातही उपयुक्त ठरतील. यामध्ये लेझर अलार्म आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचाही समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

### जमिनीपासून आकाशाकडे एक सरळ भिंत

सीमेवर कुंपण बसवण्यापूर्वी जमिनीवर काँक्रीटचा पाया तयार केला जातो. त्यानंतर, त्या काँक्रीटवर सुमारे दहा फूट उंचीचे लोखंडी कुंपण उभारले जाते. त्यावर कोब्रा वायरची जाळी टाकली जाते. या कुंपणाला लहान छिद्रे असतात. दुरून पाहिल्यास, कुंपणाच्या पलीकडे काहीही स्पष्टपणे दिसत नाही. ही जमिनीपासून आकाशाकडे एक सरळ भिंत असते. जुने कुंपण (काटेरी तार) चार ते सहा फूट रुंद आणि आठ फूट उंच होते. त्यामुळे आतले सर्व काही स्पष्ट दिसत असे. त्यातून प्लॅस्टिकच्या नळ्या घालून भारतीय सीमेवर हेरॉईनची पाकिटे टाकली जाऊ शकत होती. मात्र, आता डिजिटल कुंपण प्लॅस्टिकच्या नळ्यांनी भेदले जाऊ शकणार नाही.

## पाकिस्तानी हवाई हद्दीत भारतीय विमानांना बंदी

**इस्लामाबाद, १८ ऑक्टोबर**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हवाई हद्दीचा वाद पुन्हा वाढला आहे. पाकिस्तानने भारतीय नोंदणीकृत विमानांना आणि भारतीय एअरलाइन्सच्या विमानांना आपल्या हवाई हद्दीत प्रवेश करण्यावर असलेली बंदी आणखी एका महिन्यासाठी वाढवली आहे. ही बंदी आता २४ नोव्हेंबपर्यंत लागू राहील.

पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाने शनिवारी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टमध्ये हा निर्णय जाहीर केला. प्राधिकरणानुसार, ही बंदी केवळ सामान्य प्रवासी विमानांनाच नाही, तर लष्करी उड्डाणांनाही लागू होईल. नवीन मुदतीनुसार ही बंदी २४ नोव्हेंबर रोजी पहाटे ४:५९ पर्यंत लागू राहील. ही बंदी उठवली जाईल की वाढवली जाईल, याचा निर्णय नंतर घेतला जाईल.

विशेष म्हणजे, हवाई हद्द बंद करण्याचा निर्णय सर्वप्रथम २३ एप्रिल २०२५ रोजी घेण्यात आला होता. तेव्हापासून, दोन्ही देशांमधील सततच्या तणावामुळे पाकिस्तानने ही बंदी अनेकदा वाढवली आहे. भारतीय विमानांना पाकिस्तानी हवाई हद्दीत उड्डाण करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे पाकिस्तानी हवाई दलाने स्पष्ट केले आहे.

(वृत्तसंस्था)

# हल्ला झाल्यास किंमत चुकवावी लागेल

## इराणच्या नव्या संरक्षणमंत्र्यांचा अमेरिकेला इशारा

**हरान, १८ ऑक्टोबर**

अमेरिकेने इराणविरुद्ध पुन्हा लष्करी कारवाईचा भाग म्हणून हल्ले केल्यास त्यांना आणि त्यांच्या मित्र देशांना मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा इराणचे नवनियुक्त संरक्षणमंत्री, मेहरदाद अखलाघी यांनी दिला. आमची क्षेपणास्त्रे आखाती देशांचे ऊर्जा प्रतिष्ठाणांच्या दिशेने असून, काही मिनिटातच विध्वंस घडवण्याची क्षमता इराणमध्ये असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

इराणच्या इस्लामिक सल्लागार सभेने मेहरदाद अखलाघी यांना संरक्षण आणि सशस्त्र दल रसद मंत्री म्हणून मान्यता दिली आहे. अखलाघी यांना एकूण २७७ पैकी २३७ मते मिळाली. पदावर नियुक्तीची घोषणा झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, इराणी लोकांनी निश्चिंत राहावे, अमेरिका आणि त्यांचे मित्र राष्ट्रे आमच्यावर हल्ला करण्याचे धाडस करणार नाहीत. जर त्यांनी तसे केले, तर त्यांच्या संपूर्ण प्रदेशाचे मोठे नुकसान होईल. मी अत्यंत संवेदनशील टप्प्यावर संरक्षण मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारत आहेत. देशाच्या संरक्षणासाठी आणि भविष्यातील सर्व संभाव्य परिस्थितींसाठी तयारी करण्याला प्राधान्य आहे. अमेरिकेने आमचा सात कलमी शांतता प्रस्ताव मान्य केल्यावर त्यांच्यासोबत करार होईल, अन्यथा संघर्षासाठी आमचे सैन्य सज्ज आहे. कोणाच्याही दबावात आम्ही माघार घेणार नाही.

(वृत्तसंस्था)

### ४२ वर्षांचा प्रशासकीय अनुभव

मेहरदाद अखलाघी यांच्याकडे कोणतेही लष्करी पद नाही, परंतु त्यांना संरक्षण मंत्रालयात ४२ वर्षांचा अनुभव आहे. ते २०१३ पासून इराणची आघाडीची शस्त्रनिर्माता संस्था असलेल्या 'इराणी डिफेन्स इंडस्ट्रीज ऑर्गनायझेशन'चे प्रमुख आहेत. अणु आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कारवायांमध्ये सहभाग असल्याच्या आरोपांमुळे संयुक्त राष्ट्रांनी २००७ मध्ये अखलाघी यांच्यावर निर्बंधही लादले होते.

# रशिया-अमेरिका उभारणार डेटा सेंटर्स

## आर्थिक संबंध दृढ करण्यावर भर

**मॉस्को, १८ ऑक्टोबर**

रशिया आणि अमेरिकेत डिझेल खरेदीचा करार अंतिम झाल्यानंतर आता दोन्ही देश रशियन अणुऊर्जेवर चालणाऱ्या संभाव्य संयुक्त डेटा सेंटर प्रकल्प उभारण्यावर चर्चा करत आहे. हा प्रस्ताव अलीकडील डिझेल करारानंतर आला असून, द्विपक्षीय आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यावर त्यांचा भर असल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे गुंतवणूक दूत, किरिल दिमित्रीव्ह यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना दिली.

आधुनिक डेटा इन्फ्रास्ट्रक्चरच्या वेगाने वाढणाऱ्या ऊर्जेची मागणी पूर्ण करण्यासाठी, लहान मॉड्युलर अणुभट्ट्यांसह रशियन अणुऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या विजेचा वापर करू शकणाऱ्या सुविधांचा प्राथमिक चर्चेत समावेश असल्याचे दिमित्रीव्ह यांनी सांगितले.



रशिया आणि अमेरिका लवकरच नवीन करारांची घोषणा करणार आहे. दोन्ही बाजू डेटा सेंटर्सवर एकत्र काम करण्याच्या शक्यतेवर विचार करत आहेत. युक्रेनमधील मॉस्कोची विशेष लष्करी मोहीम संपण्यापूर्वी करार प्रत्यक्षात येईल. अमेरिका आणि रशिया यांच्यातील मैत्री जागतिक परिस्थितीला नवी दिशा देणारी असेल. डेटा सेंटर्सशिवाय इतर करारावर देखील वाटाघाटी सुरू आहे, असे दिमित्रीव्ह यांनी स्पष्ट केले.

(वृत्तसंस्था)

# परिणामांच्या विश्लेषणासाठी निर्बंध स्थगित

## अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांची माहिती

**वॉशिंग्टन, १८ ऑक्टोबर**

रशियन तेल खरेदीवरील निर्बंधांवर सूट दिल्यास होणाऱ्या जागतिक परिणामांचे विश्लेषण करण्यासाठी ६० दिवसांसाठी ही सवलत देण्यात आली, अशी माहिती अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी दिली.

उझबेकिस्तान आणि भारताच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी जॉइंट बेस अँ*ूज येथे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना मार्को रुबिओ यांनी उपरोक्त माहिती दिली. रशिया आणि इराणवरील निर्बंधांशी संबंधित कायद्यांतर्गत ट्रम्प यांनी दिलेल्या सवलतींच्या संदर्भात राष्ट्राध्यक्षांना ६० दिवसांचा कालावधी द्यायची इच्छा होती. या काळात ते निर्बंध आणि शुल्क लागू केल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर तसेच अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर काय परिमाण होतील, याचे विश्लेषण त्यांना करायचे आहे, असे रबिओ यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



शुक्रवारी ट्रम्प यांनी 'ग्रॅहम ॲक्ट'मधील महत्त्वाच्या तरतुदी शिथिल केल्या. यात रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर दंडात्मक शुल्क आकारण्यास अधिकृत परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भारताला दिलासा मिळाला आहे. राष्ट्राध्यक्ष किंवा अर्थमंत्री आणि व्यापार प्रतिनिधींसोबत सल्लामसलत करून पुढील कार्यवाही करणे योग्य आहे, असा निर्णय घेत नाही, तोपर्यंत सवलतीचा हा आदेश लागू राहील, असे ट्रम्प यांनी शुक्रवारी स्वाक्षरी केलेल्या आदेशात म्हटले आहे. ग्रॅहम कायदा मंजूर झाला, त्यावेळी इराण युद्धामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर आलेला दबाव, सौदी अरबवर हुथींचा हल्ला आणि युक्रेन-रशिया युद्ध यासारख्या जगभरात घडणाऱ्या विविध गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी सवलती देण्यात आल्या होत्या, असे रुबिओ यांनी सांगितले. तुम्हाला या स्त्रव गोष्टींचा विचार करून त्यांचे तुलनात्मक मूल्यमापन करावे लागले, असे रुबिओ म्हणाले.

(वृत्तसंस्था)

### भारत महत्त्वाचा मित्र

भारत हा अमेरिकेचा एक महत्त्वाचा मित्र आणि भागीदार आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींचा अभ्यास करून योग्य तो समन्वय काय असावा, हे ठरवण्यासाठी राष्ट्राध्यक्षांना काही कालावधीची आवश्यकता आहे. दुसरीकडे रशियावरील निर्बंध शिथील करण्याच्या ट्रम्प यांच्या निर्णयावर रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅट्सने प्रचंड टीका केली आहे.

## अग्रलेख

# आंतरजालाचा घातक विळखा

साधारण महिनाभरापूर्वीची गोष्ट. अमेरिकी संसदेच्या प्रतिनिधिगृहातील सदस्या प्रमिला जयपाल यांनी 'बिग टेक अॅण्ड सर्व्हिलन्स एआय शॅडो हिअरिंग' या नावाने नवतंत्रज्ञानाच्या धोक्यांबाबत एका सुनावणीचे आयोजन केले होते. त्यावेळी लैला टर्नर स्कॉट या महिलेने आपल्या १९ वर्षीय मुलाच्या मृत्यूची हादरवून टाकणारी कहाणी कथन केली. लैला यांचा मुलगा सॅम हासुद्धा इतर मुलांप्रमाणे चॅट-जीपीटी वापरत होता. एकदा त्याने चॅट-जीपीटीला, 'शरीराचे नुकसान होऊ न देता नशेची तीव्रता कशी वाढवता येईल?' असे विचारले. त्यावर चॅट-जीपीटीने, 'आपण याचे उत्तर देऊ शकत नाही,' असे सांगत संवाद बंद केला. पण, काही दिवसांतच चॅट-जीपीटीने वापरकर्त्यांचा सहभाग वाढवणारे पुढचे व्हर्जन आणले. मग चॅट-जीपीटीचा हा नवा अवतार आणि सॅम एकमेकांशी मित्रासारखे गप्पा मारू लागले. सॅमने एकदा त्याला पुन्हा तोच- नशा वाढवण्याबाबतचा प्रश्न विचारला. यावेळी मात्र चॅट-जीपीटीने सॅमला तीव्र नशेसाठी क्रॅटोम, झॅनेक्स आणि मद्य एकत्रित घेण्यास सांगितले. सॅमने कोणताही विचार न करता त्याचे ऐकले. या घातक मिश्रणाचा भयानक परिणाम झाला. काही वेळातच श्वास बंद पडून सॅमचा मृत्यू झाला... अमर्यादित इंटरनेट आणि अनियंत्रित कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या अतिरेकी, विवेकहीन वापरातून काय घडू शकते, याचे हे डोळे उघडणारे उदाहरण. ही घटना अमेरिकेतील आहे म्हणून तिच्याकडे आज आपण दुर्लक्ष केले, तर कदाचित उद्या आपल्या घराघरांतील मुलांच्या बाबतीतही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अशी वेळ येऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निर्णयामुळे तर या विषयाकडे खूप गंभीरपणे आणि अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. इंटरनेटचा वापर हा मुलांसह सर्वांसाठी मूलभूत अधिकारांचा अविभाज्य भाग असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. किशोरवयीन मुलांच्या इंटरनेट वापरावर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका निकाली काढताना न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाला संविधानाच्या कलम २१ आणि १९ (१) अ यांचा आधार घेतला आहे. या निर्णयाने न्यायाच्या तत्त्वाचे पालन होत असले, तरी हा विषय तेवढ्यापुरता मर्यादित नाही. मोठ्यांप्रमाणे मुलांनाही इंटरनेटचा मुक्त वापर करण्याची मुभा देण्याचे जसे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. किंबहुना, आजच्या पिढीतील मुलांची बौद्धिक क्षमता, त्यांची मानसिकता आणि सॅमसारख्या मुलांच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांचा विचार केला, तर इंटरनेटचा सरसकट किंवा अतिरेकी वापर हानिकारकच ठरण्याची शक्यता अधिक आहे.

या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे केवळ संवैधानिक दृष्टिकोनातून न पाहता त्याच्या नैतिक आणि सामाजिक परिणामांकडेही लक्ष दिले पाहिजे. न्यायालयाचा दृष्टिकोन संवैधानिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असला, तरी मुलांना इंटरनेटवरील सर्वच प्रकारचा कंटेन्ट मुक्तपणे उपलब्ध व्हावा, असा त्याचा अर्थ नाही. इंटरनेटचा वापर हा अधिकार असू शकतो; पण त्याच्या आडून मुलांचे बालपण, मानसिक स्वास्थ्य आणि नैतिक जडणघडण धोक्यात घालता येणार नाही. त्या दृष्टीने न्यायालयाने या निर्णयासोबत दिलेले काही निर्देश महत्त्वाचे आहेत. मुलांचे ऑनलाईन लैंगिक शोषण रोखण्यासाठी केंद्र सरकार आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सनी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे न्यायालयाने म्हटले आहे. अर्थात, अशा उपायांची अपेक्षा करण्याआधी इंटरनेट सेवा पुरवठादारांपासून ते सोशल मीडिया कंपन्या तसेच एआय आधारित अॅप्स आणि टूल्स तयार करणाऱ्या कंपन्यांपर्यंत सर्व संबंधित घटकांचे नियमन करण्यासाठी किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने आजवर काय केले, हेही पाहावे लागेल. केंद्र सरकारने २०१८ मध्ये ८२७ पॉर्न वेबसाईट अर्थात अश्लील संकेतस्थळे ब्लॉक करण्याचे आदेश दिले होते. त्याशिवाय, गेल्या दोन वर्षांत अश्लील आणि प्रौढांसाठी असलेला कंटेन्ट प्रसारित करणाऱ्या जवळपास ५० ओटीटी प्लॅटफॉर्म आणि अॅपवर बंदी घातली आहे. मात्र, त्यानंतरही अशा कंटेन्टचा प्रसार पूर्णपणे थांबलेला नाही. वेबसाईटचे अॅड्रेस बदलणे, नव्या ब्राउझरवर किंवा प्लॅटफॉर्मवर असा कंटेन्ट अपलोड करणे आणि अन्य देशांतील सर्व्हरचा वापर यामुळे अशा बंदीला बऱ्याच मर्यादा येतात. ब्राउझरमधील इन्कॉग्निटो मोडमुळे तर ब्राउझिंग हिस्ट्रीची कुठेही नोंद होत नाही. डार्क वेबच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात अश्लील कंटेन्टचा प्रसार होतो. एआयच्या मदतीने तयार होणारे डीपफेक व्हिडीओ तसेच बनावट अश्लील फोटोंमुळे निरपराध मुलांचे मानसिक शोषण झाल्याचेही अनेकदा समोर येते. बदनामी, ब्लॅकमेलिंग आणि सायबर छळासाठी अशा कंटेन्टचा आजकाल सर्रास वापर होत आहे. ऑनलाईन शोषणामुळे मुलांनी आत्महत्या केल्याच्या, चॅटबॉटने दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे त्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना या प्रकाराचे गांभीर्य आणखी वाढवणाऱ्या आहेत. दुसरीकडे, सोशल मीडियावरील खोटी माहिती, देशविरोधी षडयंत्राला पुढे नेणारे नरेटिव्ह आणि तथाकथित 'डीप स्टेट'बाबतच्या बोगस कंटेन्टमुळे मुलांच्या विचारप्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. माहितीची सत्यता न तपासता ती सरसकट स्वीकारण्याची सवय लागणे, हे उद्याच्या सद्सदविवेकी समाजासाठी धोकादायक ठरू शकते.

अशा स्थितीत काळजी वाढवणारी गोष्ट म्हणजे, नव्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत काही पटींनी पुढे असलेल्या आपल्या मुलांच्या हातात अमर्याद इंटरनेट असलेले अद्ययावत मोबाईल आहेत आणि त्यांना अशा प्रकारच्या सगळ्या बऱ्या-वाईट कंटेन्टचा अनियंत्रित 'अॅक्सेस' आहे. त्यामुळे इंटरनेटची अनिर्बंध उपलब्धता आणि त्यातूनच धोक्यात येत असलेली व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक नैतिकता, या दोन्हींचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. इंटरनेटच्या माध्यमातून अश्लील स्वरूपाचा, लैंगिक शोषण करणारा, फसवणूक किंवा दिशाभूल करणारा, डीपफेक स्वरूपाचे नरेटिव्ह असलेला कंटेन्ट प्रसारित होऊ नये, यासाठी सरकार साधारणपणे बंदी घालण्यासारखे उपाय अवलंबते. अर्थात, ज्यावर बंदी घातली जाते, त्याच गोष्टीची मागणी वाढते. मुलांच्या बाबतीत तर अशी मागणी वाढण्याचे प्रमाण काही पटींनी जास्त असू शकते. बंदी आणि निर्बंधांच्या भस्मासुरासारख्या उलटणाऱ्या उपायांपेक्षा संबंधित कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे, धोकादायक कंटेन्टचा प्रसार रोखणे आणि त्याचवेळी पालकांनाही सजग करणे, हे उपाय अधिक प्रभावी ठरू शकतात. त्या दृष्टीने कुटुंबांकडून आणि शाळांमधून मुलांना इंटरनेट आणि त्यामागून येणाऱ्या धोक्यांविषयी योग्य वयात नेमकी माहिती दिली जाणे आवश्यक आहे. आजच्या काळात इंटरनेटचा वापर अपरिहार्य असला, तरी त्याच्या दुष्परिणामांपासून आपल्या मुलांना वाचविण्याची जबाबदारी ही समाज म्हणून सामूहिक स्वरूपाची आहे. ती प्रत्येक घराची आहे. नियमन-नियंत्रणाच्या दृष्टीने ही जबाबदारी सरकार आणि तंत्रज्ञान कंपन्यांवर असली, तरी नैतिक-विवेकी आचरणाच्या दृष्टीने ती एकूणच समाजावरही आहे. त्यामुळे तंत्रज्ञान वापराच्या बाबतीत पालक आणि शाळांकडून मुलांवर होणाऱ्या मूल्यसंस्कारांचे महत्त्व काही पटींनी वाढले आहे. आपल्या देशात इंटरनेट सेवा तुलनेने स्वस्त आणि मुबलक मिळत असली, तरी 'अनलिमिटेड डेटा' हा प्रकार मुळावर येऊ शकतो. त्यामुळे इंटरनेटचा मर्यादित आणि आवश्यक तेवढाच वापर करण्याची सवय मुलांना लावावी लागेल. त्यांचा स्क्रीन टाईम, ते पाहत असलेला कंटेन्ट, त्यांचे ऑनलाईन मित्र याविषयी पालक आणि शाळांनीही जागरूक राहणे आवश्यक आहे. सरकार, समाज आणि पालक या तिन्ही घटकांनी वेळीच सावध होत पावले उचलली, तर पुढच्या पिढीला आंतरजालाच्या या घातक विळख्यापासून वाचवता येईल. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# आ बैल मुझे मार!

'आ बैल मुझे मार!' सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा नेत विरोधी पक्षांनी हे साध्य केले. विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा नेला असता तर त्यात काही वावगे नव्हते. त्यांना तो अधिकार आहे. निवडणूक आयोगाला निवेदन देण्याचाही अधिकार विरोधी पक्षांना आहे. पण, सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा नेत विरोधी पक्षांनी चूक केली ही बाब काही विरोधी नेते खाजगीत मान्य करतात. सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजावर वेळोवेळी टीकाटिप्पणी होत आली आहे. प्रत्येक देशातील सर्वोच्च न्यायालयाबाबत हे होत आले आहे. मात्र, न्यायालयावर मोर्चा ही बाब न पटणारी आहे. पोलिसांनी हा मोर्चा अडविला. उद्या या मोर्चातील युवा न्यायालयाच्या परिसरात शिरले असते तर अभूतपूर्व स्थिती तयार झाली असती. आता सर्वोच्च न्यायालयाने या मोर्चाची गंभीर दखल घेतली असून मोर्चाच्या आयोजकांना स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे.

**विरोधी नेत्यांचे पत्र :** विरोधी नेत्यांनी अशाच प्रकारची एक चूक काही वर्षांपूर्वी केली होती. विरोधी पक्षांनी तत्कालीन सरन्यायाधीश न्या. चंद्रचूड यांना एक पत्र पाठवून फक्त विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच प्रवर्तन निदेशालय, आयकर विभाग यांची कारवाई होत असल्याची तक्रार केली होती. सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घ्यावी अशी विनंती त्या पत्रात करण्यात आली होती. न्या. चंद्रचूड यांनी ती विनंती फेटाळून लावली होती. विरोधी पक्षांनी हे पत्र का व कसे पाठविले होते याची कल्पना नाही. कारण, कोणताही सरन्यायाधीश ते स्वीकारू शकत नव्हता. याउलट विरोधी पक्षांनी आपले म्हणणे, त्यातील मुद्दे, त्याला पुष्टी देणारे पुरावे यासह एक याचिका दाखल करावयास हवी होती. असे पत्र पाठविणे हा एक हास्यास्पद प्रकार होता.

**सरन्यायाधीशांचा निर्णय :** दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी आंदोलन सुरू केले आहे. त्याच प्रक्रियेत विरोधी पक्षांनी सरन्यायाधीश न्या. सूर्यकांत यांची भेट मागितली. ती त्यांनी नाकारली. विरोधी पक्षांच्या शिष्टमंडळास न भेटण्याचा निर्णय सरन्यायाधीशांनी घेतला. हा निर्णय अगदी योग्य आहे. उद्या सत्ताधारी पक्षाच्या शिष्टमंडळाने सरन्यायाधीशांना भेटण्याची वेळ मागितल्यास, त्याबाबतही सरन्यायाधीश असाच निर्णय घेतील. देशाच्या इतिहासात आजवर कोणत्याही सरन्यायाधीशाने, न्यायाधीशाने वा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने कोणत्याही राजकीय शिष्टमंडळास भेट दिल्याचे ऐकिवात नाही. सरन्यायाधीश वा न्यायाधीश त्यांच्यासमोर दाखल होणाऱ्या याचिकांवर बोलत असतात. आपल्या निवाड्यांमधून बोलत असतात. त्यांच्या निवाड्यात त्यांच्या भूमिकांचे प्रतिबिंब पडलेले असते. सरन्यायाधीशांनी राजकीय शिष्टमंडळांना भेटण्याची परंपरा सुरू केली तर ती एक घातक परंपरा असेल आणि त्याच दिवशी न्यायपालिकेची तटस्थता अधिकृतपणे संपुष्टात आलेली असेल.

**लक्ष्मणरेषा :** सरकार, राजकीय पक्ष आणि न्यायपालिका यांच्यात एक लक्ष्मणरेषा राहत आलेली आहे. सरन्यायाधीशांनी त्याचे पालन करीत योग्य तोच निर्णय घेतला आहे. काही सरन्यायाधीशांनी आपल्या पदाची शान राखण्यासाठी राजकीय वा सत्ताधारी नेत्यांकडून साधा पुष्पगुच्छही स्वीकारण्यास नकार दिला आहे. यासंदर्भात स्व. सरन्यायाधीश न्या. कापडिया यांचा उल्लेख करता येईल.

**विरोधकांचा अधिकार :** लोकशाहीत विरोधी पक्षांजवळ संसद, जनसंसद, सर्वोच्च न्यायालये अशी वेगवेगळी व्यासपीठे उपलब्ध असतात. आणि यातील सर्वांत महत्त्वाचे व निर्णायक व्यासपीठ म्हणजे जनतेचा कौल. पण, आता त्याबाबतच विरोधी पक्षांना संशय वाटत असल्याने एक वेगळी स्थिती निर्माण होत आहे. विरोधी पक्षांनी आपली भूमिका पुराव्यासह सर्वोच्च न्यायालय व निवडणूक आयोगासमोर मांडली पाहिजे.

**शालीन भाषा :** विरोधी पक्षांना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्याबाबत आक्षेप असू शकतात. पण ते मांडताना ज्ञानेशकुमार यांचा उल्लेख एकेरी भाषेत व्हावयास नको. ते प्रगल्भ व परिपक्व लोकशाहीचे चिन्ह मानता येणार नाही.

**हटविणे अशक्य? :** विरोधी पक्षांनी निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधातील आंदोलन चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, दसरा होईपर्यंत आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. पेपरफूट प्रकरणात पंतप्रधानांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला होता. पण, ज्ञानेशकुमार यांना ते तसे सांगू शकत नाही. तसा अधिकार पंतप्रधान वा सरकारला नाही. यात विरोधी पक्षांजवळ असेलेला एकमेव पर्याय म्हणजे ज्ञानेशकुमार यांच्यावर महाअभियोगाचा ठपका ठेवणे. त्यासाठी लोकसभा-राज्यसभा खासदारांनी आपापल्या अध्यक्षांना पत्र देणे. अध्यक्षांनी प्रकरणाच्या चौकशीसाठी एक समिती नेमणे. समितीने मुख्य निवडणूक आयुक्तांची चौकशी करणे. नंतर चौकशी अहवालावर संसदेत चर्चा व मतदान घडवून आणणे आणि तो दोन तृतीयांश मतदानाने पारित करविणे.

ज्ञानेशकुमार यांना हटविण्यासाठी विरोधी नेत्यांना ही प्रक्रिया अवलंबवावी लागेल. अन्य कोणत्याही मार्गाने मुख्य निवडणूक आयुक्तांना हटविले जाऊ शकत नाही.

**...छू मंतर :** जंतर मंतर छू मंतर होणार हे याच स्तंभात सांगण्यात आले होते. अखेर जंतर मंतर छू मंतर झाले. दिल्ली पोलिसांनी राजधानीत आंदोलन करण्याच्या स्थळांमधून जंतर मंतर वगळले असून, आता रामलीला मैदान, बुराडी मैदान, सीबीडी मैदान या तीन मैदानांवर आंदोलन करता येईल. यातील रामलीला मैदान ऐतिहासिक आहे. जुनी दिल्ली आणि नवी दिल्ली यांना सांधणारे हे मैदान १९७७ च्या लोकसभा निवडणुका घोषित झाल्यावर जनता पार्टीच्या पहिल्या जाहीर सभेचे साक्षीदार राहिले आहे, तर बुराडी मैदान थेट जी. टी. कर्नाल रोडवर म्हणजे हरयाणाच्या दिशेने बरेच लांब आहे. काही वर्षांपूर्वी काँग्रेसचे एक अधिवेशन या मैदानावर झाले होते. मागील काही वर्षांपासून धार्मिक आयोजनांसाठी या मैदानाचा वापर केला जातो, तर सीबीडी मैदान पूर्व दिल्लीत आहे.

**जंतर मंतर :** जंतर मंतर हे काही मैदान नाही. तो एक डांबरी रस्ता आहे. या जागेपासून महत्त्वाची सरकारी कार्यालये फार जवळ आहेत. येथील परिस्थिती हाताळणे पोलिसांसाठी फार संवेदनशील काम ठरत होते. त्यामुळे मागील काही वर्षांपासून आंदोलनासाठी वापरली जाणारी जंतर मंतर ही 'आंदोलनाची जागा' संपुष्टात येणार हे दिसत होते. तसे झालेही.

**बोट क्लबनंतर... :** नवी दिल्लीतील ऐतिहासिक बोट क्लब कधी काळी आंदोलनाचे, राजकीय सभा यांचे ठिकाण होते. पण, किसान आंदोलनाला हिंसेचे गालबोट लागल्यानंतर २५ वर्षांपूर्वी केंद्र सरकारने बोट क्लबवरील सभा-मेळावे बंद केले आणि लहान-सहान आंदोलनासाठी जंतर मंतरची जागा ठरविली. पण, आता दररोजच जंतर मंतरवर आंदोलन होणार असेल तर दिल्ली पोलिस असे आंदोलन हाताळू शकणार नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे जंतर मंतरवर कोणत्याही आंदोलनास परवानगी न देण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल असे वाटत होते. याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिकाही दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेत जंतर मंतरवरील आंदोलने रोखण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली होती. त्या याचिकेवर सुनावणी होण्यापूर्वीच केंद्र सरकारने जंतर मंतरबाबत निर्णय घेत या जागेवर कोणत्याही आंदोलनाचा परवानगी न देण्याचा निर्णय घेतला. आणि आंदोलनाचे एक स्थान म्हणजे जंतर मंतर इतिहासजमा झाले. ■

## श्री नवरात्र उत्सव

**दीपक गो. देशमुख**

# कुलस्वामिनी अंबा

**नववी माळ**

पुराणकथेनुसार, महिषासुर नावाचा एक महाभयंकर राक्षस असुरांचा राजा होता. तो रंभ नावाच्या असुराचा आणि म्हशीचा पुत्र होता. ऋषी कश्यपाचा तो नातू असल्याचेही कथांमध्ये सांगितले जाते. वृत्तीने आणि कृतीने जातिवंत राक्षस असलेला महिषासुर इच्छेनुसार कधी मनुष्यरूप, तर कधी रेड्याचे रूप धारण करू शकत असे. त्यामुळे त्याला महिषासुर असे नाव प्राप्त झाले. महिषासुराने ब्रह्मदेवाची कठोर आराधना करून त्यांना प्रसन्न करून घेतले आणि कोणत्याही पुरुषाच्या हातून आपला मृत्यू किंवा पराभव होऊ नये, असे वरदान प्राप्त केले. वरदान मिळाल्यानंतर उन्मत्त झालेल्या महिषासुराने स्वर्गलोकावर आक्रमण करून इंद्रदेवासह सर्व देवांना स्वर्गातून हाकलून दिले. त्याच्या आक्रमकतेमुळे स्वर्ग, मृत्युलोक आणि पाताळलोक असे तिन्ही लोक भयभीत झाले. "माझा मृत्यू कोणताही पुरुष करू शकणार नाही आणि कोणत्याही स्त्रीला माझ्यासमोर येण्याची हिंमत होणार नाही," असा त्याला गर्व झाला होता.

महिषासुराच्या अत्याचारांपासून त्रस्त झालेल्या देवतांनी आदिशक्तीची आराधना केली. देवांच्या विनंतीवरून देवीने उग्र आणि प्रचंड शक्तिस्वरूप धारण केले. देवीने सलग नऊ दिवस महिषासुराशी घनघोर युद्ध केले आणि अखेर त्याचा पराभव करून वध केला. महिषासुराचा वध केल्यामुळे देवीला 'महिषासुरमर्दिनी' हे नाव प्राप्त झाले. या दिवशी मातेने सर्वांचीच या महाकाय संकटातून सुटका केली आणि अधर्मावर धर्माचा, असत्यावर सत्याचा आणि अत्याचारावर न्यायाचा विजय प्रस्थापित केला.



माता जगदंबेने विविध रूपे धारण करून समाजातील सज्जनशक्ती वाढविली आणि धर्मावरचा उडत चाललेला विश्वास पुन्हा दृढ केला. आदिशक्ती किती विविध रूपांत आणि अवतारांत प्रकट झाली, याची सुंदर गुंफण विष्णुकवींनी आपल्या आरतीत केली आहे. कुलस्वामिनी अंबेच्या महिम्याचे आणि तिच्या पराक्रमाचे सार्थ वर्णन करणारी ही आरती भक्तांच्या मनात श्रद्धा आणि अभिमान जागवते.

**श्री आदि माया जगदंबा । रेणुका कुलस्वामिनी अंबा ॥धृ॥**
**जागृत करुनी निरंकारा । निर्गुण आणिले आकारा ।**
**त्रिविध गुण लावुनी संसारा । रचिला जगडंबर सारा ॥**
**भू-जल-गगन-तेज-वारा । बहु तत्त्वांचा परिवार ।**
**चाल-उत्पत्ती-स्थिती-संहारा । लाविले इने विधी-हरिहरा ॥**
**करुनि परिमाण । केले निर्माण जगाचे प्राण ।**
**सकलसृष्टी मूलभूत अंबा । रेणुका कुलस्वामिनी अंबा ॥१॥**
**दुर्लभ जय देवी दिला । दुर्जय महिषासुर वधिला ।**
**रक्ते क्षितिपट रंगविला । सहस्त्रार्जुन घट भंगियला ॥**
**कटकट लावुनी लंकेला । कुलासह राक्षस क्षय केला ।**
**चौ-द्रुपदपुरी जाहली याज्ञसेनी । करुनी वीर विरहित अवनी ॥**
**उत्तरला भार । शौर्य अपार । लागेना पार ।**
**सुरवर मानिती अंबा । रेणुका कुलस्वामिनी अंबा ॥२॥**

माता रेणुका, कुलस्वामिनी अंबा ही केवळ एका कुटुंबाची किंवा एका समाजाची आराध्य देवता नसून, शक्ती, धैर्य, धर्म, न्याय आणि संरक्षण यांचे प्रतीक आहे. महिषासुरमर्दिनीच्या रूपातून ती अधर्माचा नाश करून सज्जनांचे रक्षण करते. म्हणूनच भक्तांच्या मनात तिच्याविषयीची श्रद्धा अनादिकाळापासून अखंड आणि अढळ राहिली आहे. ■

उमरखेड. ९४०३६०८११५

## कानोसा

**डॉ. अमोल पुसदकर**

# वैचारिक सीमोल्लंघनाची आवश्यकता

विजयादशमी हा केवळ सण नाही, तर विजयाचा, पराक्रमाचा आणि नव्या संकल्पाचा उत्सव आहे. भारतीय संस्कृतीमध्ये विजयादशमीला विशेष महत्त्व आहे. श्रीरामांनी रावणावर मिळविलेला विजय हा सत्याचा असत्यावर, धर्माचा अधर्मावर आणि सद्गुणांचा दुर्गुणांवर झालेला विजय मानला जातो. आपले सगळे सण उत्सव हे कुठलातरी संदेश व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांना देत असतात. विजयाची कामना प्रत्येकालाच असते आणि असली पाहिजे परंतु तो विजय कधी सोपा राहील तर कधी अशक्यप्राय राहील. परंतु व्यक्तीने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे या विजयासाठी आवश्यक असते.

"टूटे हुए सपनों की सुने कौन सिसकी" एखादे काम का झाले नाही याचे खूप सारे कारण सांगितल्याने काम झाले नाही हा परिणाम बदलत नाही. त्यामुळे जगाला एखादी गोष्ट का होऊ शकली नाही यापेक्षा ती कशी केली गेली, ती पूर्ण करण्यासाठी काय प्रयत्न केले गेले हे ऐकणे नेहमीच चांगले वाटते. साधन संपन्न, शस्त्र संपन्न, वैभव संपन्न पराक्रमी रावणावर वानरांचे सैन्य असलेल्या, युद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला रथ सुद्धा ज्यांच्याजवळ नव्हता अशा श्रीरामांनी विजय मिळवला. सीतेच्या, एका महिलेच्या, सन्मानासाठी लाखो लोक लढले ही पण मोठीच गोष्ट आहे. ही गोष्ट शेकडो-हजारो वर्षांपासून समाजाला प्रेरणा देणारी आहे. म्हणूनच तो एक उत्सव ठरतो.

महिषासुरमर्दिनीचे महत्त्वही याच संदर्भात समजून घेतले पाहिजे. महिषासुर ही केवळ एक व्यक्ती नाही, तर समाजातील आणि व्यक्तीच्या मनातील असुरी प्रवृत्तींचे प्रतीक आहे. महिषासुरमर्दिनी दुर्गेला त्याने विवाहाचे निमंत्रण दिले होते. परंतु दुर्गेने त्याला ठामपणे नकार दिला व त्याला सांगितले की, मी तुला विवाह देण्यासाठी नाही तर मृत्यू देण्यासाठी आलेली आहे. आजही समाजामध्ये अनेक दुर्गांना खोट्या भूलथापा देऊन फसवण्याचे प्रकार चालत असतात. परंतु या मुलींनी सुद्धा त्याला बळी न पडता आपले कुटुंब, आपले करीअर याचा विचार करत अशा महिषासुरांना ठामपणे नकार देण्याची आवश्यकता आहे. स्वतःमधला आत्मविश्वास जागृत करण्याची आवश्यकता आहे. समाजातील विकृत प्रवृत्तींना दिलेला नकार हे सीमोल्लंघनच आहे.

विजयादशमी आपल्याला सीमोल्लंघनाचा संदेश देते. मात्र आजच्या काळात सीमोल्लंघन म्हणजे केवळ गावाची किंवा गावाच्या सीमेची सीमा ओलांडणे नाही. आपल्या क्षमतांच्या मर्यादा ओलांडण्याचा संदेश विजयादशमी आपल्याला देते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या सर्वांनी आपापल्या मर्यादा ओळखून त्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच वैचारिक सीमोल्लंघन.

याची अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला दिसतात. एशियन गेम्समध्ये भारताला ८५ पदके मिळालेली आहेत. भारतीय खेळाडूंची ही कामगिरी सीमोल्लंघनच आहे. ज्या गोष्टी पूर्वी अशक्य वाटत होत्या, त्या आज भारतीय खेळाडू शक्य करून दाखवत आहेत. सुजित कलकल याने अत्यंत कठीण सामन्यामध्ये मुसंडी मारून भारताकरिता सुवर्णपदक जिंकले किंवा अॅथ्लेटिक्समध्ये पदक जिंकणारी विद्या रामराज हिने ४४ वर्षे जुना पी. टी. उषा यांचा विक्रम मोडून सीमोल्लंघनच केलेले आहे.

सीमेवरही सीमोल्लंघनाचा एक वेगळा अर्थ आहे. सीमेवर बांगलादेशकडून भारताच्या सीमेचे कुंपण उखडून टाकण्याचा केला गेलेला प्रयत्न हे आक्रमणच होते. त्याला आपल्या जवानांनी दिलेले योग्य उत्तर हे नेहमीच मार खाण्याच्या किंवा प्रत्येक गोष्ट संयुक्त राष्ट्रसंघात घेऊन जाण्याच्या जुन्या सवयींवरचे सीमोल्लंघनच आहे. भारताची सीमा, सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ते सामर्थ्य आणि तत्परता असणे ही काळाची गरज आहे. सुदैवाने आता सीमेची सुरक्षा करायला जवानांचे हात बांधलेले नाहीत. सीमेवरच्या सैनिकाच्या मनामध्ये सुद्धा आज विजयाचा विश्वास आहे.

विजयाची आकांक्षा व्यक्ती, समाज, राष्ट्र या सर्वांनाच असते. या सर्वांनीच आपल्या क्षमतांची चाचणी करून विजय मिळवण्यासाठी कुठे स्वतःला अधिक विकसित करण्याची आवश्यकता आहे, अशा पद्धतीचा विचार व प्रयत्न करणे हे सीमोल्लंघन आहे. आपण कालपेक्षा आज चांगले आणि आजपेक्षा उद्या अधिक चांगले होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

पं. दीनदयाल उपाध्याय यांनी त्यांच्या एकात्म मानव दर्शनामध्ये असे सांगितले आहे की, प्रत्येक व्यक्ती स्वतःचेही प्रतिनिधित्व करते आणि ती त्याच्या राष्ट्राचेही प्रतिनिधित्व करते. व्यक्ती त्याच्या कर्तृत्वाच्या आणि नेतृत्वाच्या भरवशावर १४० कोटी लोकांमध्येही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करू शकते. जीवनाची वास्तविक सार्थकता यामध्येच आहे. आजचा तरुण हा सातत्याने नोकरीचे स्वप्न बघत असतो. परंतु नोकरीपेक्षाही अधिक लाभ मिळवून देणाऱ्या अनेक संधी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारात उपलब्ध असताना सुद्धा त्याचे केवळ पूर्वग्रहामुळे किंवा त्याचे नोकरीसाठी मेंदूचे प्रोग्रामिंग झालेले असल्यामुळे त्या संधींकडे दुर्लक्ष होते. यामध्ये सुद्धा सीमोल्लंघनाची आवश्यकता आहे.

सेवाक्षेत्राचा भारताच्या आणि जागतिक जीडीपीमध्ये खूपच मोठा हिस्सा आहे. २०४७ च्या विकसित भारतात देशातील तरुण मुला-मुलींचे खूप मोठे योगदान राहू शकते. परंतु भारत हा केवळ आयात करणारा देश न राहता निर्यात करणारा देश सुद्धा बनला पाहिजे. नोकरी मागणारा देश न राहता नोकरी देणारा देश सुद्धा बनला पाहिजे, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. ही मानसिकता बदलणे हे देखील वैचारिक सीमोल्लंघनच आहे.

विजयादशमी हे विजयाचे पर्व आहे. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र म्हणून आम्ही सगळे एकत्रित प्रगती करू, एकत्रित आमच्या समस्यांवर मात करून विजयाचा आनंद उपभोगू आणि विजयाचे सोने सर्वांना वाटू, अशा पद्धतीचा संकल्प विजयादशमीच्या निमित्ताने करण्याची आवश्यकता आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### मनापासून आभार मानणे एक सुंदर सोहळा

'धन्यवाद' एक केवळ साडेचार अक्षरांचा शब्द आहे, पण या शब्दात फार मोठा आशय आहे. दैनंदिन जीवनात अनेक वेळा व्यवहारात हा शब्द अगदी सहज वापरला जातो. आपल्याला कोणी मदत केली असता त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. व्यक्ती लहान असो किंवा मोठी. काम लहान असो की मोठे असो. धन्यवाद हा शब्द चमत्कार करून जातो. त्यात लहान-मोठे असण्याचा प्रश्न नसतो तर त्यात असतो त्या व्यक्तीचा आदर, मदतीचा हात दिल्याचा एक भाव जो थेट हृदयापर्यंत जातो.

परमेश्वर ज्याने आपल्याला समृद्ध जीवन दिले. आरोग्यसंपन्नता दिली, घर, नाती, पैसा या सर्वांमुळे जगणे सुखकर होते. त्या परमेश्वराचे मनापासून आभार मानले पाहिजेत. जे काही मला मिळाले त्यात समाधान मानून आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करायला हव्यात. घरात किंवा घराबाहेर अनेक व्यक्ती भेटतात. मदतीचा हात देतात, पण बरेचदा आभार मानणे राहून जाते. वेळच्या वेळी धन्यवाद हा शब्द त्या त्या व्यक्तीला एक वेगळा आनंद देऊन जातो. त्याच्या मदतीची, सहकार्याची ती पावती असते.

दैनंदिन जीवनात अनेक व्यक्ती आपले जीवन सहज व्हावे यासाठी जे काम करतात, त्यांचे काम लहान असले तरी देखील ते महत्त्वाचे असते. दूध, पेपर, भाजी, किराणा इत्यादी देणारे तर घरकाम करणाऱ्या देखील किती महत्त्वाच्या आहेत. विविध व्यवसाय करणारे देखील यात सहभागी आहेत. डॉक्टर, वकील, इंजिनीअर त्याचप्रमाणे अनेक लहान काम करणारेही आहेत. ज्यांच्या मदतीशिवाय आपले काम होऊ शकत नाही. त्यांची दखल आवर्जून घेतली पाहिजे.

आभार हा अनौपचारिक प्रकार नाही तर ही एक भावना आहे. कृतज्ञता असणे हा विचार आहे. तो यशस्वी होण्यासाठी मदत करतो. आपल्या जीवनातील प्रत्येक व्यक्तीसोबत नाते अधिक दृढ करणारा हा एक शब्द म्हणजे 'धन्यवाद'. नोव्हेंबर महिन्यातील शेवटचा गुरुवार म्हणजे 'थँक्स गिव्हिंग डे'. परमेश्वराबद्दल, निसर्गाबद्दल, निर्मात्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याचा हा दिवस. चारशे वर्षांपूर्वी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सुरू झालेल्या या परंपरेने १९व्या शतकात अनेकांना जवळ आणले आणि एकमेकांना जोडण्याचा अत्यंत महत्त्वाचा उद्देश साध्य झाला. पाश्चात्त्य देशात ही प्रथा आजही आहे. परमेश्वराच्या कृपेने या सुंदर सृष्टीत आपण आनंदाने जगत आहोत. आपल्यावर संकटे येतात तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी धैर्य देण्याची क्षमता तोच आपल्याला देतो ही जाणीव ठेवणे, त्याचे मनापासून आभार मानणे हा एक सुंदर सोहळा आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

■■■

### दानाचे महत्त्व शिकवणारा दसरा!

दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. सत्याचा असत्यावर विजय, हे प्रतीक म्हणजे दसरा हा सण! साधारणपणे त्रेतायुगापासून हा सण साजरा केला जातो. हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व असलेला हा सण नवीन कार्याचा शुभारंभ करण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो. या



दिवशी इष्टमित्रांना आपट्याची पाने 'सोने' म्हणून वाटण्याची प्रथा महाराष्ट्रात प्रचलित आहे. या प्रथेचा संबंध एका पौराणिक कथेशी आहे.

राजा कौत्स यांनी वरतंतू ऋषींकडून विद्या प्राप्त केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कौत्स यांनी गुरुदक्षिणा देण्याचा आग्रह धरला. तेव्हा गुरूंनी १४ कोटी सुवर्णमुद्रांची मागणी केली. एवढ्या मोठ्या प्रमाणात सुवर्णमुद्रा उपलब्ध नसल्यामुळे कौत्स राजाने अयोध्येचा राजा रघू यांच्याकडे धाव घेतली. मात्र, राजा रघू यांनी नुकताच यज्ञ करून आपली सर्व संपत्ती दान केली होती. त्यामुळे त्यांनी कौत्स यांना दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. राजा रघू यांनी कुबेरावर विश्वास ठेवून कौत्स यांना आवश्यक तेवढी संपत्ती मिळवून देण्याचे ठरवले. त्यानुसार कुबेराने रात्री सुवर्णमुद्रांचा वर्षाव केला.

त्यातून कौत्स यांनी आपल्या गरजेपुरत्या म्हणजेच १४ कोटी सुवर्णमुद्रा गुरुदक्षिणेसाठी घेतल्या आणि उरलेल्या आपट्याच्या झाडाखाली नेऊन ठेवल्या. स्वतः गरजू असूनही त्यांनी एकही सुवर्णमुद्रा स्वतःसाठी ठेवली नाही. उर्वरित सुवर्णमुद्रा लोकांनी घेऊन जाव्यात, असे त्यांनी सांगितले. तेव्हापासून दसऱ्याला आपट्याची पाने 'सोने' म्हणून देण्याची प्रथा पडली. ही कथा आपल्याला दानाचे महत्त्व शिकवते. तसेच लोभ आणि अनावश्यक संग्रह करण्याची प्रवृत्ती आपल्यात आहे का, याचा अंतर्मुख होऊन विचार करण्यास प्रवृत्त करते. तेव्हा, दसऱ्याच्या या शुभमुहूर्तावर राजा कौत्स यांच्याप्रमाणे निःस्वार्थी वृत्ती जोपासण्याचा आणि दानधर्माचे महत्त्व जाणून घेण्याचा संकल्प करूया. ■

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

■■■

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अंध व दुर्बल मतदारांना सोबतीसाठी तीन दिवसआधी लेखी सूचना देणे बंधनकारक

## विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांचे निर्देश

### मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ सोलापूर -**

मतदानाच्या दिवशी अंध व दुर्बल मतदारांना मतदानासाठी सहकार्य करताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच निवडणूक संचालन नियम, १९६१ मधील नियम ४०-अ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी शितल तेली उगले यांनी दिले आहेत. अंध किंवा दुर्बल मतदारांना मतदानासाठी साथीदाराची सुविधा आवश्यक असल्यास, संबंधित मतदाराने मतदानाच्या दिवसापूर्वी किमान तीन दिवस आधी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना लेखी सूचना देणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती संबंधित मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसिद्धी माध्यमांचा प्रभावी वापर करावा. तसेच जिल्हाधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यासंदर्भातील सूचनांची अंमलबजावणी करावी.





### घोषणापत्र व नमुना १४-अ मधील नोंदी अनिवार्य

मतदानाच्या दिवशी मतदान करण्यापूर्वी अंध किंवा दुर्बल मतदाराने परिशिष्ट XI(ii)-C मधील विहित नमुन्यात घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर केंद्राध्यक्षांनी निवडणूक संचालन नियम, १९६१ मधील नियम ४०-अ नुसार पुढील कार्यवाही करावी. केंद्राध्यक्षांनी नमुना १४-अ मध्ये नियमानुसार नोंदवही ठेवावी. मतदानानंतर हा नमुना संकलित करून त्याची छाननी करण्यासाठी निवडणूक निरीक्षकांकडे उपलब्ध करून द्यावा. नमुना १४-अ पूर्णपणे भरलेला व स्वाक्षरी केलेला असल्याची खात्री करून तो इतर निवडणूक साहित्यांसह विहित वेळेत जमा करावा.

मतदान कक्षात साथीदाराला प्रवेश देण्याबाबत नियम मतदाराला मदत करण्यासाठी येणाऱ्या कोणत्याही मदतनीसाला किंवा साथीदाराला मतदान कक्षात प्रवेश देऊ नये. मात्र, अंध किंवा दुर्बल मतदारांच्या बाबतीत निवडणूक संचालन नियम, १९६१ मधील नियम ४०-अ व नियम ७० अंतर्गत असलेली तरतूद लागू राहील. संबंधित मतदाराची पात्रता तपासून विहित नियमानुसारच साथीदाराची सुविधा उपलब्ध करून द्यावी. साथीदाराची सुविधा आवश्यक असलेल्या मतदारांची पात्रता तपासल्यानंतर त्यांच्या नावासमोर मतदार यादीत नियमानुसार नोंद करावी. अशा नोंद केलेल्या मतदारांची माहिती संबंधित मतदान केंद्रांना पुरवावी, जेणेकरून पात्र मतदारांना नियमानुसार सुविधा मिळू शकेल.

### केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना सूचना

केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणामध्ये या सूचनांची स्पष्ट माहिती द्यावी. सर्व मतदान केंद्रांना घोषणापत्राचे नमुने व नमुना १४-अ पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत. तसेच साथीदाराच्या सुविधेसाठी आगाऊ प्राप्त अर्जांची यादी आणि पात्र मतदारांची माहिती केंद्रनिहाय संबंधित केंद्राध्यक्षांना द्यावी. निवडणूक नियमांचे काटेकोर पालन करून अंध व दुर्बल मतदारांना नियमानुसार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. या प्रक्रियेत कोणतीही अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

## महत्वाचे...

### किनारा हॉटेलजवळ दुचाकीच्या धडकेत एक महिला ठार दुसरी जखमी

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

भरधाव दुचाकीने धडक देऊन रस्ता ओलांडणाऱ्या एका महिलेच्या मृत्यूस व दुसऱ्या महिलेच्या जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका दुचाकी स्वारा विरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मन्मथ प्रकाश तुगावकर (वय ३९, रा. मंगळवार पेठ) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ही घटना १६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास होटगी रोडवरील किनारा हॉटेलजवळ घडली होती. फिर्यादीची आई काशीबाई प्रकाश तुगावकर आणि त्यांच्यासोबत असलेल्या शंकरम्मा पूजारी या रस्ता ओलांडत असताना, एका मोटारसायकलच्या चालकाने त्यांना जोरात धडक दिली. या धडकेत काशीबाई आणि शंकरम्मा या गंभीर जखमी झाल्या. उपचारादरम्यान यातील फिर्यादीच्या आई काशीबाई यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू गायकवाड हे करत आहेत.



### रोटरी क्लबच्यावतीने हिंगुलांबिका शाळेत कन्या पूजन

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत रोटरी क्लब ऑफ सोलापूर युज आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ यांच्या महिला विभागाच्या वतीने शारदीय नवरात्र उत्सव निमित्त कुमारी कन्या पूजन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींचे कन्या पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला रोटरीच्या आदिशक्ती विभागाच्या अध्यक्षा सौ पारुल जयेश पटेल, रोटरियन वंदना खोपकर, डॉ. ज्योती चिडगुपकर, संजू मेंथे, अजय डोईजोडे, सत्यम दुधनकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला. रोटरी क्लब सोलापूर युज चे अध्यक्ष रोटरियन किरण कुमार मुसळे आणि सचिव हिंदुराव गोरे तसेच मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपन्न झाला.



### सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी कडक कायद्यासह जनजागृतीची गरज -डॉ. सावंत

**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**

जगात इंटरनेटचे जाळे जसजसे विस्तारत आहे, तसतसे सायबर गुन्हेगारीच्या प्रमाणात अत्यंत चिंतनीय वाढ होत असल्याचे प्रतिपादन डॉ. नामदेव सावंत यांनी केले. बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील एनएसएस आणि प्लेसमेंट ॲण्ड करिअर गाईडन्स काऊन्सेलिंग सेलच्या वतीने आयोजित 'सायबर सुरक्षा जागरूकता आणि करिअरची संधी' या विषयावरील व्याख्यानात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. या प्रसंगी कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे, डॉ. सोपान मोहिते, डॉ. युवराज नवले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणात जगामध्ये सर्वाधिक इंटरनेटचा वापर चीन या देशात होत असून, भारत या यादीत जगभरात दुसऱ्या क्रमांकावर आहे. जेव्हा समाजात नैतिकतेचा ऱ्हास होतो, तेव्हा गुन्हेगारीच्या घटना वाढतात. त्यामुळे सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केवळ कडक कायदे असून चालणार नाही, तर सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती होण्याची नितांत गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. सोपान मोहिते यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. समाधान लोंढे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. युवराज नवले यांनी मानले.



### सशस्त्र सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदांवर ३५ पोलिस हवालदारांना पदोन्नती

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १०, सोलापूरच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या सशस्त्र सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदांवर ३५ पोलीस हवालदारांना पदोन्नती देण्यात आली आहे. समादेशक डॉ. दिपाली काळे यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी याबाबतचे अधिकृत आदेश काढले आहेत. सदर पदोन्नती २९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरवलेल्या अंमलदारांना देण्यात आली आहे. शासनाच्या विविध निर्णयांच्या आणि परिपत्रकांच्या अधीन राहून, मूळ सेवाज्येष्ठतेनुसार ही तात्पुरत्या स्वरूपाची पदोन्नती देण्यात आली आहे. ही पदोन्नती ११ ऑक्टोबर २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. या पदोन्नती प्रक्रियेत मनोहर सुतार, अमोल काळे, भास्कर मोहिते, विष्णू सुर्वे, राजेंद्र देठे, बसवराज बिराजदार, विकास जाधव, कांतीलाल भांगे, तय्यब पटेल, किरण उगले, सादिक शेख, नागेश कट्टीमनी, मनोज कदम, धुळप्पा पाटील, श्रीनिवास गवळी, विशाल सुर्यवंशी, अमित बुने, समाधान काकडे, राजू मुरडे, संदिप खुने, मनोज पाटील, संतोष नागरगोजे, देवीदास तांडीलकर, झाकीर आतार, इरय्या मठपती, विकास कुंभार, अनिल जाधव, विजय जाधव, अनिल गावकरे, तानाजी सावंत, शैलेश क्षीरसागर, कलय्या स्वामी, विकास ठोंबरे, रविंद्र माळी आणि बालाजी इरलापल्ले या ३५ जणांचा समावेश आहे.

## पळू नका, परिस्थितीचा सामना करा, हेच गीतेचे सार : डॉ. मोहन भागवत

### गीता परिवाराच्या ५० व्या सुवर्ण बॅचचे ऑनलाईन उद्घाटन

### १ लाख नव्या साधकांचा गीता प्रवास सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

सनातनी धर्म आणि भगवद्गीतेचे पवित्र ज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबध्द असलेल्या 'गीता परिवार'च्या ऐतिहासिक ५०व्या सुवर्ण बॅचचा प्रारंभ शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी झाला. झूम आणि यूट्यूबच्या माध्यमातून आयोजित या जागतिक ऑनलाईन सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी



भागवत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या सुवर्ण बॅचच्या माध्यमातून देश-विदेशातील १ लाख नवीन साधकांनी विनामूल्य गीता शिकण्यास सुरुवात केली आहे.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले, 'गीता केवळ वाचण्यासाठी नसून ती जीवनात उतरवण्यासाठी आहे. पळू नका, सामना करा. जर तुम्ही पळालात तर हार निश्चित आहे, पण जर परिस्थितीचा सामना केला आणि आसक्तीशिवाय कर्तव्यासाठी स्वतःला समर्पित केले, तर उच्च ध्येय गाठू शकता. भारत देशात राष्ट्रकार्य आणि धर्मकार्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अयोध्या येथून सामील झालेले श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस प. पू. स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी वेद विद्वानांसाठी आणि गीता जनसामान्यांसाठी आहे अशा शब्दांत आशीर्वाद दिले. गीता परिवाराचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. आशु गोयल यांनी सांगितले की, अवघ्या ६ वर्षांत या उपक्रमाचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले असून सध्या १८२ देशांतील १८ लाख लोक १५ भाषांमध्ये विनामूल्य गीता शिकत आहेत. सूत्रसंचालन डॉ. संजय मालपाणी यांनी केले, तर आभार संरक्षण प्रमुख जगदीश राठी यांनी मानले.

## सोलापुरात साईराम सेवा मंडळाने सुरु केली 'ब्रतुकम्मा'ची प्रथा

### आज माधव नगरमध्ये तेलगू संस्कृतीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

तेलगू संस्कृतीचे यथार्थ दर्शन घडवणाऱ्या आणि तेलगू भाषिक महिलांच्या दृष्टीने अत्यंत पावन व महत्वाचा मानल्या जाणाऱ्या ब्रतुकम्मा उत्सवाची सोलापुरात जय्यत तयारी झाली आहे. सोलापूर शहर व परिसरातील तेलगू भाषिक समाजाचे तेलंगणाशी घट्ट सांस्कृतिक नाते आहे. हीच बाब लक्षात घेऊन ७० फूट रोडवरील माधव नगर येथील 'श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळा'च्या वतीने आज सायंकाळी ६ वाजता श्री साईबाबा मंदिर येथे ब्रतुकम्मा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, २०१२ साली सोलापुरात सार्वजनिक रित्या अशा प्रकारे 'ब्रतुकम्मा' उत्सव साजरा करणारे हे पहिलेच मंडळ असून, त्यांच्या या प्रेरणेतून आज सोलापुरात अनेक मंडळे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत.

मंडळाच्या स्थापनेच्या सुरुवातीला केवळ २५ ते ३० महिला या उत्सवात जोडल्या गेल्या होत्या, मात्र आता या महोत्सवाचे स्वरूप भव्य झाले असून किमान ७०० महिला यात सहभागी होतात. मंडळाचे महोत्सवाचे हे यंदाचे १५ वे वर्ष आहे. दरवर्षी काहीतरी नवीन उपक्रम राबवणाऱ्या या मंडळाकडून यंदा रोज पहाटे ५.३० वाजता मंदिरात मोफत योगा वर्गाचे आयोजन केले जात आहे. सविता गजरे आणि शालिनी जल्ला यांच्या पुढाकारातून हा योगा वर्ग सुरू असून, दररोज ४० ते ५० नागरिक यात उत्साहाने सहभागी होत आहेत.

श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सन २०१२ पासून या महोत्सवाचे सातत्याने यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. यंदा या महोत्सवात सुमारे ७०० हून अधिक महिला पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार असून, सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला मंडळाच्या वतीने भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी माधवी अंदे, नंदिनी कोंडूर, अश्विनी चाटला, सविता गजरे, शालिनी जल्ला, कोळा परिश्रम घेत आहेत.



### 'ब्रतुकम्मा'चा अर्थ आणि महत्त्व

ब्रतुकम्मा या शब्दाचा अर्थ 'जिवंत राहा, फुला-फळा' असा होतो. विविध रंगांच्या फुलांची आकर्षक आणि शंकूच्या आकाराची रचना करून तिची पूजा करणे, आणि पारंपारिक लोकगीते म्हणत फेर धरून नृत्य करणे ही या उत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. निसर्ग, फुले आणि मातृशक्तीचा सन्मान करणाऱ्या या सणातून तेलगू संस्कृतीचे दर्शन घडते.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from "**Vimal Gajanan Udata**" to "**Vimala Rajesh Nampalli**" for passport issuance where "**Vimal Gajanan Udata**" is my old name and "**Vimala Rajesh Nampalli**" is my new name

## पृथ्वीराज रोडेची स्केटींग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**

क्रीडा युवक संचलनालय पूणे व धाराशिव जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शालेय जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धा १७ ऑक्टोबर रोजी धाराशिव येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत बार्शीच्या ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब बार्शी व ज्ञानद्योग उच्च माध्यमिक विद्यालय येरमाळाचा विद्यार्थी पृथ्वीराज गणेश रोडे याने दमदार कामगिरी करत १७ वर्षांखालील वयोगटात आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत गोल्ड मेडल पटकावले.

पृथ्वीराजला संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष गणेश रोडे, सचिव सविता जाधव, स्नेहल



रोडे, प्राचार्य डी.बी.मोरे, क्रीडा शिक्षक बापूराव चांदणे, संदिप पेचगुडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संस्थेच्या व प्रशिक्षक यांच्या वतीने संचिती जाधव, अतुल जाधव, विश्वजीत जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, उमेश चव्हाण, रितेश जानराव, यशराज रोडे यांनी पृथ्वीराजचे अभिनंदन केले.



## भक्ती, शक्ती अन् फिटनेसचा अनोखा संगम

### देवीच्या आठव्या माळेनिमित्त बार्शी रनर्स क्लबची बार्शी ते येडाई देवी, येरमाळा अशी ३० कि.मी. रनिंग यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**

नवरात्रोत्सवातील देवीच्या आठव्या माळेनिमित्त बार्शी रनर्स क्लबतर्फे आज बार्शी ते श्री येडाई देवी मंदिर, येरमाळा अशी ३० किलोमीटरची भक्तिमय रनिंग आयोजित करण्यात आली होती. पहाटे बार्शी येथील शिवसृष्टी येथून या रनिंगला सुरुवात झाली.

बार्शी-पांगरी मार्गे धावपटूंनी येरमाळ्याच्या दिशेने धाव घेतली. वातावरणातील दमटपणा आणि आव्हानात्मक परिस्थिती असूनही सर्व धावपटूंनी ३० किलोमीटरचे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण केले. रनिंगदरम्यान धावपटूंच्या आरोग्याची काळजी घेत बार्शी रनर्स क्लबतर्फे मार्गावर ठिकठिकाणी पाणी, फळे आणि हायड्रेशनची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे धावपटूंना आवश्यक ऊर्जा आणि प्रोत्साहन मिळाले. येरमाळा येथील श्री येडाई देवी मंदिराच्या पायथ्याशी या रनिंगची सांगता झाली. त्यानंतर सचिन पाटील यांच्यातर्फे सर्व धावपटूंसाठी उत्कृष्ट आणि आरोग्यदायी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

### सहभागी धावपटू

अमोल ताकभाते, निलेश खळदकर, वासुदेव अण्णा ढगे, बंडू भोरे, अजित मिरगणे, डॉ. नवदीप लोकरे, रणजित पाटील, अमृत खेडकर, श्रेयस परदेशी, करण पाटील, प्रकाश माळी, किरण माळी, युवराज करळे, गणेश माने, रमेश मोरे, रवी कदम, प्रकाश फुरडे, रवी बजाज, ज्ञानेश्वर खुने, सचिन जगताप, संभाजी नवले, संतोष घावटे, मोरे मेजर.

## जाहिरात प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्द कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रम**

| अ. क्र. | सहकारी संस्थांची नांवे | वर्ग |
|---|---|---|
| १ | ध्यास महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| २ | इंद्रायणी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ३ | श्री दत्तकृपा अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसा.लि. भांतंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ४ | श्री प्रसन्नदाता अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसा.लि. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ५ | लोककल्याण अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसा.लि. गौडगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |

**वरील संस्थांची प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्दीकरणाचे वेळापत्रक**

| प्रारुप (कच्ची) प्रसिद्ध करण्याचा दिनांक | प्रारुप (कच्ची) मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाचा दिनांक | आक्षेप अगर दावे यावर तालुका निवडणूक अधिकारी यांनी द्यावयाचा निर्णयाचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १९/१०/२०२६ | १९/१०/२०२६ ते २६/१०/२०२६ | २६/१०/२०२६ | २/११/२०२६ | २/११/२०२६ |

**टीप :-** उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, संस्थेचे कार्यालय, संबंधित नगरपालिक, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय व संस्थेचे शाखा कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे याची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**(ए.टी. सय्यद)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# एकेरीत अमेरिकेच्या समीर बॅनर्जी याला विजेतेपद

## आयटीएफ 30हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १८ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना, महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या महाराष्ट्र शासन, सोलापूर म हानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय पुरस्कृत एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ ३० हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धेत एकेरीत अमेरिकेच्या समीर बॅनर्जी याने विजेतेपद पटकाविले.

येथील एमएसएलटीए टेनिस कोर्ट, डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे पार पडलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये एकेरीत अंतिम फेरीत सहाव्या मानांकित अमेरिकेच्या समीर बॅनर्जी याने तिसऱ्या मानांकित भारताच्या करण सिंगचा २-६,



६-४, ७-६(४) असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना २ तास ७ मिनिटे चालला. सामन्यात पहिल्या सेटमध्ये करणने वर्चस्व राखत हा सेट समीरविरुद्ध ६-२ असा जिंकून आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये समीरने जोरदार खेळ करत नवव्या गेममध्ये करणची सर्व्हिस रोखली व हा सेट ६-४ असा जिंकून आपले आव्हान कायम राखले. तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी तोडीस तोड खेळ केला व हा सेट टायब्रेकमध्ये गेला. टायब्रेकमध्ये समीरने आक्रमक खेळ करत करण विरुद्ध हा सेट ७-६(४) असा जिंकून विजय मिळवला.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला करंडक, ४ लाख ३९ हजार ०६२/-रुपये व २५आयटीएफ गुण, तर उपविजेत्या जोडीला करंडक, २ लाख ५७ हजार १३५/-रुपये व १४आयटीएफ गुण अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण उद्योगपती विकास सोनी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी पर्यवेक्षक लीना नागेशकर नेविल पिठावाल , पंकज शहा , वामसीकृष्ण देवसानी, मोनिका आळंद , श्रीकांत कामरेड्डी खेळाडू व पालक इतर मान्यवर उपस्थित होते. एकेरीच्या विजयी व उपविजयी खेळाडूंना रूबी ट्रॅव्हल चे संचालक असिफ पटेल यांच्या तर्फे भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. सूत्र संचालन एमएसएलटीएचे सहसचिव व स्पर्धा संचालक राजीव देसाई यांनी केले.



## दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेच्या मुली विजेत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शालेय शहर सॉफ्टबॉल स्पर्धेत द. का. आसावा प्रशालेने १४ वर्षाखालील मुलींबरोबरच १७ वर्षाखालील मुलींनीही विजेतेपद पटकावित प्रशालेस दुहेरी मान मिळवून दिला. अंतिम सामन्यात त्यांनी सिद्धेश्वर कारखाना प्रशालेचा १०-९ असा एका डावाच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. या स्पर्धेत अक्षरा कापसे, श्रद्धा तोडकरी, आनाया शेख, यांनी उत्तम कामगिरी केली. विजयी संघाचे संस्थेचे स्थानिय सचिव डॉ. महेशजी चोप्रा, प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील तसचे पर्यवेक्षिका सुनीता गवळी यांनी अभिनंदन केले. विजेत्या संघास प्रशालेचे क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार यांचे मार्गदर्शन लाभले.



## आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावले. यामुळे खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.प्रबुध्दचंद्र झपके, सचिव अ‍ॅड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, खजिनदार नागेश गुळिमरे यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संघास प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले व शारीरिक शिक्षण संचालक डॉ.जगदीश चेडे यांनी मार्गदर्शन केले.

# वसंत वाघमोडे, स्वरा जाधव तिहेरी मुकुटाची मानकरी

**शालेय शहर मैदानी स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शालेय शहर मैदानी स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या गटात स्वामी विवेकानंद प्रशालेच्या स्वरा जाधव हिने व निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या वसंत सुमित वाघमोडे यांनी प्रत्येकी तीन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला.

सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालयाने सोलापूर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशन व क्रीडा शिक्षकांच्या सहकार्याने ही स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर आयोजित केली होती.

**अंतिम प्रथम दोन व पुणे विभागासाठी निवडलेले खेळाडू :**

**१९ वर्षांखालील : धावणे :** १०० मीटर : **मुले** : वसंत सुमित वाघमोडे, महमद सफा खतीब (निर्मलाताई ठोकळ). मुली : स्वरा सौदागर जाधव (स्वामी विवेकानंद), नंदिनी शिवाजी बंडगर (छत्रपती शिवाजी प्रशाला). **२०० मीटर :** महमद सफा खतीब, हर्ष हरिदास गायकवाड (निर्मलाताई ठोकळ). **मुली :** जान्हवी निलेश हरिहर (शिवाजी प्रशाला), अंबिका संतोष कोरे (वालचंद). ४०० मीटर : लक्ष्मण अरुण मंजाळ (ह. दे.), उत्तम गुरुपाद रबशेट्टी (संगमेश्वर). **मुली :** जान्हवी निलेश हरिहर, सुप्रिया गणपती कोळी (वालचंद). **८०० मीटर : मुले :** लक्ष्मण अरुण मंजाळ, सोहम सुरेश गुरव (दयानंद).



**मुली :** अक्षता शणमुखप्पा गंगोडा (छत्रपती शिवाजी), अर्पिता तुळशीराम पवार (जागृती विद्या मंदिर). १५०० मीटर : सोहम सुरेश गुरव (दयानंद), यश लक्ष्मण साकुंखे (कुमठे). **मुली :** नेश परशुराम जाधव (कुमठे). सृष्टी शरणाप्पा हदपद (छत्रपती शिवाजी). **३००० मीटर : मुले :** सिताराम काशीनाथ गायकवाड (ह.दे.), मंतथ सचिन धनाक्षी (संगमेश्वर) **मुली :** नेहा जाधव . सृष्टी हदपद.

**५ कि.मी. चालणे :** मुले : प्रेम रमेश कोळी (कुमठे), आदर्श नितीन सपकाळे (लिटिल स्टार स्कूल). **मुली :** सुरेखा दशरथ बाळगंडे (कुमठे), आरोही गुरुनाथ सरथदे (ज.रा. चंडक). ११० मीटर हर्डल्स : मुले : वसंत सुमीत वाघमोडे. **मुली :** तनुजा समाधान धोंडे (सेवासदन), सोनाली महादेव साठे (ह.दे.). **४०० मीटर हर्डल्स :** मुले : नडगिरी आदी आनंद, वाघमोरे परशुराम राजेंद्र ( दोघे संगमेश्वर). मुली : राजनांदिनी सुभाष भोसले (सेवासदन), तनुजा समाधान धोंडे.

**थाळी फेक :** समर्थ राजकुमार माने (कुमठे), साद समीर मुजावर (निर्मलाताई ठोकळ). मुली : वैभवी सुनिल मरेड्डी (चंद्रभागाबाई यलुगुलवार), रोहिणी काशीदास खांडगे (सेवासदन). गोळा फेकः मुले : भोसले सागर गणेश (संगमेश्वर), चव्हाण करण अशोक . **मुली :** पवार नंदिनी भिमू (देगांव), रेणुका महादेव दिंदोरे (कुचन). हातोडा फ ेक : **मुले** : मुजावर साद समीर (निर्मलाताई ठोकळ), कांबळे रितेश सागर (यलगुलवार). **मुली** : मरेड्डी वैभवी सुनिल (यलगुलवार), चाटला भावना बळराज (वालचंद). **भाला फेक :** प्रज्वल भिमाशंकर कोळी (रखुमाबाई हन्तुरे), हर्षद हरी चवरे (जय जवान जय किसान सैनिकी स्कूल ). **मुली :** वैष्णवी संतोष चव्हाण (लोकमंगल), सुप्रिया गणपती कोळी (वालचंद).

**उंच उडी :** आदि आनंद नडगिरी, श्लोक उल्हास सुरवसे. **मुली :** राजनांदिनी भिमाशंकर व्हनमाने (देगांव), उर्विला महादेव डोके (सेवासदन). **लांब उडी :** वसंत सुमीत वाघमोडे (निर्मलाताई ठोकळ), परशुराम विलास राठोड (स्वामी विवेकानंद). **मुली :** स्वरा सौदागर जाधव, नंदिनी भिमु पवार (देगांव). **तिहेरी उडी :** अभिषेक प्रकाश म्हेत्रे (चंद्रभागाबाई यलगुवार), मोहमद नजीब इनामदार (एम.ए. पानगल), **मुली :** स्वरा सौदागर जाधव, उत्कर्षा सूर्यकांत चौगुले (स्वामी विवेकानंद).



## शालेय क्रीडा स्पर्धेतील मुलींना शूजसाठी दिली आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**

तालुका शालेय क्रीडा स्पर्धे दरम्यान मैदानावरील खडे पायाला टोचल्याबाबत मुलीने आपल्या वडिलांना सांगितले आणि यावर मुलीला झालेला त्रास पाहून तिचे वडील प्रकाश बापूसाहेब कानगुडे यांनी आपल्या मुलीसह इतर मुलींनाही अशा अडचणींचा साम ना करावा लागू नये, या भावनेतून स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व मुलींना खेळाचे शूज घेण्यासाठी आर्थिक मदत दिली आहे.

पानगाव (ता. बार्शी) येथील संत तुकाराम विद्यालयाने सासुरे (ता.बार्शी) येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुका शालेय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता.याम ध्ये १९ वर्षाखालील क्रीडा स्पर्धे त कबड्डी, लांब उडी आदी क्रीडा प्रकारात मुलींनी सहभाग घेतला होता. यामधे ऐश्वर्या प्रकाश कानगुडे हिने मुलींना येत असलेल्या अडचणींची माहिती वडिलांजवळ बोलून दाखवली होती.

यावर प्रकाश कानगुडे यांनी स्पर्धेतील सर्व सहभागी मुलीना खेळाचे बूट घेण्याचे ठरवले आणि थेट शाळेत भेट देत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद कसबे यांचेकडे खेळाच्या शूजसाठी आर्थिक मदत शाळेकडे सुपूर्द केली.

स्वतःच्या मुलीच्या वेदनेतून इतर मुलींच्या अडचणी समजून घेऊन श्री कानगुडे यांनी या माध्यमातून सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश दिला आहे.



## युनिक इंग्लिश स्कूलचे अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शहरस्तरीय शालेय स्तरावरील घेण्यात आलेल्या अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेत युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींनी अनेक पदके जिंकून शाळेचा गौरव वाढवला. विद्यार्थ्यांची नावे अशी : भक्ती देशमुख - लांब उडी (ण-१४ : रौप्यपदक), आकांक्षा देवकते - १०० मी. धावणे (ण-१७ : कांस्यपदक),आरोही देवकते, सांची कांबळे, भक्ती देशमुख, अमृता बागले (रिले संघ ण-१४ :कांस्यपदक), *मिताली पांढरे, आकांक्षा देवकते, सोनाक्षी सदाफुले, गायत्री टाकळकी (रिले संघ :ण-१७: रौप्यपदक ) यांनी यश मिळवले आहे. संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे , डीएसटीएस मंडळाचे सर्व पदाधिकारी, संस्थेचे विश्वस्त शेटे , शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी, संस्थेच्या सदस्या डॉ. शुभदा उपासे, शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा बाजपाई , समन्वयिका मानसी झळिककर ,पर्यवेक्षिका गौरा उडचण म आणि मार्गदर्शक क्रीडा शिक्षक अमर पाटील, अ‍ॅथलेटिक्स शिक्षक प्रीती कारले यांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचे कौतुक केले.

## खेडगी महाविद्यालयाचा क्रिकेटमध्ये तालुकास्तरीय विजय

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**

येथील फत्तेसिंह मैदानावर झालेल्या तालुकास्तरीय १९ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत सी. बी. खेडगी म हाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. या विजयामुळे संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

अंतिम सामन्यात संघाने फलंदाजी व गोलंदाजीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सांघिक कौशल्याचे दर्शन घडविले. कर्णधार साहिल शेख याच्यासह आयान शेरीकर, निलेश जोशी, अभिषेक शिंदे, रितेश चव्हाण, स्वप्निल चव्हाण, ओमकार सुरवसे, यश पाटील, फरान शेख, रामचंद्र बिराजदार, समर्थ निंबाळ, शुभम कोळी आणि कुणाल कोळेकर यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले. संघाला क्रीडा शिक्षक प्रा. सोहेल शेख, जिमखाना विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय बिराजदार व सुधीर राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, सचिव सुभाष धरणे, संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. गुरलिंगप्पा धबाले, उपप्राचार्या वैदेही वैद्य, पर्यवेक्षक नीलप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

# ‘स्वामी विवेकानंद’चा साईश्वर गुंटूक व कुमठ्याची नेहा जाधव अव्वल

**शालेय शहर क्रॉस कंट्री स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शहर पातळीवर शालेय क्रॉस कंट्री स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात कुमठे प्रशालेच्या नेहा जाधव व मुलांच्या गटात जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या साईश्वर गुंटूक याने प्रथम क्रमांक पटकाविला.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रिकेट संघटनेचे व्हॉइस चेअरमन श्रीकांत मोरे यांनी केले.

यावेळी सोलापूर म हानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी नजीर शेख, सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष



दशरथ गुरव व सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे श्रीरंग खांडेकर, सूर्याजी लिंगडे, प्रकाश गायकवाड, सुनील चव्हाण, बसवराज परीट, एकनाथ पवार, प्रा,प्रमोद चुंगे, प्रा. गायकवाड, प्रा राहुल हजारे, सचिन गायकवाड, सुभाष उपासे, मारुती घोडके, विक्रम पवार, पुंडलिक खालकामकर, प्रा. विभुते, प्रा. संतोष खेंडे , प्रथमेश हिरापुरे, शिवानंद सुतार इत्यादी प्रमुख आणि पंच म्हणून काम पाहिले.

अंतिम प्रथम सहा खेळाडू, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव : मुले : साईश्वर गुंटुक, अभिनव खाडे ( सेंट थॉमस), सिताराम गायकवाड ( हरीभाई



देवकरण), मंथन धनश्री (संगमेश्वर), मुरलीधर दिकोंडा ( जय जवान जय किसान), दीपक इपोळे (छत्रपती शिवाजी).

**मुली :** नेहा जाधव, अक्षरा पवार (कुमठे प्रशाला), सृष्टी हडपद, अक्षदा गंगोडा ( छत्रपती शिवाजी), साक्षी जाधव (कुमठे प्रशाला), नंदिनी बंडगर (छत्रपती शिवाजी).



## सांगोला विद्यामंदिरचा जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेत डंका

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ ऑक्टोबर-**

पाकणी (ता.उत्तर सोलापूर) येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय नेटबॉल स्पर्धेत सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षे वयोगटातील मुले आणि मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही संघांची संगमनेर (जि.अ.नगर) येथे होणाऱ्या आगामी विभागीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. या यशस्वी खेळाडूंचा सत्कार संस्थेचे खजिनदार शंकरराव सावंत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक शुभांगी घोंगडे, मकरंद अंकलगी उपस्थित होते. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा.संतोष लवटे, सुनील भोरे, प्रा.डी.के.पाटील, नरेंद्र होनराव, सुभाष निंबाळकर, प्रा.सचिन चव्हाण, स्नेहल देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, पर्यवेक्षक काकासो नरूटे यांनी खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करत संगमनेर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रताप मंडळाच्या बालक्रीडा स्पर्धेत १ हजार ६८२ खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑक्टोबर-**

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बालक्रीडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

या स्पर्धेचे उद्घाटन मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण, आकाशात कबुतरे सोडून व मैदान पूजनाने संपन्न झाले. तर सहकार महर्षी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन बाल खेळाडूंनी केले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. जयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी दिपकराव खराडे पाटील, महादेव अंधारे, हर्षवर्धन खराडे पाटील, उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिबीषन जाधव उपस्थित होते. या स्पर्धेत तालुक्यातील १४ शाळांमधून सहा विविध खेळप्रकारात मुले व मुली असे एकूण १६८२ बाल खेळाडूंनी सहभाग घेतला.

**स्पर्धेतील गटनिहाय प्रथम**



**तीन विजेते पुढील प्रमाणे -**

**लहान गट -** डोक्यावर चेंडू घेऊन पळणे (४० मी.) या गटात (मुली) अर्पिता बोरकर प्रथम, सानवी बनसोडे द्वितीय, यशस्वती खराडे पाटील तृतीय. (मुले) विवान कांबळे प्रथम, चरण शिंदे द्वितीय, शंभू चव्हाण तृतीय.

**मोठा गट -** धावणे (६०मी.) या गटात (मुली) संजीवनी मगर प्रथम,सान्वी होआळ द्वितीय, अनया रिसवडकर तृतीय. (मुले) कार्तिक कोडग प्रथम, शिवांश जाधव द्वितीय, तैमुर पठाण तृतीय. इयत्ता १ ली कमरेवर हात ठेऊन उड्या मारत जाणे (४० मी.) (मुली) समायरा शेख प्रथम, स्वरा चव्हाण द्वितीय, रिया विटकर तृतीय. (मुले) मल्हार जाधव प्रथम, हर्ष बनसोडे द्वितीय, आलोक वराडे तृतीय. इयत्ता २ री. लंगडी घालत जाणे (४०मी.) (मुली) अक्षरा गुरवे प्रथम, स्वरा शिंदे द्वितीय, शिवश्री भगत तृतीय, (मुले) निहाल गावकर प्रथम, वृषभ जाधव द्वितीय, शौर्य होवाळ तृतीय

**इयत्ता ३ री.** तीन पायाची शर्यत (४० मी.) (मुली) ईश्वरी कांबळे व नंदिनी यादव प्रथम, हिंदवी पेचे व रिया जानकर द्वितीय, मुक्ता माने देशमुख व आरोही चव्हाण तृतीय.

(मुले) आहान शेख व हसनैन शेख प्रथम, स्वरूप काळे व महेश शिंदे द्वितीय, कार्तिक पाटील व प्रणव भगत तृतीय

**इयत्ता ४ थी.**पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे (५० मी.)(मुली)

सुप्रिया गोफणे प्रथम, सिमरन कोडग द्वितीय, स्वरांगी पाटील तृतीय.

(मुले) निरंजन पवार प्रथम, रुद्राक्ष खत्री द्वितीय, अरमान तांबोळी तृतीय. या खेळाडूंनी विजेतेपद पटकावले.

स्पर्धेतील या विजेत्या प्रथम तीन खेळाडूंना अनुक्रमे तीन चाकी सायकल, कॅरम बोर्ड, स्कुल बॅग, टिफिन बॉक्स, पाणी बोटल व प्रमाणपत्र असे एकुण पाच क्रमांकास बक्षिसे देण्यात आली. सर्व सहभागी खेळाडूंना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे, गणेश करडे उपस्थित होते. सूत्रसंचलन आनंत कोळी, पोपट

> लहान मुलांचे हे उपक्रम छोटे असले तरीही या स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल व भविष्यात यातूनच मोठे खेळाडू निर्माण होतील.
>
> **जयसिंह मोहिते पाटील,**
> संस्थापक अध्यक्ष, प्रताप क्रीडा मंडळ, शंकरनगर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अक्कलकोटमध्ये मनसेकडून 'एक सही संतापाची' अभियान

**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर -** अक्कलकोट येथे मनसेच्या वतीने 'एक सही संतापाची' हे अभियान राबविण्यात आले. अक्कलकोट बसस्थानकासमोर आयोजित या अभियानात मतदार आणि नागरिकांकडून सह्या घेऊन निवडणूक प्रक्रियेबाबतच्या मागण्यांना पाठिंबा नोंदविण्यात आला. मनसे नेते दिलीप धोत्रे, जिल्हा संपर्क अध्यक्ष ॲड. किशोर शिंदे, ॲड. सुधीर पाटसकर, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर आणि लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. अभियानावेळी मनसे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, शहर उपाध्यक्ष शामराव पाटील, तालुका उपाध्यक्ष मल्लिनाथ महादेव पाटील, गटाध्यक्ष काशिनाथ मरतुरे, गटाध्यक्ष काशिनाथ मणुरे, दुधनी शाखाध्यक्ष मनोज राठोड, बोरी उमरगे शाखाध्यक्ष काशिनाथ पाटील आणि हसापूर शाखाध्यक्ष रोहित चव्हाण यांच्यासह मनसेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सोलापूर शहरात पावसाचा शिडकावा

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर :** शहरात रविवारी दि. १८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी पावसाचा शिडकावा झाला. संध्याकाळी शहरातील काही भागात फक्त २-३ मिनिटे पडलेल्या या हलक्या शिडकाव्याने नागरिकांना काहीसा दिलासा दिला. नई जिंदगी परिसर, आसरा परिसरात काही मिनिटे हा हलकासा शिडकावा म्हणण्यासारखा पाऊस पडला.

# दुचाकीवर ट्रिपल सीट जाणे बेतले जीवावर

## जुना पुना नाका येथील अपघातात दोन सख्ख्या जावा जागीच ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -** जुना पुना नाका येथे ट्रिपल सीट दुचाकीला पाठीमागून अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन सख्ख्या जावा जागीच ठार झाल्या. तर दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. हा अपघात आज रविवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास घडला.




अंजना चव्हाण (वय ४०) त्यांची जाऊ वैशाली चव्हाण (वय ३८, दोघी रा.चुंगी ता.अक्कलकोट) अशी मयत सख्ख्या जावांची नावे आहेत. जखमी गणेश चव्हाण (वय ४५ ) हे यातील मयत अंजना चव्हाण यांचे पती आहेत. मयत दोघी रविवारी दुपारी मार्डी येथे देवदर्शन घेऊन गणेश चव्हाण यांच्या दुचाकी पाठीमागे बसून बाळे ते चुंगी गावाकडे निघाल्या होत्या. वाटेत जुना पुणे नाका येथील ब्रिजवर त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की दुचाकीवरील दोन्ही महिला गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडल्या. तर दुचाकीस्वार गणेश चव्हाण हे देखील गंभीर जखमी झाले. अपघाताची खबर समजताच फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील हवालदार ढोबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून रस्त्यावर पडलेल्या तिघांनाही येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेव्हा अंजना आणि त्यांची जाऊ वैशाली चव्हाण या दोघीना डॉक्टरांनी मृत घोषित केले. गणेश चव्हाण यावर उपचार सुरू आहेत.

## ट्रॅक्टरचे चाक कमरेवरून गेल्याने मजूर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -** ट्रॅक्टरचे चाक कमरेवरून गेल्याने बिहारचा एक मजूर मार लागून जखमी झाल्याची घटना धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे शनिवारी दुपारी घडली. राम प्रताप राय (रा. येरमाळा, मूळ रा. बिहार) असे त्या जखमी मजुराचे नाव आहे. तो शनिवारी दुपारी येरमाळा येथील शिवाजी चौकात ट्रॅक्टरच्या खाली उभे राहून ट्रॅक्टर बंद करत होता. चुकून ट्रॅक्टरचे गिअर पडल्याने ट्रॅक्टरचे चाक कमरेवरून गेल्याने मार लागून तो जखमी झाला. त्याला येरमाळा येथील आरोग्य केंद्रात व धाराशिवच्या सरकारी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मालक धनंजय बारकुल यांनी मध्यरात्री दाखल केले.

## गतिरोधकावर मोटरसायकल आदळून महिला जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -** पाठीमागे बसून प्रवास करीत असताना स्पीड ब्रेकरवर दुचाकी उडून खाली कोसळल्याने महिला जखमी झाली. हा अपघात नांदगाव (ता.तुळजापूर) येथे शनिवारीरात्रीच्या सुमारास घडला.

ललिता गोविंद कोळी (वय ४४ रा. नांदगाव) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या दुचाकीच्या पाठीमागे बसून गावातील महादेव मंदिराकडे निघाल्या होत्या. वाटेतील गतिरोधकावर दुचाकी आदळल्याने त्या खाली कोसळून जखमी झाल्या. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उच्चार करून येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**रानमसले येथे आत्महत्येचा प्रयत्न**

सोलापूर - दारूच्या नशेत एका ३४ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे शनिवारी रात्री घडली. मारुती पवार (वय असे त्याचे नाव आहे. शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास तो नशेत असताना गळफास घेतला. नंतर त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## मॅट्रिमोनी साईटवरील ओळखीतून घटस्फोटितेवर लैंगिक अत्याचार

**केतन शहा याच्याविरुध्द बलात्काराचा गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-** लग्न जुळविणाऱ्या एका ऑनलाईन साईट केवरून ओळख करून घेत एका ३५ वर्षीय घटस्फोटित महिलेला लग्नाचे खोटे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी केतन अनिल शहा (रा. गणेश कॉलनी, सिव्हिल चौक, क्षीरसागर मिल च्य पाठीमागे सोलापूर) याच्यावर सलगर वस्ती पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत खुद्द पीडित महिलेने फिर्याद दिली आहे. लैंगिक अत्याचाराची ही घटना २३ फेब्रुवारी ते १ सप्टेंबर २०२६ दरम्यान सलगर वस्ती भागात घडली. यातील फिर्यादी ही घटस्फोटीत आहे. त्यांची आरोपीबरोबर २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मेट्रोमोनी साईटवरून ओळख झाली होती. त्यानंतर ७ महिन्यांच्या कालावधीत फिर्यादी घरी एकटी असताना आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. तसेच फिर्यादीकडून खर्चासाठी पैसे आणि सोन्याची अंगठीही घेतली.

फिर्यादीने लग्नाचा तगादा लावला असता आरोपीने त्याच्या अनिल एजन्सी या दुकानातून तिला हाकलून दिले, शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार सुरज कुतवळ हे करत आहेत.

## ५१० किलो खवा, पेढे व कलाकंदचा साठा जप्त करून नष्ट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ ऑक्टोबर-** शारदीय नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन, धाराशिव यांच्या वतीने तुळजापुरात १७ व १८ ऑक्टोबर रोजी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत एकूण ५१० किलो खवा, पेढे व कलाकंदाचा संशयास्पद साठा जप्त करून किंवा नष्ट करून कारवाई करण्यात आली.

'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेंतर्गत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार, सहआयुक्त श्रीकांत करकाळे आणि सहायक आयुक्त नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. १७ ऑक्टोबर रोजी तीन भट्ट्यांची तपासणी करून आठ औपचारिक नमुने घेण्यात आले.

यावेळी २३६ किलो खवा, २८ किलो कंदी पेढे, २८ किलो साधे पेढे आणि १३ किलो केशर पेढे असा एकूण ३०५ किलो साठा जप्त करण्यात आला. तर १८ ऑक्टोबर रोजी पाच अन्न आस्थापनांची तपासणी करून आठ सर्वेक्षण नमुने घेण्यात आले. यामध्ये पांढऱ्या व तपकिरी रंगाचा सुट्या स्वरूपातील कलाकंद आणि पिवळ्या रंगाचे पेढे असा एकूण २१० किलो संशयास्पद साठा आढळला. हा साठा नष्ट करण्यात आला.

तपासणीदरम्यान काही ठिकाणी विक्रीसाठी ठेवलेल्या पेढे व कलाकंदामध्ये शुद्ध खव्याऐवजी पाम तेल, वनस्पती तेल आणि इतर बिगर-दुग्धजन्य घटकांचा वापर केल्याचे आढळून आल्याचे प्रशासनाने सांगितले. तसेच काही खाद्यपदार्थांवर उत्पादकाचे नाव, घटक व उत्पादनासंबंधी आवश्यक माहिती दर्शविणारी कायदेशीर लेबले नव्हती. संबंधित व्यावसायिकांकडे खरेदी-विक्रीची अधिकृत बिलेही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.

भाविकांचे आरोग्य आणि खाद्यपदार्थांचे नाशवंत स्वरूप लक्षात घेऊन अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ च्या कलम ३८(४) नुसार संबंधित व्यावसायिकांच्या संमतीने संशयास्पद साठा नष्ट करण्यात आला. तसेच विनानोंदणी व्यवसाय करणाऱ्या संबंधित अन्न व्यावसायिकाला अन्न सुरक्षा व मानके नियम, २०११ अन्वये व्यवसाय बंद करण्याची नोटीस बजावण्यात आली.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी पल्लवी इंबडे, गणेश दत्तु, अजय गाढे आणि अंकुश नरवाडे यांच्या पथकाने केली. या मोहिमेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे स्वच्छता निरीक्षक मनोज घोडगे यांच्यासह तुळजापूर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## बोटांच्या ठशांच्या आधारे सराईत गँगस्टर जेरबंद; मोगले साडी सेंटरमधील चोरीचा छडा

**आरोपीला दोन दिवसांची पोलिस कोठडी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -** मंगळवार पेठ येथील 'मोगले साडी सेंटर'मध्ये झालेल्या १० लाख ७० हजार रुपयांच्या घरफोडीचा छडा लावण्यात जोडभावी पेठ पोलिसांना यश आले आहे. फॉरेन्सिक तपासणीत घटनास्थळी सापडलेल्या बोटांच्या ठशांच्या आधारे पोलिसांनी उत्तर प्रदेशातील सराईत आंतरराज्यीय गँगस्टर राहुल तहसिलदार सिंग(वय ३२ रा. उत्तरप्रदेश) याच्या मुसक्या आवळल्या आहेत. न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

गतवर्षी २१ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री मोगली साडी सेंटर बंद केल्यानंतर चोरट्याने टेरेसवरील पत्र्याचे नट-बोल्ट उचकटून दुकानात प्रवेश केला होता. कॅश काउंटरमधील ७० हजार आणि तिजोरीतील १० लाख रुपये अशी एकूण १० लाख ७० हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. घटनेनंतर पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने घटनास्थळावरून बोटांचे ठसे गोळा केले होते. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा नोंद केला होता. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरु होता. वैज्ञानिक तपासादरम्यान मिळालेल्या बोटांच्या ठशांच्या आधारे संशयिताची ओळख पटली. आरोपी राहुल तहसिलदार सिंग हा मूळचा उत्तर प्रदेशचा असून तेथील गँगस्टर कायद्यांतर्गत वॉन्टेड होता. उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील कोल्हापूर येथेही त्याने गंभीर गुन्हे केले आहेत.

काही महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेश पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले होते, त्यानंतर पुढील तपासासाठी तामिळनाडू पोलिसांनी त्याचा ताबा मिळवला होता. सोलापूर शहर पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून १५ ऑक्टोबर रोजी त्याला तामिळनाडू पोलिसांकडून ताब्यात घेतले. शनिवारी न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. प्रणव उपाध्ये आणि ॲड. भागवत इंदापूरकर बाजू मांडत आहेत. सहायक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहे.

## सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये 'सतत सहा तास वाचन' उपक्रम

**१०८ विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांचाही सहभाग**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर -** माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त (वाचन प्रेरणा दिन) येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमध्ये 'सतत सहा तास अखंड वाचन' हा अभिनव उपक्रम झाला. उपक्रमात महाविद्यालयातील तब्बल १०८ विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनीही सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यानंतर कार्यक्रमाच्या समन्वयक ज्योती यादव यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे खजिनदार जे. सी. शितोळे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य ए. बी. कदम यांनी दैनंदिन जीवन जगताना वाचनाची असलेली अपरिहार्यता व गरज स्पष्ट केली. विशेष म्हणजे, केवळ विद्यार्थीच नव्हे तर प्राचार्य डॉ. ए. बी. कदम यांच्यासह ज्युनियर व सीनियर विभागातील प्राध्यापकांनीही स्वतः प्रत्यक्ष बसून या उपक्रमात वाचन केले.

सूत्रसंचालन प्रा.रूपाली शिंदे यांनी केले. उपक्रमासाठी ग्रंथपाल ज्योती यादव, ग्रंथालय परिचर, महाविद्यालयातील ज्युनियर व सीनियर विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. आभार प्रा.के.एम.माळी यांनी मानले.

## उद्योगमंत्री उदय सामंत आज सोलापूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -** महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत हे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातील उद्या, सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात सांगोला, मंगळवेढा, बार्शी, वैराग आणि सोलापूर शहरातील विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ते शिक्षक, शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संस्थाचालकांशी संवाद साधणार आहेत. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. सायंकाळी सोलापूर शहरातील सात रस्ता परिसरातील शिवसेना भवन 'सेवालय' येथे उदय सामंत यांची पदाधिकारी बैठक होणार आहे. यावेळी ते पत्रकारांशी संवाद साधणार असून, प्रमुख संस्थाचालकांशीही चर्चा करणार आहेत.



## 'महायुती' उमेदवारांच्या प्रचारार्थ बार्शीत संवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १८ ऑक्टोबर -** भाजपा-महायुतीच्या पुणे पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारार्थ बार्शी येथे पदवीधर व शिक्षक मतदारांचा संवाद मेळावा झाला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडला. यावेळी करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांच्यासह भाजपा-महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मेळाव्यात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दोन्ही उमेदवारांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांनी समन्वयाने आणि जोमाने काम करण्याचे आवाहन केले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, अशा सूचना दिल्या.




आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शी तालुक्यातून दोन्ही उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकजुटीने प्रयत्न करतील, असा निर्धार व्यक्त केला.

यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, उपसभापती संतोष निंबाळकर, बाजार समितीचे सभापती विजय गरड, अरुण बारबोले, भाजयुमो जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत, भाजपा शहराध्यक्ष महावीर कदम, पदाधिकारी, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सिद्राम पाटोळे



**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-** उत्तर सदर बझार, साळवे नगर, लष्कर येथील मातंग समाजाचे सल्लागार सिद्राम रामा पाटोळे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने आज रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मातंग समाजाचे नेते सुरेश पाटोळे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

### आगतराव मदने



**पिलीव, दि. १८ ऑक्टोबर-** माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील आगतराव सखाराम मदने (वय ९०) यांचे दि. १८ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### श्रीरंग गुंड



**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-** येथील उपळाई रोड, चव्हाण प्लॉट येथील रहिवासी श्रीरंग त्रिंबक गुंड (वय ६९) यांचे शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. श्रीरंग गुंड यांच्या पार्थिवावर रविवारी, दि. १८ ऑक्टोबर रोजी मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गांधीगिरी करत थांबवली ऊस तोड

## संगम येथे शिवसेनेचे आंदोलन; शेतमालक, कामगारांना दिले गुलाब पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑक्टोबर -** शिवसेनेच्या वतीने गणेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तालुक्यातील संगम येथे गांधीगिरी मार्गाने आंदोलन करण्यात आले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली. ऊसतोड सुरू असलेल्या शेतांमध्ये जाऊन शेतमालक व ऊसतोड कामगारांना गुलाबपुष्प देऊन, योग्य दर जाहीर होईपर्यंत ऊसतोड करू नये, असे आवाहन करण्यात आले.



महाराष्ट्रात ऊस गाळप हंगाम सुरू झाला असून, साखर कारखान्यांकडून ऊसदर जाहीर होण्यापूर्वीच ऊसतोड सुरू करण्यात येत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. ऊस उत्पादनासाठी लागणारी खते, औषधे, कीटकनाशके, पाणी, वीज, सिंचन, मशागत, वाहतूक आणि शेतमजुरी यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. मजुरांच्या मजुरीतही मोठी वाढ झाली आहे. दुसरीकडे, नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान आणि विविध रोगांमुळे ऊस उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे एकरी उत्पादन कमी झाले. वाढलेल्या खर्चाचा आर्थिक भार शेतकऱ्यांवरच पडतो. एवढा खर्च करून ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्याला मात्र त्याच्या कष्टाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळत नसल्याची भावना ऊस उत्पादकांमध्ये आहे. त्यापार्श्वभुमीवर ऊस उत्पादकांना प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी संगम गावचे माजी सरपंच रमेश इंगळे ग्रामपंचायत सदस्य नरा इंगळे आकाश पराडे पाटील नवनाथ इंगळे सचिन इंगळे अक्षय भोई विकास भोई अमित भोई, अविनाश भोई, आदित्य इंगळे आदी उपस्थित होते.

**उत्पादन खर्चानूसार दर द्यावा**

ऊसदर निश्चित करताना केवळ कारखान्यांचा आर्थिक व्यवहार न पाहता शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च, साखर व उपपदार्थांमधून मिळणारे उत्पन्न आणि शेतकऱ्यांचा रास्त मोबदला यांचाही विचार करावा, अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाच्या गणेश इंगळे यांनी व्यक्त केली.

## भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक; दोघांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १८ ऑक्टोबर -** बार्शी बायपासवरील बीआयटी कॉलेजजवळ भरधाव कारने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात विजय तेरकर (वय ३४) यांचा जागीच, तर दुचाकीचालक हनुमंत वांजरखेडे (वय ३०, दोघेही रा. खामसवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास हा अपघात घडला. याप्रकरणी कारचालक माउली शाहुराव कळसे (रा. हनुमंतवाडी, ता. निलंगा, जि. लातूर) याच्याविरुद्ध विजय यांचे काका अरुण तेरकर यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विजय हा पुणे येथे पत्नी व मुलासह राहत होता. तो स्वामी समर्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स येथे मॅनेजर व चालक म्हणून काम करत होता. शनिवारी तो हनुमंत वांजरखेडे यांच्या दुचाकी (क्र. एमएच २५ बीजी ५८५४) वरुन खामसवाडी येथे देवीच्या यात्रेला जाण्यासाठी निघाले. विजय हा दुचाकीवर मागे बसला होता.

सकाळी ११.३० च्या सुमारास लातूरहून कुर्डुवाडीकडे जाणाऱ्या कारने (क्र. एमएच २४ बीडब्ल्यू २८७२) रस्त्याच्या विरुद्ध बाजूला येऊन दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातानंतर दोघांनाही बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, विजय यांचा जागीच मृत्यू झाला होता, तर गंभीर जखमी हनुमंत यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु असताना त्यांचाही मृत्यू झाला. अपघातात कार आणि दुचाकीचे मिळून अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. बार्शी शहर पोलीसात फिर्याद दाखल केली आहे.

## छायाचित्रातून...



**दुर्गादेवी रुपदर्शन...**

**सोलापूर : अक्कलकोट रोड महालक्ष्मी मंदिरात देवीला रविवारी दुर्गादेवी रुपात सजवण्यात आले होते.**



**लक्ष्मीदेवी रुपदर्शन...**

**सोलापूर : विव्हको प्रोसेस महालक्ष्मी मंदिरात रविवारी देवीला लक्ष्मीदेवी रुपाची सजावट करण्यात आली होती.**



**धनलक्ष्मी रुपदर्शन...**

**तामलवाडी : कटारे परिवारच्या श्रीमहालक्ष्मी मंदिरात रविवारी देवीला धनलक्ष्मीचे रुप देण्यात आले होते.**



**मोडनिंब : छत्रपती शिवाजी महाराज चौकातील नवरात्रोत्सव मंडळाच्या देवीची महिला मंडळाकडून पूजा करण्यात आली.**



**सोलापूर : सरस्वती चौक नवरात्र महोत्सव मंडळ येथे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते पूजा पार पडली. याप्रसंगी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे श्री दुर्गामाता दौडीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे मंगळवारी विजयादशमी निमित्त श्री दुर्गामाता दौड काढण्यात येणार आहे. मंगळवारी सकाळी ६.३० वाजता सोलापूर बसस्थानक येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकातून या दौडीस प्रारंभ होईल.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे घटस्थापना ते विजयादशमीपर्यंत दररोज श्री दुर्गामाता दौड काढण्यात येते. सोलापूर शहरात यंदाच्यावर्षी सात भागांतून दररोज ही श्री दुर्गामाता दौड काढण्यात आली. या सर्व दौडींचा समारोप विजयादशमी दिवशी होणार आहे.सोलापूर शहरातील हिंदू बांधवांनी मंगळवारी होणाऱ्या श्री दुर्गामाता दौडीत सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे करण्यात आले आहे.

# समर्थ बँक निवडणूक : १३२० मतदारांनी बजावला हक्क

### ३०.८८ टक्के मतदान; आज होणार मतमोजणी

### सहकार परिवार आणि समर्थ बँक बचाव व विकास पॅनलमध्ये झाली लढत





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

येथील समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या १५ जागांसाठी रविवार, दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. बँकेच्या एकूण ४ हजार २७७ मतदारांपैकी १ हजार ३२० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ३०.८८ टक्के मतदान झाले आहे. सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी डफरीन चौकातील सारस्वत ब्राम्हण समाज मंगल कार्यालय येथे सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी दिली.

समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या एकूण जागांपैकी तीन जागा बिनविरोध झाल्या आहेत. यामध्ये इतर मागास प्रवर्गातून रवींद्र गारुडकर, अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून महानंद कांबळे आणि भटक्या जाती व विमुक्त प्रवर्गातून प्रकाश बंडगर यांचा समावेश आहे. उर्वरित जागांसाठी ही निवडणूक लागली होती. सहकार परिवार आणि समर्थ बँक बचाव व विकास पॅनलमध्ये लढत झाली. पंढरपूर येथील मतदान केंद्रावर सर्वाधिक तर कोल्हापूर येथील मतदान केंद्रावर सर्वात कमी मतदान झाले आहे.

**रिंगणातील प्रवर्गनिहाय उमेदवारांची नावे**

सर्वसाधारण प्रवर्ग : करकमकर किरण तुकाराम, कामतकर अमित बाळकृष्ण, खाडिलकर मुरलीधर श्रीकृष्ण, गोखले श्रीधर वसंत, चौधरी स्वरूप दिलीप, झळकीकर संजय नारायण, दुलंगे दिलीप शिवमुर्ती, देशपांडे अनिरुद्ध प्रभाकर, नंदुरकर मिलिंद सत्यबोध, बागेवाडीकर प्रशांत नरसिंह, माने युवराज लक्ष्मण, रेंबसू चंद्रकांत नरसिंगराव, सिंग ओमप्रकाश सुर्यबक्ष, सिंग दिव्यांशु राजेंद्रबहादूर, सिंग राहुल ओमप्रकाश. महिला प्रवर्ग : इनामदार सुजाता प्रकाश, झळकीकर उमा संजय, सिंग मालती अमरबहादूर.

मतदान केंद्रनिहाय एकूण मतदार, झालेले मतदान आणि टक्केवारी याप्रमाणे; सोलापूर-४५०-१३५-३० टक्के, सोलापूर-४५०-१४४-३२ टक्के, सोलापूर-४५०-११६-२८ टक्के, सोलापूर-४५०-१६६-३६.८९ टक्के, सोलापूर-४५०-१२४-२७.५६ टक्के, सोलापूर-४५०-१२७-२८.२२ टक्के, सोलापूर-४५०-१२१-२६.८९ टक्के, सोलापूर-३८०-११४-३० टक्के, पंढरपूर-१३९-८२-५८.९९ टक्के, कोल्हापूर-६०-१०-१६.६७ टक्के, पुणे-४१७-१२३-२९.५० टक्के, ठाणे-६१-२७-४४.२६ टक्के. सोलापुरातील रॉजर्स इंग्लिश मिडीयम स्कूलमधील ८ तर पुणे, ठाणे, पंढरपूर, कोल्हापुरातील प्रत्येकी एक अशा १२ केंद्रांवर मतदान पार पडले. मतदान प्रक्रियेसाठी एकूण ९० कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून डफरीन चौकातील सारस्वत ब्राह्मण समाज मंगल कार्यालय मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. एकूण ६ टेबलवरून मतमोजणी केली जाणार आहे. मतमोजणी केंद्रावर दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री नागनाथ यात्रेस आजपासून प्रारंभ

### सामाजिक ऐक्य अनब श्रध्देचा उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

आठशे वर्षांची परंपरा असलेल्या व सर्व जाती धर्मांचे ऐक्य साधणाऱ्या श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री नागनाथ यात्रेला सोमवार, दि.१९ ऑक्टोबरपासन प्रारंभ होणार आहे. या यात्रेच्या निमित्ताने आज पहिला तर बुधवार, दि.२१ ऑक्टोबर रोजी दुसरा गण निघणार आहे. श्रीक्षेत्र माणूर (जि.बीड) येथून आठशे वर्षांपूर्वी भक्त बातकव्वा मुडके यांच्या भक्तीला प्रसन्न होऊन श्री नागनाथ श्रीक्षेत्र मार्डी येथे आले असल्याची अख्यायिका आहे. दरवर्षी अश्विन शुध्द नवमी व एकादशी या दिवशी जंगम रुपात दर्शन देईन, असा वर श्री नागनाथांनी बातकव्वा यांना दिला. तेव्हापासून ही यात्रा सुरु झाली आहे. सध्या श्री नागेश स्वामी हे खर्गे महाराज आहेत.

सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १० वाजता खर्गे महाराजांच्या निवासस्थानी आरती झाल्यानंतर मिरवणुकाला सुरुवात होईल. रात्री २ वाजता गण



श्री नागनाथ मंदिरात आल्यानंतर क्षौर, स्नानाधी विधी झाल्यानंतर पहिला संचार बातकव्वांच्या समाधीवर होईल. मुडके ओटा, पाटील ओटा, मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार व देशमुख ओटा याठिकाणी पाऊस, पेरणी, राजकीय परिस्थिती, शांतता आदी प्रश्न विचारुन भाकणूक होते. गण मार्कंडेय ऋषींच्या दर्शनाला जातात. पहाटे ४ वाजता गावाच्या वेशीत जाळ केला जातो. त्या अग्नीतून खर्गे महाराज आणि भक्तगण गावात प्रवेश करतात. हाटवट गल्ली येथील नागनाथ मंदिरात धान्य शिवले जाते.

मंगळवार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी खर्गे महाराजांचा आद्य नागनाथ भक्त बातकव्वा मुडके यांचे विद्यमान वंशज अमित गौरीशंकर मुडके यांच्या घरी उपवास सुटतो. बुधवार दि.२१ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता दुसरा गण निघेल. पहाटे ३ वाजता गण मंदिरात आल्यानंतर पहिल्या दिवशीप्रमाणेच भाकणूक होते. खापरीचा पार येथे अन्न उधळण्याचा कार्यक्रम होतो. अज्ञानसिद्धांची आणि गणाची भेट होते. लिंबाऱ्याच्या पानांच्या माळा प्रसाद म्हणून वाटल्या जातात.

यात्रेच्या यशस्वीतेसाठी 'भाजपा'चे प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, जि.प.चे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, पंचायत समितीच्या सभापती तेजस्विनी बोराडे, सरपंच प्रांजली गणेश पवार, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मार्तंडे, मार्डी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मनोहर जगताप, ग्रामविकास अधिकारी बापू हाके आदी परिश्रम घेत आहेत.



## श्री पंचमुखी हनुमान देवस्थानम् येथे आज ब्रतुकम्मा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

तेलुगू संस्कृतीचा मानबिंदू, महिलांच्या एकजुटीचे प्रतीक आणि निसर्गपूजेचा अनोखा आविष्कार असलेला ब्रतुकम्मा महोत्सव सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापूरच्या पूर्व भागातील जुना वालचंद कॉलेज गेटसमोरील श्री पंचमुखी हनुमान देवस्थानम् येथे साजरा करण्यात येणार आहे.

गेल्या सुमारे ४० वर्षांपासून येथे ही परंपरा जपली जात आहे. ब्रतुकम्मा सजावट स्पर्धा, पारंपरिक लोकगीते आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यांमुळे या उत्सवाला विशेष रंगत येते. या उपक्रमांतून महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळण्याबरोबरच नव्या पिढीला पारंपरिक संस्कृतीची ओळख करून दिली जात आहे, असे नगरसेवक सत्यनारायण गुर्रम यांनी सांगितले.

## नवरात्रोत्सव मंडळांनी शेतकरी, जनावरांसाठी मदत करावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

यंदाच्या वर्षी पाऊसमान कमी झाल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात नवरात्रोत्सव मंडळांनी अनावश्यक खर्च कमी करुन शेतकरी, शेतमजूर व मुक्या जनावरांसाठी सर्वतोपरी मदत करावी, असे आवाहन सार्वजनिक मध्यवर्ती नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने करण्यात आले.

नवरात्रोत्सव आणि दुष्काळी परिस्थिती या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या एका बैठकीत चारा-पाणी, शैक्षणिक साहित्य, बंद विहिरी व हातपंप पुनरुज्जीवित करणे यांसारख्या सेवाभावी उपक्रमांत मंडळाच्या व संस्थेच्या माध्यमातून सक्रिय सहभाग नोंदवून सेवा घडवावी, असेही याप्रसंगी सांगण्यात आले.

पार्क मैदानावर सीमोल्लंघनासाठी निघणाऱ्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या सर्व मंडळांनी व पाच मानांच्या देवी देवालयाच्या मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात, आनंदात, उत्साहात व शांततेने सहभागी व्हावे. उत्सवास कोणतेही गालबोट लागणार नाही याची काळजी घेत, हिंदू धर्म रूढी-परंपरेनुसार सर्व विधी पार पाडावेत. रात्री १० वाजेपर्यंत मिरवणूक पार पाडण्यात येईल, असेही यावेळी ठरले.मंगळवार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता महापौर विनायक कोंड्याल, पोलिस आयुक्त एम.राजकुमार,आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, डॉ.सूर्यप्रकाश कोठे आदींच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार पोलिस चौकीजवळ अग्रमानीनी जयभवानी नवरात्र महोत्सवच्या देवीची पूजा करुन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले. या बैठकीत जगदीश मुनाळे, विजय पुकाळे, दत्तात्रय मेनकुदळे, चक्रपाणी गज्जम, मल्लिनाथ सोलापूरे, बाबा शेख, निलेश शिंदे, गणेश चिंचोळी यांच्यासह सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुनी पेन्शन, अनुदानसाठी पाठपुरावा : प्रा. बी.पी. रोंगे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ ऑक्टोबर-**

जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित शाळा-महाविद्यालयांचे अनुदान, टीईटी सक्ती आणि शिक्षकांची अशैक्षणिक कामांतून मुक्तता यासंदर्भात पाठपुरावा करणार आहे, असे पुणे विभाग शिक्षक मतदार संघातील महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे उमेदवार प्रा.डॉ.बी.पी.अर्थात बब्रूवाहन रोंगे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

स्वेरी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात केलेल्या कामामुळे शिक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. पुणे विभागातील ५ जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांमधील सुमारे ३५ हजार शिक्षकांशी थेट संवाद साधला आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासकांच्या आग्रहामुळे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त विविध ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार व अपार आयडी तयार करणे, यू-डायसची माहिती अद्ययावत करणे, प्रशिक्षण पूर्ण करणे, विविध अभियानांचे अहवाल भरणे आणि नोंदवह्या सांभाळणे अशी अनेक अशैक्षणिक कामे करावी लागतात.

आपण १७ वर्षे शिक्षक आणि प्राध्यापक म्हणून काम केले आहे. ही निवडणूक शिक्षकांच्या प्रश्नांसाठीची लढाई आहे. मते खाण्यासाठी नव्हे तर लढण्यासाठी मी उभा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी सुरेश राठोड, सोमनाथ राठोड, किसन जाधव, अर्जुन खटके, प्रेमलता कांबळे, मारुती तोडकर, फरीद जमादार आदी उपस्थित होते.

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांचे विचार जनमानसात रुजवावेत : डॉ.नगरकर



### डॉ. अब्दुल कलाम साहित्य संमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रेरणादायी विचार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे आणि राष्ट्रउभारणीसाठी नव्या पिढीला प्रेरित करणे, हेच संमेलनाचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन डीआरडीओचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर यांनी केले.

सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे १५ ते १७ ऑक्टोबरदरम्यान पहिले डॉ. अब्दुल कलाम साहित्य संमेलन व राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात पार पडले. ड्रीम फाउंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र, पुणे आणि चाणक्य गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संमेलनाचे मुख्य संयोजक व स्वागताध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांनी नेटके नियोजन केले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत साहित्य, विज्ञान, कौशल्य विकास आणि राष्ट्रनिर्मितीवर विचारमंथन झाले.

संमेलनाचे उद्घाटन माजी खासदार व भारत विकास संगमचे राष्ट्रीय संयोजक बसवराज पाटील शेडम यांच्या हस्ते झाले. संमेलनाध्यक्ष म्हणून कवी व प्रेरणादायी वक्ते डॉ. शिवाजी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. कलाम यांचे जीवन संघर्ष, ज्ञान, साधेपणा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार नव्या पिढीपर्यंत होणे आवश्यक असून युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले. युवकांनी मोठी स्वप्ने पाहून ज्ञान, विज्ञान आणि कौशल्याच्या बळावर ती साकार करावीत. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रातून देशाच्या विकासात योगदान देणे हीच डॉ. कलाम यांना खरी आदरांजली ठरेल, असे बसवराज पाटील शेडम यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले, तर प्रा. बाळासाहेब सोनवणे यांनी आभार मानले. ड्रीम फाउंडेशनच्या सचिव संगीता पाटील आणि कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी आयोजनात महत्त्वपूर्ण सहभाग घेतला.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्राचार्य नारायण खैरे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ ऑक्टोबर -**
महात्मा ज्योतिराव फुले इतिहास अकादमी, पुणे यांच्या वतीने दिला जाणारा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार - २०२६ प्राप्त झाल्याबद्दल बावची विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य नारायण मारुती खैरे यांचा परंडा येथे सत्कार करण्यात आला.

बावची विद्यालय आणि वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय, परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सायबर क्राईम जनजागृती व मुलींची सुरक्षा' या मार्गदर्शन कार्यक्रमात परंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांच्या हस्ते खैरे यांचा गौरव करण्यात आला.

या पुरस्काराचे वितरण १८ ऑक्टोबर रोजी पुणे येथील सारथी सभागृहात होणार आहे. सत्कारप्रसंगी पोलीस हवालदार विश्वनाथ शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल ताड यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य नारायण खैरे यांच्या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### आसु येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**परंडा, दि.१८ ऑक्टोबर -**
ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आसु (ता. परंडा) येथे तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ, नवी मुंबई यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करून वैद्यकीय मार्गदर्शन केले. गंभीर आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी तेरणा हॉस्पिटलमध्ये निःशुल्क वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गौतम लटके, तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, धनाजी गायकवाड, विष्णू सांगडे, सुजित जाधव, शशिकांत खुने, सागर बुरंगे, सदस्य श्रावण गणगे, रघुनाथ माने, रोहिदास बुरुंगे आदी उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



### श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
'सुदृढ बालक, सशक्त भारत' या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २०२६ च्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातर्फे श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांच्या नेत्र, हृदय तसेच इतर आरोग्यविषयक समस्यांची तपासणी करून आजारांचे वेळेत निदान व योग्य उपचार मिळावेत, हा उद्देश होता. यावेळी व्यवस्थापक डॉ. पंकज शिंगारे, डॉ. सूरज रणशूर, महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमिला काशीद, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते ज्योतीराम ओव्हाळ, औषध निर्माण अधिकारी वंदना राऊत आणि परिचारिका मनिषा पवार यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक केशव पाटील, कुमार निकम, बालाजी गोरे, राजेंद्र जाधव, शरद क्षिरसागर, बी.बी. गुंड, शेषनाथ वाघ, शिक्षक प्रतिनिधी महेश पाटील यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### भोत्र्यात शॉर्टसर्किटमुळे पाऊण एकर ऊस जळाला

**परंडा, दि.१८ ऑक्टोबर -**
तालुक्यातील भोत्रा येथील शेतकरी यशवंत मारुती पवार यांच्या शेतातील महावितरणच्या डीपीमध्ये १६ ऑक्टोबर रोजी शॉर्टसर्किट झाल्याने अंदाजे पाऊण एकर ऊस जळून खाक झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महसूल अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामा करून शासनाकडून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी पवार यांनी तहसीलदारांकडे केली आहे. दरम्यान, परंडा तालुक्यात या आठवड्यात विविध ठिकाणी ऊस जळण्याच्या घटना घडल्या असून, महावितरणने वीज यंत्रणेची तपासणी करून अशा घटना रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



### सर्पदंशाने गाभण म्हशीचा मृत्यू

**अणदूर, दि.१८ ऑक्टोबर -**
अणदूर शिवारात शेतकरी कल्याणी रेवणसिद्ध मुळे यांच्या गाभण म्हशीचा सर्पदंशाने मृत्यू झाला. ऐन दुष्काळात पशुधन सांभाळण्याचे संकट असताना या घटनेमुळे गरीब शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेनंतर अणदूरच्या तलाठ्यांनी पंचनामा केला आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले असून, शासनाने तातडीने नुकसानभरपाई देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

### १२८ कारवाया; ८५ हजारांची वसुली

**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी १७ ऑक्टोबर रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध १२८ कारवाया केल्या. या कारवाईतून ८५ हजार ६५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# सांडपाण्याचा उपयोग करून १०० एकरांवर चारा निर्मिती! : आ. राणाजगजितसिंह पाटील

### राघुचीवाडी तलावातील पाण्यावर ज्वारीची पेरणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
दुष्काळामुळे संभाव्य चारा टंचाईचे संकट गडद होत असताना राघुचीवाडी तलावातील वापरायोग्य नसलेल्या पाण्याचा पर्यायी उपयोग करून सुमारे १०० एकर क्षेत्रावर ज्वारीची पेरणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुढाकार घेतला असून, शनिवारी तलावाची पाहणी करून शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन केले.

धाराशिव शहरातून वाहणाऱ्या भोगावती नदीतील पाणी राघुचीवाडी तलावात मिसळते. यंदा पाऊस कमी झाल्याने नदीचा नैसर्गिक प्रवाह खंडित झाला असून, सध्या प्रामुख्याने शहरातील सांडपाणी तलावात मिसळत आहे.

त्यामुळे हे पाणी पिण्यासाठी किंवा मनवी वापरासाठी योग्य राहिलेले नाही. प्रशासनाने पाणीसाठ्यांमधून पाणी उपसा बंद केल्याने तलावातील पाण्याचा वापरही थांबला आहे.

हे पाणी बाष्पीभवनामुळे वाया जाण्याऐवजी त्याचा उपयोग चारा निर्मितीसाठी करण्याची संकल्पना आमदार पाटील यांनी मांडली. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनीही या उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शविली आहे.

या उपक्रमातून उत्पादित होणारा चारा शासन हमीभावाने खरेदी करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. रोजगार हमी योजनेतील मदत आणि चाऱ्याच्या हमीभावाने खरेदीची व्यवस्था प्रत्यक्षात आल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळण्याबरोबरच दुष्काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते.

मात्र, तलावातील सांडपाण्याचा वापर करण्यापूर्वी त्याची गुणवत्ता तपासून चारा पिकाची आणि पशुधनाची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक ठरणार आहे.

> **हेक्टरी १.२७ लाखांच्या मदतीसाठी प्रयत्न...**
> “ या उपक्रमांतर्गत सुमारे १०० एकरांवर ज्वारीची पेरणी करून पशुधनासाठी चारा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. चारा लागवडीला रोजगार हमी योजनेची जोड देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, या योजनेतून हेक्टरी १ लाख २७ हजार रुपये उपलब्ध होऊ शकतात. राघुचीवाडीचा शहरात समावेश असल्याने येथील शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## २१ किलोमीटर धावत तुळजाभवानीच्या चरणी नतमस्तक; ओमराजेंचे शेतकऱ्यांसाठी साकडे!



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत खासदार ओम राजे निंबाळकर यांनी रविवारी (दि. १८) पहाटे ५ वाजता धाराशिव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तुळजापूरच्या दिशेने धावण्यास सुरुवात केली. धाराशिव हाफ मॅरेथॉन टीमसोबत २१ किलोमीटरचे अंतर अवघ्या दोन तासांत पूर्ण करून त्यांनी आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.

जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळ, पाणीटंचाई आणि पिकांच्या नुकसानीमुळे संकटात सापडले आहेत. या परिस्थितीतून शेतकऱ्यांना सावरण्याचे बळ मिळावे, त्यांच्यावरील संकट दूर व्हावे आणि बळीराजाच्या जीवनात पुन्हा समृद्धी यावी, असे साकडे ओमराजे निंबाळकर यांनी देवीच्या चरणी घातले.

धाराशिव ते तुळजापूर असा २१ किलोमीटरचा प्रवास धावत पूर्ण करून देवीचे दर्शन घेण्याच्या या उपक्रमातून भक्ती आणि आरोग्याचा संगम पाहायला मिळाला. नियमित धावण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त, सातत्य आणि मानसिक ताकद यांचेही महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित झाले. मित्रपरिवार आणि धावपटूंसोबत पार पडलेल्या या उपक्रमाची परिसरात चर्चा झाली.



### लोहाऱ्यात पत्रकार बांधवांच्या हस्ते जगदंबेची आरती

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ ऑक्टोबर -**
लोहारा शहरातील जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात पत्रकार बांधवांच्या हस्ते जगदंबा देवीची आरती करण्यात आली. यावेळी मंडळाच्या वतीने रांगोळी स्पर्धा, होम मिनिस्टरसह विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार निळकंठ कांबळे, बालाजी बिराजदार, अशोक दुबे, जसवंतसिंह बायस, गिरीष भगत, सुमित झिंगाडे, विक्रांत संगशेट्टी यांच्यासह मंडळाचे नगरसेवक प्रशांत काळे, हरी लोखंडे, प्रशांत लांडगे, श्रीशल्य स्वामी, अनिल ठेले, अंबादास विरुधे तसेच महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेल्या वर्षी ५० टन ऊस; यंदा पाच टनाचीही आशा नाही!

## दुष्काळाने ऊस उत्पादक शेतकरी संकटात; रामदास आठवलेंसमोर नरेंद्र वीर यांनी मांडली व्यथा...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
गेल्या वर्षी याच शेतात ५० टन ऊस उत्पादन झाले होते. यंदा मात्र पावसाने दगा दिल्याने पाच टनही ऊस हाती लागण्याची शक्यता नाही. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक डोळ्यांदेखत वाळत असल्याची व्यथा ऊस उत्पादक शेतकरी नरेंद्र वीर यांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासमोर मांडली.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी १७ ऑक्टोबर रोजी धाराशिव जिल्हा दौऱ्यादरम्यान धाराशिव तालुक्यातील नरेंद्र वीर यांच्या शेताला भेट देऊन दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी केली. पावसाअभावी नुकसान झालेल्या ऊस पिकाची पाहणी करून त्यांनी वीर यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी नरेंद्र वीर यांनी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ऊस उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली. उत्पादन खर्च वाढत असताना पाण्याअभावी पीक वाळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. ऊस उत्पादकांना दिलासा मिळण्यासाठी उसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा, अशी मागणीही त्यांनी केली.

गावातील अन्य शेतकऱ्यांनीही आपल्या अडचणी आणि व्यथा रामदास आठवले यांच्यासमोर मांडल्या. यावेळी रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्रदेश संयुक्त सचिव राजाभाऊ ओव्हाळ, प्रदेश सचिव संजय बनसोडे, जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे, भागवत शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> **पिकांचे नुकसान, चारा टंचाईचे दुहेरी संकट...**
> पावसाने पाठ फिरवल्याने ऊसासह अन्य पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उभी पिके वाळत असल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले असून, जनावरांसाठी चारा उपलब्ध करण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. हातातोंडाशी आलेले पीक नष्ट होत असताना पशुधनाचे संगोपन कसे करायचे, अशी चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## व्यसनमुक्तीवरील नाटिका स्पर्धेत अणदूरच्या जवाहर महाविद्यालयाला द्वितीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१८ ऑक्टोबर -**
व्यसनमुक्तीविषयक जिल्हास्तरीय नाटिका स्पर्धेत अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव आणि समाजकल्याण विभाग, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १५) ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

'एक कश... आयुष्याची राख!' या विषयावरील नाटिकेतून विद्यार्थ्यांनी व्यसनाचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडले. स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल संघाला सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या नाटिकेचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा, प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे आणि प्रा. डॉ. प्रसन्न कंदले यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दयानंद कांबळे व प्रा. डॉ. वीरभद्रेश्वर स्वामी यांनी संघप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.

नाटिकेत मानसी बसवराज मुळे, जागृती दीपक कुंभार, आरती अंबादास मोळगडे, रोहित कामू जाधव, पुष्कराज बापूराव घुगे आणि समर्थ लक्ष्मण लोंढे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या यशाबद्दल महाविद्यालयात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शकांचा सत्कार करून कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयातून अभिनंदन होत आहे.

# १३ कोटींची पाणीपुरवठा योजना रखडली; टाकी उभी, तरी पाण्याची प्रतीक्षा!

## तेरखेडकरांना स्वच्छ पाणी कधी मिळणार? अपूर्ण पाइपलाइनमुळे ग्रामस्थांचा सवाल...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१८ ऑक्टोबर -**
केंद्र सरकारच्या 'हर घर जल' संकल्पनेअंतर्गत तेरखेडा गावासाठी सुरू करण्यात आलेल्या सुमारे १३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अद्याप अपूर्ण असल्याने ग्रामस्थांना स्वच्छ पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. पाण्याची टाकी बांधून तयार असली, तरी तलावापासून टाकीपर्यंतची पाइपलाइन आणि गावांतर्गत वितरण व्यवस्था अपूर्ण असल्याने प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे कोट्यवधींच्या योजनेचा लाभ ग्रामस्थांना कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या योजनेअंतर्गत पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. मात्र, तलावातून टाकीपर्यंत पाणी आणणाऱ्या पाइपलाइनचे काम अर्धवट असून, गावातील अंतर्गत पाइपलाइनची कामेही पूर्ण झालेली नाहीत.

परिणामी, पाण्याची टाकी उभी असूनही ती रिकामीच राहण्याची वेळ आली आहे. योजनेतील तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी दूर करून कामाला गती देण्याची गरज आहे. तसेच मंजूर निधी, आतापर्यंत झालेला खर्च आणि शिल्लक कामांचा तपशील प्रशासनाने सार्वजनिक करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पाण्याची टाकी बांधणे हा योजनेचा केवळ एक भाग आहे. तलावापासून टाकीपर्यंत पाणी आणणे आणि गावातील प्रत्येक भागात त्याचे वितरण करणे ही कामे पूर्ण झाल्याशिवाय ग्रामस्थांना योजनेचा लाभ मिळणार नाही.

त्यामुळे १३ कोटींच्या योजनेतील उर्वरित कामे कधी पूर्ण होणार याचे उत्तर आता संबंधित प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

> **अधिकारी-ठेकेदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**
> योजनेच्या कामाची सद्यस्थिती, आतापर्यंत पूर्ण झालेली कामे, शिल्लक कामे आणि पाणीपुरवठा सुरू होण्याची अंतिम मुदत याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.
>
> **रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी**
> पूर्वीच्या ठेकेदाराला निर्धारित मुदतीत काम पूर्ण करणे शक्य नसेल, तर नियमानुसार पुढील कार्यवाही करून नवीन ठेकेदाराची नियुक्ती करावी आणि उर्वरित कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अडथळे दूर करावेत आणि पाणीपुरवठा सुरू करण्याची निश्चित तारीख जाहीर करावी, अशीही अपेक्षा आहे.

# पदवीधरांच्या हक्कांसाठी डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विधान परिषदेत पाठवा!

## शशिकांत शिंदे यांचे प्रतिपादन...धाराशिवमध्ये महाविकास आघाडीचा पदवीधर संवाद मेळावा...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**
पदवीधर आणि शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी महाविकास आघाडीचे तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील अधिकृत उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना प्रथम पसंतीचे मत देऊन विधान परिषदेत पाठवा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार शशिकांत शिंदे यांनी केले.

धाराशिव येथे आयोजित पदवीधर संवाद मेळाव्यात ते बोलत होते. पदवीधरांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नेतृत्व विधान परिषदेत असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शशिकांत शिंदे म्हणाले की, डॉ. प्रतापसिंह पाटील हे उच्चशिक्षित असून त्यांना पदवीधर आणि शिक्षकांच्या प्रश्नांची जाण आहे. युवकांचा आवाज विधान परिषदेत बुलंद करण्यासाठी त्यांना संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी मराठवाड्यातील औद्योगिक विकास, सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न आणि रोजगारनिर्मितीवर भर दिला. स्थानिक तरुणांना रोजगारासाठी इतर शहरांत स्थलांतर करावे लागू नये, यासाठी मराठवाड्यात उद्योगधंदे वाढविणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीधरांच्या हितासाठी उपलब्ध निधीचा उपयोग रोजगारनिर्मितीशी संबंधित उपक्रमांसाठी करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पदवीधरांच्या समस्या केवळ निवडणुकीपुरत्या मर्यादित न ठेवता रोजगार, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या मेळाव्याला ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे, प्रदेश सरचिटणीस मसूदभाई शेख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर, अॅड. धीरज पाटील, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, ज्येष्ठ नेत्या शहापूरकर, महिला जिल्हाध्यक्षा मनीषा राखुंडे, उमरगा तालुकाध्यक्ष संजय पवार, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पदवीधर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१५६९

**पडता जड भारी। नेमा न टळे निर्धारी।**

निश्चय हा यशाचा आधारस्तंभ आहे. निश्चयच जर अनिश्चित असेल तर यश सुध्दा अनिश्चित असते. आपला निश्चय पक्का ठेवणारे फार कमी लोक असतात. निश्चय करणाऱ्यांची व लवकरच त्यात फेरबदल करणाऱ्यांची किंवा निश्चयापासून ढळणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. निश्चय करण्याअगोदर अनेक वेळा विचार करावा आणि एकदा का निश्चय पक्का झाला की मग त्यापासून ढळण्याचे कारण नसावे. मूळात निश्चयच जर चुकीचा असेल तर त्यापासून केव्हांही परावृत्त होणे योग्य असते. पण केवळ केलेला निश्चय कठीण आहे, आपल्याच्याने ते होत नाही, असे म्हणणे संयुक्तिक नसते. वारकरी सांप्रदायात सांप्रदायाप्रमाणे वागण्याचा निश्चय सुध्दा कठीण असतो. दिसायला हा सांप्रदाय किंवा वैष्णव सोपे दिसत असले तरी या सांप्रदायाचे , वैष्णवांचे संपूर्ण तत्व, नियम पाळणे तेवढे सोपे नाही. पण वैष्णव लोक कोणात्याही परीस्थितीत आपल्या निश्चयापासून ढळत नाहीत. आपल्या निश्चयाला, नियमाला पक्के असणाऱ्या या वैष्णवात, सांप्रदायात कोण कोणाच्या पोटी किंवा कोणत्या कुळात जन्माला आला, हे अजिबात पाहिले जात नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, **पडता जड भारी। नेमा न टळे निर्धारी।**



वैष्णव किंवा वारकरी सांप्रदाय हा मुळातच समतेच्या व निश्चयाच्या पायावर उभा आहे. ऊन, वारा, पाऊस सहजरित्या सहन करण्याची क्षमता या सांप्रदायात आहे. आपण जेव्हा एखाद्या वारीत, दींडीत सहभागी होऊ तेव्हा आपणाला याची प्रचिती येईल. या वैष्णवांचा, वारकऱ्यांचा निर्धार किती पक्का आहे हे वारीत सहभागी झाल्याशिवाय अनुभवास येत नाही. कोणताही आणि कितीही अवघड असलेला नियम हे वैष्णव टळू देत नाहीत. वैष्णव दिसायला भोळे भाबडे असले तरी त्यांचा निश्चय, त्यांचे नियम, त्यांचे वर्तन समाजोन्नतीसाठी स्विकारण्यासारखे असतात. मी-मी म्हणणारा माणूस आपल्या निश्चयापासून प्रसंगानुरूप ढळू शकतो. पण वैष्णव, वारकरी हे कसल्याही प्रसंगात आपल्या निश्चयापासून ढळत नाहीत. नियमाचे पक्के असणारे हे लोक कसल्याही प्रकारचा जातीभेद पाळत नाहीत. आपल्या भारतीय समाजाला आजही समतेची गरज आहे. ही गरज हा सांप्रदाय, या सांप्रदायाचे नेतृत्व करणारे संत महात्मे पूर्ण करत आहेत. या सांप्रदायातील लोकांप्रमाणे पूर्ण निश्चयी होता नाही आले तरी चालेल; पण त्यांच्याप्रमाणे निश्चयी होण्याचा प्रयत्न मात्र आपण सोडता कामा नये. कारण हा प्रयत्न खरा आनंद मिळवून देणारा असणार आहे. जय जय राम कृष्ण हरी.

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार,
दि. १९ ऑक्टोबर २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अश्विन
तिथी - शु. अष्टमी
ऋतु - शरद (दक्षिणायन)
नक्षत्र- उत्तराषाढा (१५.३७)
योग - धृति (२४.२९)
करण - बालव (२३.५४)
राहू काल : सोमवार
स.०७.३० ते ०९.००

दिनविशेष : १८१२: नेपोलियन बोनापार्टने मॉस्कोम धून माघार घेतली.
१९१४: पहिल्या म हायुद्धादरम्यान 'यप्रेसची पहिली लढाई' सुरू झाली.
१९५४: प्रसिद्ध मराठी-हिंदी अभिनेत्री, लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या प्रिया तेंडुलकर यांचा जन्म.
१९३४:ओडिया लेखक, संपादक व समाजसुधारक विश्वनाथ कार यांचे निधन.

# पद हे मिरवण्यासाठी नव्हे, तर शेवटच्या घटकाची सेवा करण्याचे साधन

**सोलापूर शहर परीट समाजसेवा मंडळाचा पदग्रहण व बोधचिन्ह अनावरण सोहळा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

'संघटनेतील पद हे केवळ मिरवण्यासाठी नसून समाजातील शेवटच्या आणि गरजू घटकापर्यंत पोहोचून त्यांना आधार देण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. असे प्रतिपादन युवा नेते सुमित भोसले यांनी व्यक्त केले.

सोलापूर शहर परीट (धोबी) समाजसेवा मंडळाच्या वतीने नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण व अधिकृत बोधचिन्ह (लोगो) अनावरण सोहळा शिवस्मारक सभागृहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (शिखर बँक) माजी संचालक अविनाश महागावकर होते. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक गणेश ननवरे उपस्थित होते. बदलत्या युगात आपल्या समाजातील नवीन पिढीला उच्च शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि त्यांच्यात उद्योजकतेची भावना निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असेही भोसले म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाश म हागावकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषण केले. या सोहळ्यात शहराध्यक्षपदी संतोष काटकर, महिला आघाडी अध्यक्षपदी ज्योत्स्ना भोसले, युवक आघाडी अध्यक्षपदी अक्षय कारंडे यांनी अधिकृत पदभार स्वीकारला. तसेच येत्या ३० डिसेंबर २०२६ रोजी होणाऱ्या भव्य वधू-वर मेळाव्याच्या अध्यक्षपदी किशोर काटकर तर लाँड्री आघाडी अध्यक्षपदी विजय शेलार यांची निवड जाहीर करण्यात आली.

**जाहीर झालेली संपूर्ण कार्यकारिणी खालीलप्रमाणे:**

शहर कार्यकारिणीः शहराध्यक्षः संतोष काटकर, सचिवः नंदकुमार भोसले, कार्याध्यक्षः प्रभाकर भोसले, उपाध्यक्षः सुशांत गायकवाड, बालाजी काटकर, मनोज आडसुळे, किरण विष्णु काटकर, संतोष गवळी, सोमनाथ राऊत, रमेश वाघमारे, खजिनदारः . सचिन पोपट चौगुले, प्रसिद्धी प्रमुख : निलेश काटकर, सह प्रसिद्धी प्रमुखः सुनील ननवरे, सरचिटणीसः किशोर काटकर, चिटणीसः महाकालेश्वर कदम, गोरख महादेव काटकर, शहर संघटकः लक्ष्मण दळवी, लाँड्री अध्यक्षः विजय शेलार. युवक संघटना : युवक अध्यक्ष अक्षय कारंडे, सचिव नवनाथ दळवी, कार्याध्यक्षः संभाजी घोडके, उपाध्यक्षः बाबाजी माडीकर, ऋषिकेश भोसले, अक्षय आडसुळे, आतिश सूर्यकांत गायकवाड, अक्षय महागांवकर, खजिनदारः रोहित कारंडे, प्रसिद्धी प्रमुखः प्रथमेश कदम, सह प्रसिद्धी प्रमुख : श्रेयश काटकर, सरचिटणीस : राहुल कदम, चिटणीसः रोहन शेलार. महिला संघटनाः महिला अध्यक्षः ज्योत्सना भोसले, सचिवः कविता रसाळकर, खजिनदारः उमा किसन कदम, उपाध्यक्षः सविता अनंत जाधव, मनिषा आनंद आडसुळे, भारती शेलार, रेणुका सोनटक्के, मीनाक्षी सोनटक्के, दिपाली माडीकर, आरती भोसले, प्रसिद्धी प्रमुखः मेघा भोसले, सरचिटणीसः वैशाली काटकर, चिटणीसः उषा काटकर, धनश्री गायकवाड. विशेष जबाबदारीः वधू-वर मेळावा अध्यक्ष (सन २०२६ - २०२७): किशोर काटकर (मेळावा दिनांकः ३० डिसेंबर २०२६) या कार्यक्रमास सोलापूर शहर व जिल्ह्यातील परीट (धोबी) समाजबांधव उपस्थित होते.

# नूमवि शाळेत भोंडला उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**



नूमवि शाळेत नवरात्र उत्सवानिमित्त भोंडला साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी प्रस्तावित केले. माधुरी घुले यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी गायलेले सुंदर देवीच्या गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जान्हवी दुधगीकर व चंचला खरात यांची उपस्थिती होती.

रोहिणी चौधरी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. व मुख्याध्यापिकांच्या हस्ते त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी देवीच्या गीतावर सुंदर नृत्य सादर केले. त्यांना सीमा बिज्जरगी, रोहिणी चौधरी, आशा गायकवाड, व प्रभावती कोथमीरे यांचे मार्गदर्शन लाभले.

पालिकांनीही सुंदर गरबा नृत्य सादर केले. शिक्षण विवेक आयोजित पपेट शो व नवरात्रोत्सव निमित्त माता पालिकांसाठी आयोजित विविध स्पर्धाचा पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रमुख पाहुण्यांचे हस्ते झाला.

प्रमुख पाहुण्या व मुख्याध्यापिकाच्या हस्ते प्रतिकात्मक हत्तीचे पूजन केले. प्रमुख पाहुण्या पालिका व शिक्षकांनी रिंगण करून हस्त नक्षत्राच्या आगमनासाठी भोंडल्यांच्या गाणी गात फेर धरला.

देवीची आरती करून व सर्व विद्यार्थ्यांना खिरापत देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन सीमा बिजरगी यांनी तर आभार रेणुका हिरेमठ यांनी मानले.

## शेळगी परिसरात गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

दारूच्या नशेत एका ५५ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शेळगी परिसरातील शिवगंगा नगरात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.

सतीश शिवाजी क्षीरसागर (वय ५५ रा.शिवगंगानगर शेळगी) असे मयताचे नाव आहे. रात्री आठ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या लाकडीवाशाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला दारूचे व्यसन होते.घरात कोणी नसताना त्याने हा प्रकार केला. ही घटना समजतात जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे हवालदार वाडीकर यांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घषित केले.



## डॉ. अब्दुल कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्काराने अरुणकुमार तळीखेडे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

डॉ. अब्दुल कलाम यांच्या ९६ व्या जयंती निमित्त डॉ. अब्दुल कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार २०२६ हे भारतीय माजी सैनिक संघटना जिल्हा अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे यांना दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिर येथे प्रदान करण्यात आला.

यावेळी डीआरडीओचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर, खासदार बसवराज पाटील शेडम, माजी आमदार नरसिंग मंगजी, कासार, कुमार करजगीकर, माजी नगरसेवक तौफिक शेख, बाबा मि स्त्री यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक काशिनाथ भतगुणकी यांच्यासह शिक्षक व माजी सैनिक, सैनिक संघटनेचे संचालक मंडळ उपस्थित होते. शाहीर रमेश खाडे यांनी शायरी व पोवाडा सादर केला.



## 'सोलहकारण भावना अनुशीलन' ग्रंथाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

आचार्यश्री विशुद्धसागरजी मुनिराज लिखित 'सोलहकारण भावना अनुशीलन' या अत्यंत महत्त्वाच्या जैन आध्यात्मिक ग्रंथाचे प्रकाशन जैन संस्कृती संरक्षक संघ (जीवराज ग्रंथमाला) व मराठी अनुवाद डॉ. संजीव शहा यांनी केले आहे. या ग्रंथाचा विमोचन सोहळा १०८ मुनिश्री सुप्रभसागरजी महाराज यांच्या हस्ते शिंगवी भवन, सम्राट चौक, सोलापूर येथे संपन्न झाला.

जैन धर्मातील सोलहकारण भावनांचे महत्त्व, त्यांचे चिंतन आणि आत्मकल्याणाच्या दृष्टीने त्यांचे अनुशीलन या विषयांवर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. आचार्यश्री विशुद्धसागरजी मुनिराज यांच्या आध्यात्मिक विचारांचा मराठी भाषेतून परिचय व्हावा आणि जैन तत्त्वज्ञान अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे, या दृष्टीने मराठी अनुवाद महत्त्वपूर्ण आहे.

या विमोचन सोहळ्याप्रसंगी अरविंद दोशी आणि श्री. डी. आर. शहा-इंडी कर, संतोष शहा, अनुप दोशी, राजकुमार दोशी, सौ जोती शहा यांची उपस्थिती होती. या ग्रंथाच्या माध्यमातून जैन धर्मातील आध्यात्मिक विचारांचे चिंतन करण्याची प्रेरणा वाचकांना मि ळेल, तसेच धार्मिक साहित्याच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# महूद येथे नवरात्र उत्सवानिमित्त रांगोळी स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ ऑक्टोबर-**



महूद (ता.सांगोला) येथील ग्रामदैवत अंबिकादेवी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पूजा देशमुख प्रथम, पूजा रणदिवे व मनस्वी बाजारे विभागून द्वितीय, योगिता कांबळे व प्रियांका खांडेकर यांनी विभागून तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना पं.स.सदस्य उमेश पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्हे व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून पल्लवी महाजन, मनीषा खबाले, वंदना पाटणे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महूद देवस्थान कमिटीचे कैलास खबाले, दीपक धोकटे, आनंद लवटे, प्रतीक ताटे, रुपेश देशमुख, हर्षवर्धन लवटे, सुनील जाधव, भैय्या पळसे, हिमालय देशपांडे, हर्षल कासार, अजय भोसले, विकास कांबळे, समाधान रेगुडे, महेश ढोणे, गणेश विभुते, अभिजीत काजळे, अनिकेत म हाजन, अभिजीत कांबळे, विकी गोटे यांनी परिश्रम घेतले.

# केडर निवडणुकीसाठीच्या प्रारूप यादीवर २१ हरकती

**२१ ऑक्टोबरला सुनावणी; १ हजार २०४ संस्थांचा प्रारूप यादीत समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा सहकारी देखरेख संघ म्हणजेच केडर निवडणुकीसाठीच्या प्रारूप यादीवरून २१ हरकती प्राप्त झाल्या असून २१ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे, तर यावर निर्णय २३ ऑक्टोबरपर्यंत घेतला जाईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी दिली आहे.

केडरच्या प्रारूप यादीत १ हजार २०४ संस्थांचा यामध्ये समावेश आहे. दावे आणि हरकती १४ ऑक्टोबरपर्यंत नोंदवल्या गेल्या. या सर्व हरकती नावात आणि वयात बदल असल्याचा दावा करणाऱ्या आणि ठरावाला चॅलेंज केलेले आहेत, अशी माहिती मुकुंद पवार यांनी दिली. अकरा तालुक्याचे ११, ५ राखीव असे १६ संचालक निवडून दिले जाणार आहेत.

राखीव मतदार संघात दोन महिला,एक ओबीसी, एक अनुसूचित जाती जमाती, एक विमुक्त भटक्या जमातीमधील उमेदवाराला संधी मिळेल. प्रारूप यादी जाहीर झाल्यानंतर दावे, हरकती मागवल्या गेल्या, त्यावर २३ ऑक्टोबरपर्यंत निर्णय घेतला जाणार असून आणि मग पुढे २७ ऑक्टोबरला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल.



## 'शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

माध्यमिक व विनाअनुदानित शिक्षकांसह सुशिक्षित बेरोजगार आणि पदवीधरांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार जयंत आसगावकर आणि हर्षदा देशमुख-जाधव यांना आगामी २३ तारखेच्या निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. अक्कलकोट येथील काशिकापेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डी.एड. कॉलेजमध्ये आयोजित संस्थेच्या मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील होते. तर जिल्हा उपाध्यक्ष अरुण जाधव, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे, आणि माणिक बिराजदार उपस्थित होते. या मेळाव्याला सुमारे दोनशे पदवीधर शिक्षक उपस्थित होते.

## दुचाकीवर मागे बसलेल्या तरुणाच्या मृत्यूस कारणीभूत; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

रस्त्यावरील दुभाजकाला जोरात धडक दिल्यामुळे दुचाकीच्या पाठीमागे बसलेला २६ वर्षीय तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात मोटारसायकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश संतोष कोळी (वय २८, रा. तोगराळी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी या संदर्भात फिर्यादीवरून प्रशांत अंबादास कोळी याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १५ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास मुकुंदनगरकडून समाधान नगरकडे भरधाव वेगाने जाताना हैदराबाद रोडवर घडली होती. फिर्यादीचा भाऊ सागर कोळी हा आरोपी चालक प्रशांत अंबादास कोळी याच्या मोटारसायकलवर पाठीमागे बसून जात होता. चालकाने आपले वाहन निष्काळजीपणे आणि अविचाराने चालवून दुभाजकाला जोरात ठोकले. या अपघातात चालक प्रशांत याला किरकोळ मार लागला, मात्र मागे बसलेल्या सागर कोळी याच्या कंबरेला आणि पायाला जबर मार लागून तो गंभीर जखमी झाला व उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# नवरात्रोत्सव, धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मिरवणूक

## सोलापुरात उद्या वाहतूक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

नवरात्रोत्सव आणि विजयादशमी व धम्म चक्र प्रवर्तन दिना निमित्त शहरात निघणाऱ्या मि रवणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर वाहतूक पोलिसांनी वाहतुकीत बदल केले आहेत. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून मिरवणूक संपेपर्यंत काही प्रमुख मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहणार आहे. वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी वाहनधारकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले आहे.

महाराष्ट्र पोलिस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये हे आदेश जारी करण्यात आले आहेत. अत्यावश्यक सेवेतील रुग्णवाहिका, दवाखान्यांची वाहने, अग्निशामक वाहने, संरक्षित व्यक्तींची वाहने आणि पोलिसांच्या परवानगीतील वाहनांना या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे.

रेल्वे स्थानकावरून एसटी स्थानकाकडे जाणाऱ्या वाहनांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक (भैय्या चौक), कल्पना कॉर्नर, डी. टी.एम. चौक, जुना हिरेज नाका, निराळे वस्ती आणि हॉटेल अंबेसेडरमार्गे एसटी स्थानकाकडे जावे. जुळे सोलापूरहून शहरात येणाऱ्या चारचाकी वाहनांसाठी जुना पुणे नाका, जुना तुळजापूर नाका, जुना बोरामणी नाका आणि अशोक चौक हा मार्ग उपलब्ध असेल. जड वाहतुकीसाठी मार्केट यार्ड, जुना पुणे नाका, जुना बोरामणी नाका, शांती चौक आणि अक्कलकोट रस्ता हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे. वाहतूक व्यवस्थेत अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी वाहनधारकांनी पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**बंद राहणारे मार्ग**

डॉ. आंबेडकर उद्यान, सम्राट चौक, रमाबाई आंबेडकर नगर, मिलिंद नगर, अस्थी विहार, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिकल चौक, सरस्वती चौक, चारपुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जुना एम्प्लॉयमेंट चौक आणि डॉ. आंबेडकर हायस्कूल ते बुद्ध विहार फॉरेस्ट या मार्गावर वाहतूक बंद राहील. तसेच फडकुले सभागृह ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरही वाहनांना प्रवेश बंद असेल.

**वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग**

विजापूरकडून पुणे किंवा हैदराबादकडे जाणाऱ्या वाहनांनी नवीन विजापूर नाका, नवीन बायपास मार्ग आणि केगाव पुलाचा वापर करावा. हैदराबादकडून पुणे किंवा विजापूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन हैदराबाद नाका, जुना हैदराबाद नाका, मार्केट यार्ड, जुना पुणे नाका आणि केगाव बायपास हा पर्यायी मार्ग असेल.

## आत्म कल्याणासाठी आराधना आवश्यक




'आत्म कल्याणासाठी आराधना, ध्यानधारणा, जप, तप, उपवास आवश्यक असते'असे प्रतिपादन परम पूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुम सिात बोलताना त्या म्हणाल्या, जैन परंपरेत आयंबील तप आराधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.या तपाम ुळे आत्मशुद्धी होण्यास मदत होते. संयमामुळे आत्मकल्याण घडते. नवकार मंत्र पठण, स्वाध्याय ध्यान यामुळे मन एकाग्र होण्यास मदत होते. क्रोध, मान, माया, लोभ, राग, द्वेष कमी करण्याचा प्रयत्न करा. आहारावर संयम हे पहिले पाऊल असून विषयांवर विजय आत्मसाधनेचे लक्ष होय.आयंबील ओली तप, नवपद आराधनेला विशेष महत्त्व आहे. या आराधनेमध्ये अरिहंत, साधू, सिद्ध, आचार्य, उपाध्याय या सर्वांना वंदन करण्यात येते. ऋतू परिवर्तनाच्या या काळात वातावरणामध्ये बराच बदल घडत असतो. या वातावरणाचा परिणाम शरीरावर होत असतो. आपले पोट देखील संतुलित असावे असा आहार ग्रहण करावा लागतो. आराधनेमुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य मजबूत होते. ऋतुमानामध्ये होणाऱ्या बदलाचा सामना करण्यासाठी शरीर आणि मन मजबूत बनल्यास आपण सहज साधना करू शकतो

**- मल्लेश पुरवंत**

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नवऱ्याने मारहाण केल्याने आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

घरगुती वादात नवऱ्याने मारहाण केल्याच्या रागात एका विवाहितेने पिवळा रंग पिऊन आत्म हत्येचा प्रयत्न केला. ही घटना एमआयडीसी परिसरात नीलम नगरात आज रविवारी सकाळी आठ वाजता घडली.

लावण्या मोहन हनमालोलू (वय ३०, रा. नीलम नगर, सोलापूर) असे त्या विवाहितेचे नाव आहे. आज रविवारी सकाळी घरगुती कारणावरून तक्रार झाली होती.

यावेळी नवऱ्याने मारहाण केली. याचा राग अनावर झाल्याने तिने अंगणात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात आई लक्ष्मी यांनी दहा वाजता दाखल केले.

## महत्त्वाचे...



अश्विन शुद्ध अष्टमीनिमित्त अकलूज ग्रामदैवत श्री अकलाई देवीची चोपाळा अलंकार महापूजा.



सांगोला : तहानलेल्या महाराष्ट्राच्या मातीवर आई तुझं पाऊल पडू दे. दुष्काळाच्या काळोख्यातून पुन्हा हिरवाई फुलू दे आणि बळीचं राज्य येऊ दे अशा आशेची विशेष महापूजा श्री अंबिका देवी मंदिर, गोंधळी गल्ली, सांगोला येथे बांधण्यात आली.




सोलापूर : जुळे सोलापूर येथील ज्ञानेश्वर सोसायटीतील महिला.



खेडभाळवणी : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी राणी घालमे, चिंगुबाई पवार, वर्षा साळुंखे, संगीता पवार, नीता जाधव, रुक्मिणी मस्के, मंदाबाई नागटिळक आदी.



गौडगाव : एकता महिला मंचतर्फे आयोजित 'नवरंग' या उपक्रमात गौडगाव येथील प्रमुख पदाधिकारी कविता दसवंत, वसुधा कुंभार,संगीता काजळे,सविता काजळे, सुखनंदा सुरवसे, वैष्णवी सुरवसे,सविता दसवंत, प्रज्ञा दसवंत,कोमल काजळे आदी.



मानेगाव : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी अमृता वाघमारे, स्वाती वाघमारे, लक्ष्मी मोरे, उषा भांगे, मंगल डाके, लोचना डाके, अनिता डाके, अविधा डाके,इंदुमती डाके, सविता डाके, अश्विनी डाके आदी.

# 'गारवा हवाहवासा' अक्कलकोटकरांना आवडला

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर -**

श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवात शनिवार दि. १७ ऑक्टोबर रोजी गारवा- हवाहवासा हा कार्यक्रम झाला. गायक- मिलिंद इंगळे, कवी- सौमित्र (किशोर कदम), वृंदा अडविरेकर यांचा सुगम गीतांच्या कार्यक्रमास श्रोत्यांनी दाद दिली. समिरा गुजर जोशी यांच्या निवेदनाने रंगत आणली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि न्यासाची सहयोगी संस्था हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले व अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम होत आहे.




श्री तुळजाभवानी माता, श्री सम र्थरुपी अन्नपूर्णा माता, राजमाता जिजाऊ, भारतरत्न, लता मंगेशकर यांची प्रतिमा, नटराज मूर्ती, पाचव्या पुष्पाचे दीपप्रज्वलन प्रसूतीरोगतज्ञ रोहिणी देशपांडे, नेत्र चिकित्सक डॉ. सिमा तोष्णीवाल, सोलापूर यांच्या हस्ते व पंचायत समिती सदस्या- विमल गव्हाणे, नगरसेविका- रेणुका राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अलकाताई जनमेजयराजे भोसले अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी अनुया फुगे, सोनाली फुगे, डॉ.आसावरी पेडगावकर सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, दर्शना लेंगडे-खोबरे, तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, दिव्या मोरे, स्मिता कदम, स्वाती निकम, संगीता भोसले, उज्वला भोसले, अंजना पवार, पल्लवी कदम, कोमल क्षिरसागर, रूपा पवार, शितल क्षिरसागर, सुवर्णा घाटगे, कविता वाकडे, छाया पवार, कविता भोसले, अनिता गडदे, निशा बाबर, तृप्ती बाबर, उज्वला भोसले, स्वपना माने, ज्योती शिंदे या हिरकणी सखी महिला यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सत्कार श्री तुळजाभवानी मातेची प्रतिमा देऊन करण्यात आला. पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी यांच्या मंत्रोच्चारात आरती झाली.

मैफिलीत 'गारवा', 'झाला निळा सवंगडी', 'गर्द गहिरा गारवा' यांसारखी गाणी थेट ऐकण्याची संधी मिळाली. गाण्यांच्या आधी होणारे काव्यात्मक वाचन आणि त्याला मिळणारी सुरांची साथ ही या कार्यक्रमाची मूळ ओळख आहे. मिलिंद इंगळे यांनी गिटारच्या साथीने रसिकांना जुन्या आठवणीत नेले. कवी सौमित्र यांनी त्यांच्या खास आणि आर्त शैलीत कविता सादर केल्या. यावेळी अध्यक्ष- जनम `जयराजे विजयसिंहराजे भोसले, कार्यकारी अध्यक्ष- अमोलराजे जनमेजयराजे भोसले, डॉ.सत्यशाम तोष्णीवाल, हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, समर्थ संदीप फुगे, उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शाम मोरे, पालखी परिक्रमा मुख्य संयोजक संतोष भोसले, मल्लिनाथ स्वामी, प्रभाकर मजगे, प्रकाश पडवळकर, बाळासाहेब कुलकर्णी, अशपाक काझी, मनोज निकम, अरविंद शिंदे, सिद्धेश्वर मोरे, आकाश गडकरी, सुर्यवंशी, बाबुशा महिंद्रकर, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, रोहित खोबरे, वैभव मोरे, निखिल पाटील, भारत पाटील, सनी सोनटक्के, भरत राजेगावकर आदींसह समस्त विश्वस्त मंडळ, क्रियाशील सदस्य, कार्यकर्ते, व सेवेकरी, हिरकणी संस्था, अमोलराजे लेझीम संघ, अमोलराजे भोसले मित्र परिवार आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.प्रकाश सुरवसे यांनी केले.

# कर्करुग्णांसाठी 'पीईटी सीटी' स्कॅनचा जनआरोग्य योजनांमध्ये समावेश

**मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर निर्णय; आमदार सोपल यांच्या पाठपुराव्याला यश**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर -**

कर्करुग्णांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, म हात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत 'पीईटी सीटी' स्कॅन तपासणीचा समावेश केला आहे. या निर्णयामुळे पात्र कर्करुग्णांना म हागड्यातपासणीचा आर्थिक भार कमी करण्यास मदत होणार आहे.





आमदार दिलीप सोपल, कार्याध्यक्ष डॉ. बी. एम. नेने अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च सेंटर, बार्शी, यांनी कर्करुग्णांची गरज लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना भेटून याची मागणी केली होती. मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार संबंधित यंत्रणेने कार्यवाही केली. सार्वजनिक आरोग्य विभागाने अभ्यास समितीच्या शिफारशींचा विचार करून दि. १५ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय जारी केला. निर्णयानुसार, ६३ कर्करोग उपचार पॅकेजमध्ये 'पीईटी सीटी' स्कॅनचा अतिरिक्त निदान प्रक्रिया म्हणून समावेश केला आहे. तसेच निवडक १३ प्रकारच्या कर्करोग उपचारांसाठी स्वतंत्र/नियमित निदान प्रक्रिया म्हणून 'पीईटी सीटी' स्कॅनला मान्यता दिली आहे.




# अकलूजमध्ये ७०० महिलांकडून देवी महात्म्य ग्रंथाचे पारायण

**आज सांगता; शारदीय नवरात्रौत्सवा निमित्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑक्टोबर -**

शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त अश्विन शुद्ध पंचमी ते अष्टमी दरम्यान अकलुजची ग्रामदेवता श्री.अकलाईदेवी मंदीराच्या प्रांगणात देवी महात्म्य ग्रंथ सामुदायिक पारायण सुरु आहे. सुमारे ७०० महिला पारायण करत आहेत.

ग्रामदेवता अकलाई देवी देवस्थान ट्रस्टच्यावतीने मुख्य विश्वस्त जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व विश्वस्त स्वरुपाराणी मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली अकलाई देवीच्या प्रांगणात शारदीय नवरात्रौत्सवा निमित्त गुरुवार दि.१५ ते सोमवार दि.१९ ऑक्टोबर या पाच दिवसादरम्यान सकाळी ९ ते ११ या वेळेत पुजारी मोहन व मदन क्षिरसागर गुरव यांच्या अधिपत्याखाली देवी महात्म्य ग्रंथ सामुदायिक पारायणचे व्यासपीठ चालक अक्षय गुरव आहेत. अश्विन शुद्ध पंचमीला पारायणास प्रारंभ झाला असून यंदा सप्तमी दोन दिवस असल्याने अश्विन शुध्द पंचमी ते अष्टमी असे पाच दिवस देवी महात्मा ग्रंथ सामुदायिक पारायण होत आहे.

**डॉ. धवलसिंहांकडून सपत्नीक देवीची महापूजा**

अश्विन शुद्ध पंचमीस पाचव्या माळेला महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील व उर्वशीराजे मोहिते-पाटील या उभयंताच्या हस्ते देवीची महापूजा व आरती करण्यात आली.

# आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते हॉटेल मेजवानीचे बुधवारी उद्घाटन

**आमदारपदी निवडीबद्दल राजेंद्र राऊत यांचा घोलप परिवारातर्फे होणार सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर -**

बार्शी शहरातील उद्योजक संतोष घोलप व घोलप बंधू यांच्या वतीने सुरू केलेल्या हॉटेल मेजवानी (व्हेज-नॉनव्हेज) या नव्या हॉटेलचा भव्य उद्घाटन समारंभ बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते होत आहे.

बुधवारी सकाळी ११ वाजता कांदलगाव चौक, कुर्डूवाडी-लातूर बायपास रोड येथे हा सोहळा होत आहे.



तसेच यावेळी राजेंद्र राऊत यांचा सोलापूर जिल्हा विधान परिषदेवर आमदारपदी निवड झाल्याबद्दल घोलप परिवाराच्या वतीने भव्य सत्कार करण्यात येणार आहे.

सोहळ्यास बार्शी नगरपालिकेचे नगरसेवक विजय राऊत, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, बार्शी पंचायत समि तीच्या सभापती मीनाक्षी रोंगे, माजी नगरसेवक प्रशांत कथले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, संचालक अजित बारंगुळे, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, बा.न.पा. पाणी पुरवठा सभापती संतोष बारंगुळे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, बार्शी प्रेस क्लबचे पदाधिकारी व सदस्य, डिजिटल मिडियाचे पदाधिकारी व सदस्य आदी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाची व्यवस्था केली असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन घोलप परिवाराने केले आहे.

# बार्शी शहरातील २१ प्रभागांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी निधीचा प्रस्ताव

**आ. दिलीप सोपल यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर -**

बार्शी शहरातील विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या समस्या लक्षात घेऊन आमदार दिलीप सोपल यांनी आपल्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शहरातील २१ प्रभागांमधील विविध ठिकाणी विंधन विहीर सबमर्सिबल पंप तसेच टाकी बसविण्याच्या कामांसाठी प्रत्येकी २ लाख रुपये निधीची मागणी केल्याचे सांगितले.



यासंदर्भात सोलापूर जिल्हा नियोजन समि तीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केल्याचेही आमदार सोपल म्हणाले. या प्रस्तावामध्ये शहरातील विविध वसाहती, प्लॉट परिसर, सामाजिक व धार्मिक स्थळांच्या परिसरांसह नागरिकांना पाणीपुरवठ्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या ठिकाणांचा समावेश आहे. प्रस्तावित कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर बार्शी नगरपरिषदेमार्फत आवश्यक कार्यवाही करून ही कामे तातडीने पूर्ण करण्याची अपेक्षा आहे. शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचे आमदार दिलीप सोपल यांनी सांगितले.

# रूक्मिणी मातेस पसरती बैठक पोशाख अलंकार परिधान

## नवरात्र महोत्सव आठवा दिवस; सोन्याच्या मुकुटाने श्री विठ्ठल तेजोमय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८ ऑक्टोबर -**

नवरात्र महोत्सवा निमित्त आठव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान केले आहेत. रूक्मिणी मातेस पसरती बैठक पोशाख परिधान केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेठया जोड, शिरपंच मोठा, शिरपेत लहान, मोत्याचा तुरा, तुळशीची माळ एक पदरी, लॉकेट पाच पदरी, लहान चंद्रहार, लॉकेट नऊ पदरी, लॉकेट पट्टीचे, अष्टपैलू मण्याची कंठी, म



ोहनमाळ, अष्टपैलू कंठी पदकासह, लॉकेट बदामासह, तोडे जोड, लॉकेट चार पदरी, मत्स्य जोड, सोने पितांबर इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, खड्यांची वेणी, सोन्या मोत्याची ताणवाड, चिंचपेटी हिरवी, मोत्याचा कंठा, मन्या मोत्याच्या पाटल्या जोड, मोत्यांचे मंगळसूत्र, मोत्याचे बाजूबंद, पैंजण जोड, कर्णफुले, मोरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, कंबरपट्टा, जवमणी पदक, तारामंडळ, हिऱ्यांची नथ इत्यादि अलंकार परिधान केले आहेत.

राधिका मातेस नक्षी टोप, चिंचपेटी तांबडी, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, लक्ष्मी हार. सत्यभामा देवीला नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, तुळशी माळ इत्यादी अलंकार. महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, इमिटेशन नेकलेस, लफ्फा, शिरपेच मोठी, बोरमाळ, मोहरांची माळ, जवेची माळ, तांदळा हार, मोठी एकदानी, चांदीची छत्री इत्यादी अलंकार परिधान केले आहेत.

२० ऑक्टोबर रोजी रिध्दी - सिध्दी गणपती मंदिरात दसऱ्यानिमित्त सिमोल्लंघन करण्यात येत आहे, २२ ऑक्टोबर रोजी एकादशी असल्याने भाविकांची मोठी प्रम ाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दर्शनरांगेत सुरक्षा रक्षक नियुक्ती, पाणी व चहा वाटप, बॅरीकेटींगची व्यवस्था विद्युत व्यवस्था इतर अनुषंगीक सोई सुविधा पुरेसा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

**श्री व्यंकटेशास राम अवतार**

श्री व्यंकटेशास राम अवतार पोशाखासह मोहनमाळ, नामनिळाचा, राखी, कोयरीहार, हिऱ्याचे कंगन, मोत्याची कंठी, मोत्याची कंठी दोन पदरी, दंडपेट्या जोड, नक्षी टोप, प्रभावळीसह, मारवाडी पेठयांच्या मोतीहार, तुळशीमाळ, बाजीराव कंठी, बासरी, चांदीची छत्री इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान केले आहेत.